
स्पंदन
२००५-०६

दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर



## हार्दिक अभिनंदन...!



**सौ. मायादेवी कृष्णराव पाटील**

मा.सदस्या,अधिसभा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# स्पंदन

## वार्षिक अंक तेरावा

सन २००५–२००६

## संपादक मंडळ

**संपादक**

प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर

**कार्यकारी संपादक**

प्रा. सी. वाय. जाधव

**विभागीय संपादक**

| | |
|---|---|
| डॉ. ए. जे. वारके | मराठी |
| प्रा. डी. जी. दिघे | हिंदी |
| प्रा. सी. वाय. जाधव | इंग्रजी |
| प्रा. एस. ए. गंगावणे | शास्त्र |

# श्रध्दांजली

या वार्षिक अंक काळात
निधन पावलेल्या
आपल्या देशातील
थोर
शास्त्रज्ञ, साहित्यिक,
सिनेअभिनेते, अभिनेत्री,
नाट्यचित्र कलांवत,
सैनिक,
राजकीय नेते
याच बरोबर
या वर्षी अतिवृष्टीत बळी पडलेल्या
निष्पाप व निराधार
अबालवृध्दांना
भावपूर्ण

# श्रध्दांजली.

# संपादकीय

'स्पंदन'चा हा तेरावा वार्षिक अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होतआहे.

दशकापूर्वी चर्चेत असणाऱ्या एकविसाव्या शतकात आपण प्रवेश केलेलाच आहे आणि या एकविसाव्या शतकामध्ये अनेक क्रांतीकारी बदल घडून आलेले आहेत. त्यांचा परिणाम म्हणून आपल्या जीवनामध्ये सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्तरांवर प्रचंड उलथापालथ आपण अनुभवत आहोत.

विविध क्षेत्रामध्ये मानवी जगाने झपाट्याने प्रगती केलेली आहे. भौतिक विकासाच्या परमोच्च स्थानापर्यंत आपण पोहोचलो असताना अद्याप या विकासापासून वंचित असलेले एक जग आजही अस्तित्वात आहे. त्यांना सर्वांबरोबर आणण्यासाठी शिक्षण गंगा सर्वत्र पोहोचणे आवश्यक आहे.

आज जीवनाचे प्राधान्यक्रम बदलल्याने समाज प्रवासाची नेमकी दिशा कोणती? ते समजेनासे झालेले आहे. चांगल्या विचारांची आजही वाणवा नाही पण चांगुलपणाचा पाठपुरावा करणारी वागणूक आज दुर्मिळ होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर साहित्यकृतीचे महत्व आजही अनमोल आहे. त्यांचा समाजमनावर उमटणारा ठसा समाजाला मार्गदर्शक ठरत असतो. आमच्या ग्रामीण महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांच्या लेखणीतून प्रकट झालेली ही 'स्पंदन' साहित्यकृती फार मोठी मार्गदर्शक असणार नाही. मात्र आजच्या तरूणाईच्या विचारांची दिशा आपणाला त्यातून समजेल.

आमचा बी.एस्सी. भाग १ चा विद्यार्थी म्हणतो,

"स्पंदन---एक मुक्त व्यासपीठ. महाविद्यालय सुरू झाल्यानंतर नवनवीन विद्यार्थ्यांची महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये झुंबड उडते. महाविद्यालयाच्या पायरीवर प्रथम पाय ठेवताना प्रत्येक विद्यार्थी मनाशी एक स्वप्न बाळगून असतो आणि खऱ्या अर्थानं आपापल्या परीनं त्या स्वप्नाला न्याय देण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. सांस्कृतिक कार्यक्रम, कला, क्रीडा, शिक्षण ह्या पैकी कोणत्या क्षेत्रात आपण चमकू शकतो. याचेउत्तर शोधू लागतो आणि त्याचा शोध संपतो तो स्पंदन. ---एक मुक्त व्यासपीठ ह्या ठिकाणी."

प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास व्हावा, जनमाणसांना त्याची ओळख व्हावी. ह्या प्रमुख हेतून आपल्या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेलं एक मुक्त व्यासपीठ म्हणजेच स्पंदन. ह्या व्यासपीठावर येण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. कोणी कथांद्वारे, कोणी कवितांद्वारे, कोणी लेख लिहीतो तर कोणी स्वत:च्या कौशल्य कुंचल्यांचा आधार घेतो आणि ह्यातूनच जन्माला येत असतो समाजाचा नवा तेजस्वी घटक, एक कणखर व्यक्तिमत्व.

आज ज्याची ओळख चार चौघांपुरतीच मर्यादीत आहे. तो उद्याचा सूर्य बनू शकतो. तो केवळ ह्या स्पंदनमुळेच. मलाही बनायचय उद्याच कणखर व्यक्तिमत्व. मलाही घालावयाची आहे ह्या स्पंदनावरती हळुवार फूंकर. म्हणूनच मी ही केविलवाणा प्रयत्न करू पाहतोय. ह्या स्पंदनापर्यंत पोहोचण्याचा.

आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे हे प्रयत्न छोट्या छोट्या साहित्यकृत्तीतून व्यक्त झालेले आहेत. ते या 'स्पंदन' द्वारे व यामध्ये चांगले असेल ते विद्यार्थ्यांच्या प्रयत्नामुळेच व अनावधानाने काही चूक राहिली असल्यास ती मी स्वीकारतो.

स्पंदन अंकाचे कामी संस्था अध्यक्ष मा. के. पी. पाटील, संस्था सचिव मा. एस.एस. चौगले, मानद सचिव श्री. आर. डी. देसाई, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन झाले.

त्याच बरोबर या कामी संपादक मंडळाने अपार परिश्रम घेतले तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी वर्गाचेही विशेष सहकार्य लाभले. त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

प्रत्यक्ष अंका च्या अंर्तबाह्य सजावटीसाठी संजीवनी ऑफसेटचे श्री. विजय व सौ. संजीवनी देसाई आणि श्री. रामचंद्र शिरोडकर यांचे अनमोल सहकार्य झाले. त्यांचेही विशेष आभार मानून हे संपादकीय संपवितो.

धन्यवाद.

आपला,

प्रा. सी. वाय. जाधव

कार्यकारी संपादक

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. सुनिलराज सुरेशराव सुर्यवंशी |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. जी. डी. पाटील |
| सदस्य | : | मा. एकनाथ माणकोजी निकम |
| सचिव | : | मा. एस्. एस्. चौगले |
| सेक्रेटरी | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. एस. डी. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. एस. आर. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. एस. के. सावंत |
| शिक्षकेत्तर प्रतिनिधी | : | श्री. नामदेव विष्णू पाटील |

## हार्दिक शुभेच्छा !

सभासद हित हेच आमचे ब्रिद

**श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पत संस्था,**

बिद्री. (मौनीगनर)

आकर्षक व्याजदर, तत्पर सेवा

चेअरमन, व्हा. चेअरमन संचालक मंडळ, मॅनेजर व सर्व सभासद

# संस्था पदाधिकारी



चेअरमन
मा.आमदार. के. पी.पाटील



व्हा. चेअरमन
मा. सुनिलराज सु. सुर्यवंशी



मा. नामदेवराव भोईटे



मा. गणपतराव गुं. फराकटे



मा. विठ्ठलराव शि. खोराटे



मा. बंडोपंत कु. पाटील



मा. बाजीराव ई. गोघडे



मा. नेताजी कुं. पाटील



मा. गणपती ज्ञा. पाटील



मा. केरबा द.पाटील

# संस्था पदाधिकारी



मा. के. जी. नांदेकर



मा. पंडीतराव द. केणे



मा. दिनकरराव भा. जाधव



मा. शशिकांत आ. पाटील



मा. राजेंद्र पां. पाटील



मा. सुनिलराव शि.कांबळे



मा. केशवराव शं. पाटील



मा. सौ. सविता भि. एकल



मा. सौ. सुवर्णा सं. पाटील



मा. रमेश मा. वारके



मा. मधुकर गो. जाधव



मा. ए. वाय. पाटील
संचालक, बँक प्रतिनीधी

# संस्था पदाधिकारी



**मा. श्री. आर. डी. देसाई**
कार्यकारी संचालक, बिद्री कारखाना
आणि
मानद सचिव,
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक
मंडळ, बिद्री.



**मा. श्री. एस्. एस्. चौगले**
सचिव,
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक
मंडळ, बिद्री.




**मा. डॉ. आर. एल्. राजगोळकर**
प्राचार्य,
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.

# विद्यार्थी संसद

२००५-२००६



प्रा. एन. डी. पाटील
जिमखाना चेअरमन



प्रा. डी. के. शिंदे
एन. एस. एस. प्रतिनिधी



प्रा. एच. डी. धायगूडे
प्राध्यापक प्रतिनिधी



कु. संजय यादव
विद्यार्थी सचिव बी. ए. भाग ३



कु. मारुती एकनाथ पाटील
वर्ग प्रतिनिधी बी एससी भाग १



कु. मानसिंग आनंदा फराकटे
वर्ग प्रतिनिधी बी.ए. भाग २



कु. दत्तात्रय रामचंद्र चांदम
वर्ग प्रतिनिधी बी एससी भाग २



कु. उज्वला शिवाजी पाटील
वर्ग प्रतिनिधी बी ए. भाग ३



कु. अवधूत बाळसो सुतार
वर्ग प्रतिनिधी बी एससी भाग ३



कु. अर्चना आप्पासो माने
सांस्कृतिक प्रतिनिधी बी ए. भाग २



कु. निता निवृत्ती सुतार
विद्यार्थिनी प्रतिनिधी (कला) बी ए. भाग ३



कु. प्रियांका सदाशिव यादव
विद्यार्थिनी प्रतिनिधी (शास्त्र) बी.एससी. भाग ३



कु. कुलदिप प्रकाश सा
एन. एस. एस. प्रतिनिधी

## हार्दिक अभिनंदन !



प्रा. ए. आर. माने(इतिहास)
पी. एचडी. पदवी संपादन



प्रा. डी. डी. कोमेजवार
शिवाजी विद्यापीठ गणित अभ्यास मंडळाच्या
उपसमितीवर निवड



प्रा. डॉ. एस. डी. पाटील
पी. एचडी. प्रबंधासशिवाजी विद्यापीठाचा
डॉ. व्ही. आर. करंदीकर पुरस्कार

# मराठी विभाग

अमृताते पुन्हा
पैजा मी लावीन
थोर भल्या भल्या
क्षणात जिंकीन

कवी नारायण सुर्वे

विभागीय संपादक

प्रा. डॉ. ए. जे. वारके

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. | अंधश्रध्दा निर्मुलन | कु. अनिता रघुनाथ पोवार | बी.ए.भाग२ |
| २. | यशस्वी जीवनाचा मूलमंत्र | दिपक आगते | बी.एस्सी.२ |
| ३. | प्रेम | अमोल पाटील | बी.एस्सी.१ |
| ४. | जर का ? | सचिन सातापा पाटील | बी.ए.भाग२ |
| ५. | शाळा सुटली-पाटी फुटली | सागर पाटील | बी.एस्सी.२ |
| ६. | पत्रकारिता हे जगावेगळे वेड | विकास चौगले | बी.ए.भाग१ |
| ७. | यशस्वी जीवनाच्या कसोट्या | बाळासो द. कांबळे | बी.ए.भाग२ |
| ८. | कधी न कळलेलं प्रेम | वैभव वि. कांबळे | बी.ए.भाग१ |
| ९. | छ. शाहू महाराज | अविनाश तराळ | बी.ए.भाग३ |
| १०. | व्यक्तिमत्व विकास | मकरंद गुरव | बी.एस्सी१ |
| ११. | हसत-जगावं | प्रवीण विष्णू पाटील | बी.ए.भाग१ |
| १२. | 'वृक्ष संवर्धन' काळाची गरज | संदीप न्हाटोळ | बी.एस्सी३ |
| १३. | प्रेम | संदीप प्र. शेट्टी | बी.एस्सी१ |
| १४. | चारित्र्य | रेश्मा श. पाटील | बी.ए.भाग३ |
| १५. | काल्पनिक देवाची आवश्यकता आहे का ? | कु. अर्चना पोवार | बी.ए.भाग३ |
| १६. | आजची स्त्री | कु. शीतल हळदकर | बी.ए.भाग१ |
| १७. | नाती असती--- | युवराज मोरे | बी.ए. भाग३ |
| १८. | क्षण प्रेमाचा | रमेश फराकटे | बी.ए.भाग३ |
| १९. | दूधसाखर ते दूधसागर | प्रदीप पाटील | बी.एस्सी.३ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कविता | प्रदीप कुंभार | बी.ए.भाग३ |
| २. | जीवन | युवराज चौगले | बी.ए.भाग३ |
| ३. | आवडती मजला ती | परशराम फराकटे | बी.ए.भाग३ |
| ४. | स्वप्नं | संदीप पाटील | बी.ए.भाग३ |
| ५. | आठवण एका प्रहराची | कु.वर्षा पाटील | बी.ए.भाग२ |
| ६. | सुंदर स्वप्न | आर.के. फराकटे | बी.ए.भाग३ |
| ७. | तू | पांडुरंग फराकटे | बी.ए.भाग१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | वेडा पाउस | ...... | दीपक पाटील | | बी.ए.भाग२ | |
| ९. | लग्न | ...... | संग्राम पाटील | ...... | बी.एस्सी.२ | ...... |
| १०. | फुलं | ...... | सतिश भिउंगडे | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| ११. | जिवाचा जिवलग हवाच ! | ...... | जयेश बिल्ले | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| १२. | बदलत्या वाटेवर | ...... | ऋषीकेश फुटाणकर | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| १३. | कुणाला काय कळले | ...... | विनय वाझे | ...... | बी.एस्सी.३ | ...... |
| १४. | सीमा | ...... | शिल्पा नकाते | ...... | बी.एस्सी.१ | ...... |
| १५. | निरोपसंध्या | ...... | अवधुत सुतार | ...... | बी.एस्सी.३ | ...... |
| १६. | सोस | ...... | जयश्री पाटील | ...... | बी.एस्सी.१ | ...... |
| १७. | जीवनाच्या वाटेवर | ...... | अमोल मोरे | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| १८. | मर्द आम्ही मराठे खरे | ...... | दत्तात्रय पाटील | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| १९. | नजरा | ...... | रोहन फुटाणकर | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| २०. | जनतेचं राज्य हाय म्हणत्यात | | मारुती मुधोळकर | | बी.एस्सी.१ | |
| २१. | गोपाळाची पोरं | ...... | सिध्दार्थ कांबळे | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| २२. | मैत्रीण | ...... | दीपक लोहार | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| २३. | तुझं – माझं | ...... | आशिष पोवार | ...... | बी.एस्सी.३ | ...... |
| २४. | कर्तव्य | ...... | अमर मोरे | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| २५. | देवदास | ...... | अमोल जरग | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| २६. | गरिबाचे मृत्युपत्र | ...... | सुयोग कोतमिरे | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| २७. | तुला पाहिले अन् | ...... | विकास जाधव | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| २८. | हे काय घडतंय | ...... | राहूल पाटील | ...... | बी.एस्सी.२ | ...... |
| २९. | अतिवृष्टीचे तांडव | ...... | विक्रम जाधव | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| ३०. | धैर्य | ...... | दत्तात्रय चौगले | ...... | बी.ए.भाग२ | ...... |
| ३१. | तुझ्यासाठी | ...... | सुनिल पाटील | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| ३२. | आठवण | ...... | सचिन पाटील | ...... | बी.एस्सी.१ | ...... |
| ३३. | क्रांती | ...... | मंगेश धुरी | ...... | बी.एस्सी.२ | ...... |
| ३४. | असं जगायचं असतं | ...... | कृष्णात यादव | ...... | बी.एस्सी.२ | ...... |
| ३५. | मृत्यु | ...... | रणजीत माने | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| ३६. | तमाशा | ...... | सदाशिव पाटील | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| ३७. | होतयं तरी काय ? | ...... | कु.माधुरी सरदेसाई | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| ३८. | गर्दीच्या जगाला | ...... | शिवाजी रेपे | ...... | बी.एस्सी.२ | ...... |
| ३९. | स्पंदन | ...... | उदयराज पाटील | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| ४०. | आई | ...... | राहुल नाईक | ...... | बी.ए.भाग१ | ...... |
| ४१. | प्रेम हे असच असतं | ...... | महेश फराकटे | ...... | बी.ए.भाग३ | ...... |
| ४२. | प्रतीक्षा | ...... | सचिन पाटील | ...... | बी.एस्सी.३ | ...... |
| ४३. | फुल पाखराचा गाव | ...... | स्मिता अ. पाटील | ...... | बी.ए.भाग२ | ...... |
| ४४. | चारोळी | | विकास पाटील | | बी.एस्सी.१ | |
| ४५. | फुल | ...... | दयानंद डाफळे | ...... | बी.ए.भाग२ | ...... |
| ४६. | चारोळी | | दत्तात्रय चांदम | | बी.एस्सी.२ | |
| ४७. | अभिमानाने सांगा | | सचिन पाटील | | बी.एस्सी.३ | |

# अंधश्रध्दा निर्मूलन

अंधश्रध्देपासून विज्ञानाकडे घेऊन जाणारी दिशा कोणती ? हे समजावून घेण्यासाठी प्रथम अंधश्रध्देचे मानसशास्त्र समजावून घ्यावयास हवे.

बुध्दी व भावना या दोन्हीच्या साह्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तिमत्त्वात त्यांचे संतुलन असावे लागते. हे संतुलन असणारा माणूसही पूर्ण बुध्दिनिष्ठ पध्दतीने विचार करतो असे नाही. तोही छोट्यामोट्या गोष्टी स्वत:शी बाळगून असतो. त्या अवैज्ञानिकच असतात. परंतु केवळ तेवढ्यामुळे त्यांचा तोल गेला असे होत नाही. मात्र बुध्दी व भावना यांचे संतुलन एका मर्यादेपलिकडे बिघडले की बुध्दी गहाण पडते. माणूस भावनेची शिकार बनतो.

उदा : रात्रीची वेळ आहे. तातडीने निरोप देण्यासाठी जावयाचे आहे. रस्ता स्मशानातून जातो. स्मशानाजवळ घाबरून दातखिळी बसून बेशुध्द पडणे. वा अत्यावश्यक असलेला निरोप देण्याचे कामच सकाळपर्यंत लांबणीवर टाकणे. हे दोन्ही भीतीच्या भावनेचे शिकार बनल्याचे लक्षण आहे. मग व्यक्ती मार्ग शोधते. रामरक्षा म्हणत स्मशान पार करते. रामाचे नाव घेतल्याने भूत पळून जाते. व संकटातून रक्षण होते. या श्रध्देचा तो वापर करतो. ही उघडपणे अंधश्रध्दा आहे.

अनेक अंधश्रध्दा अज्ञान, अडाणीपणा, शकुन अपशकुनाच्या कल्पनांचे खेळ यातून आलेल्या असतात. साप चावल्यानंतर अनेकदा व्यक्ती हॉस्पिटलाआधी मांत्रिकाकडे किंवा देवळात नेली जाते. चावलेला साप विषारी असेल तर नंतर डॉक्टराकडे. तो पर्यंत वेळ टळून गेलेली असते . घराबाहेर कामाला पडताना तीन जण असेल तर 'तिघाडा काम बिघाडा' असे म्हणतात. रस्त्यावरून मांजर आडवे गेले की किंवा विधवा स्त्री आडवी गेली की मनात शंकेची पाल चुकचुकते. कामाला निघालो आणि कुणी शिंकला की मन साशंक बनते. घुबडाचे ओरडणे ऐकू आले की अपशकुन होतो. उलट स्वप्नात जिवंत माणूस मेलेला दिसला तर त्याचे आयुष्य वाढते. स्त्री विधवा म्हणून अपशकुनी मानली जाते किंवा पांढऱ्या पायाची मानले जाते. पण या सर्व अंधश्रध्दा आहेत. तसेच भुताने झपाटणे, अंगात येणे किंवा विझणे, गुंतले केस म्हणजे डोक्यात झालेल्या जटा या अंधश्रध्देपोटी आयुष्याची अशी माती होते. यल्लमा म्हणे सगळ्यात रागीट देवी, भारी कोपिष्ठ. आईची नुसती चर्चा केली तरी घरादाराला सळो की पळो करून सोडते. देव मूल मागत नाही. देवाला मूल सोडू नका असेही म्हणणारी सुध्दा माणसेच आहेत व अशिक्षित आणि सुशिक्षित हे सुध्दा अंधश्रध्देवर जास्त विश्वास ठेवतात. अशा शकुन अपशकुन ठरविणाऱ्या एक ना दोन शेकडो समजुती महाराष्ट्राच्या, भारताच्या विविध भागात आढळतात. या बाबतची टीका उपहास, चिकित्सा माणसांना अंतर्मुख करते. अंधश्रध्देपासून दूर नेते असा अनुभव आहे.

कु. अनिता रघुनाथ पोवार,
बी.ए. भाग -२



कु. अनिता रघुनाथ पोवार,
बी. ए. भाग -२

## यशस्वी जीवनाचा मूलमंत्र

यशस्वी होण्याचे प्रत्येकाचे स्वप्न असते. प्रत्येकाला आपण खूप मोठे व्हावे असे वाटत असते. पण अनेक व्यक्ती या केवळ स्वप्नाळू असतात. त्या फक्त हवेत इमले बांधत असतात. स्वप्ने हवीतच, आपल्या इच्छा, आकांक्षा भव्य-दिव्य हव्यातच मात्र त्यासाठी पुढचे व महत्त्वाचे पाऊल आहे ते म्हणजे प्रयत्न, परिश्रम व कष्ट. आपल्याला पृथ्वी प्रदक्षिणा करावयाची आहे. परंतु त्यासाठी पहिले पाऊल टाकून सुरुवात करावयास हवी. केवळ सतत विचार करीत बसण्याची सवय काहींना लागते. केवळ ते विचारच करीत बसतात.त्यांच्याकडून प्रत्यक्ष कृती कधीच होत नाही.

सतत केवळ इच्छा करण्याची सवय सोडून द्या. त्याऐवजी निर्णय घ्या व प्रत्यक्ष कृती करण्याची सवय अंगी बाणवा. तुमच्याकडे विद्‌वता आहे, ज्ञान आहे, हुशारी आहे, खूप पदव्या आहेत. परंतु तुम्ही जर काहीच करणार नसाल तर त्याचा काय उपयोग ? महत्त्वाचे म्हणजे मनात काही शंका कुशंका न ठेवता, काल्पनिक अडचणीचा विचार न करता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे हे होय. त्याचप्रमाणे आपले काम हेच आपले व्रत समजून कामाला लागले पाहिजे. मनातील सारी चिंता, काळजी, हुरहुर, अस्वस्थता, शंका, कुशंका या समूळ काढून टाकल्या पाहिजेत व त्यासाठी निर्धाराने, निश्चयाने व आत्मविश्वासाने पहिले पाऊल टाकावयास हवे. कामास सुरुवात केल्यामुळेच आपण निम्मी लढाई जिंकत असतो. काहींच्या मनात अनामिक भिती असते. काहीच्या मनात अपयशाचे दडपण असते. यासाठी प्रथम दृढनिश्चय करून मी जिंकणार, मी यश मिळवणारच असा आत्मविश्वास बाळगून कामाला सुरुवात करावयास हवी. सतत परमेश्वर माझ्या पाठीशी आहे. अशी श्रध्दा बाळगून कामास प्रारंभ करावयास हवा.

दीपक आमते
*बी. एस्सी. भाग -२*

# प्रेम

*आपलं ते प्रेम दुसऱ्याचं ते लफडं असा आपला दुतोंडी समाज आता सुधारतोय ही आनंदाची बाब आहे. पण पूर्वीपासूनच प्रेमवीरांना समाजाविरुध्द झगडावं लागलं आहे. लढावं लागलं आहे आणि प्राणही गमवावे लागले आहेत. याचा अर्थ प्रेम वाईट आहे का?*

अजिबात नाही ! प्रेम म्हणजे पवित्र महाकाव्य, प्रेम म्हणजे त्याग, प्रेम स्वत:साठी करायचं नसतं. प्रेम म्हणजे दुसऱ्याविषयी व्यक्त केली जाणारी समर्पणाची भावना. जी कृतिशीलही असते. हे सगळं जरी खरं असलं तरी हल्ली प्रेमाला विकृत स्पर्श होत आहे.

या विकृतीपोटीच उल्हासनगरची रिंकू, इचलकरंजीची आरती व शोभा तांदळे यासह असंख्य मुली बळी गेल्या. हा त्यांचा दोष होता की त्यांच्या यौवनाचा ?

हरिश पटेलनं रिंकूला जाळली... हे कसलं प्रेम ? प्रेम म्हणजे बलिदान... दुसऱ्यासाठी प्राण देणे पण आपण जिच्यावर प्रेम करतो त्या व्यक्तिचा प्राण घेणाऱ्याला का आपण प्रेमवीर म्हणायचं ?

आज अशा प्रेमवीरांची मानसिकता तपासून पाहिली पाहिजे. त्यामागील कारणे शोधून काढली पाहिजेत.

मुलींनी प्रत्येकवेळी आपल्याला स्वीकारलंच पाहिजे ही आपण अपेक्षाच का धरावी ? जसं आपण तिच्यावर जीवापाड प्रेम करतो तसं ती कुणावर तरी करीत असेल तर ? प्रेम म्हणजे जर बलिदान असेल तर आपण मोठ्या आणि अगदी मोकळ्या मनाने अस्वीकृत प्रेमांचही स्वागत केलं पाहिजे. ती मिळाली तर आपल्यालाच मिळाली पाहिजे नाहीतर मी तिचा खून करीन अशी भाषा करण्याऱ्यानं किंवा मनात आणणाऱ्यानं प्रेम हा शब्दसुध्दा उच्चारू नये. त्याचा तो नैतिक अधिकारच नाही. 'एक दुजे के लिए' चित्रपटानंतर महाराष्ट्रातच नव्हे तर देशात आत्महत्येची लाट आली . खरं तर आत्महत्या करणे म्हणजे स्वत:च्या मनावर स्वत:च बलात्कार करणे. का आत्महत्या करायची; प्रेयसीनं नकार दिला म्हणून ? हे कसलं पुरुषत्व ? ही तर नपुसंकता. शाहरूख खानच्या

'डर' चित्रपटात विकृती चितारली आहे ती या पार्श्वभूमीवरच. काय अर्थ आहे या जगण्याला?

तिच्यावर आपलं जर जीवापाड प्रेम असेल आणि तिचा जर होकार नसेल तर आपल्या प्रेमाचं बलिदान द्या ना ! आत्महत्या आणि खून करायची काय आवश्यकता आहे ? खरं तर प्रेम म्हणजे काय हे समजलंच नाही तर हा पवित्र शब्द उच्चारायचा तरी का ?

आजकाल पोरगी पटवणं आणि प्रेम करणं या शब्दांच्या गाभ्यात वासना आहे. कित्येक मुली या वासनेला बळी पडंल्या. अनेक मुलींनी कुमारी माता व्हायच्या भीतीनं आत्महत्या केल्यात. अनेक मुलींना आपलं घर व समाज सोडून जगण्यासाठी वेश्या व्यवसाय करावा लागलाय तो प्रेमाच्या पोटात लपलेल्या या वासनेपोटीच !

**अमोल पाटील,**
*बी. एस्सी. भाग - १*

## कविता

असे कधी घडेल का ?
शाळा प्रवेशासाठी
पैसे भरल्याशिवाय मुलांना प्रवेश मिळेल !
असे कधी घडेल का ?
सुशिक्षित तरूणांना
लाच दिल्याशिवाय नोकरी मिळेल !
असे कधी घडेल का ?
लग्नासारख्या पवित्र बंधनात
हुंडा दिल्याशिवाय मुलीला सुख मिळेल !
असे कधी घडेल का ?
जातीयतेचे बंधन सोडून
विषमतेचे पाश सोडून समानतेचा सुर्य उगवेल !
असे कधी घडेल का ?

**प्रदीप पोवार,**
*बी. ए. भाग - ३*

## जीवन

जन्माला येताना कुणी
सोबत काय आणायचं नसतं
येताना रिकाम्या हातानं
बंद मुठीनं यायचं असतं
जाताना सोबत कुणी काय
घेवून जायचं नसतं
सर्व काही इथंच सोडून
एक दिवस जायचं असतं
मग हे सारं कशासाठी ?
कशासाठी करायचं असतं ?
कुणासाठी जगायचं अन्
कुणासाठी मरायचं ?
याच प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी
एकदा तरी जन्माला यायचं असतं
यालाच जीवन म्हणायचं असतं

**युवराज चौगले,**
*बी. ए. भाग - ३*

## आवडती मजला ती

गुलाबी थंडीत तुला भेटण्यास मन माझं तळमळतं
अंधाऱ्या रात्री शुभ्र चांदण्यात तुला भेटण्यास
वाऱ्याची एक झुळूक जाणवून देई तू येण्याची चाहूल
तुझ्याकडे टक लावून पाहता मन जाई हरवून.
तू येशील लवकर म्हणून बसलो होतो एकांती
विसरलो होतो तुझ्यासाठी मित्र मैत्रिणी
सुख दु:खाच्या वाटेवरती जीवनाच्या
अखंड प्रवासात आवडती असणारी
ती माझी झोप होती.

**परशराम फराकटे**
*बी. ए. भाग -३*

# जर का ?

कॉलेजचे ते दिवस होते. कॉलेज म्हटले की सर्वच मुले हजर. मौजमजा, दंगा करणे या सर्व गोष्ट आल्या, तास संपल्याची घंटा वाजल्यानंतर मी व माझे मित्र वर्गातून सरळ कॉलेजच्या कट्ट्यावर येऊन बसतो. सर्व मुली घरी जाण्यासाठी चालल्या होत्या. सर्व मित्र त्या मुलींकडे पाहत होते. त्यातच एक मुलगी एकटी पायऱ्यावरून उतरुन चालू लागली त्यावेळी माझे मित्र तिची टिंगलटवाळी करु लागले. परत रागाने त्या मुलीने पाहिजे. मी शांतपणेच बसलो होतो. ती मुलगी निघून गेली. त्या मुलीच्या बाबतीत आमच्या मित्रांनी इथून मागे एक-दोनदा अशीच टिंगल केली होती.

मी या सर्वांचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला होता . ती मुलगी शांत स्वभावाची होती. ती कोणाबरोबर जास्त बोलत नव्हती. ती कॉलेजला येताना नट्टा-पट्टा कधी करत नव्हती. इतर मुलीसारखी ती वावरत नसत. नखरे करणे, केशरचना करणे असले प्रकार जणू तिला माहितच नव्हते असे मला वाटे. तिच्या बोलण्यात एक प्रकारची भावनिकता होती. दुसऱ्या दिवशी योगायोगाने कॉलेजवर आमची भेट झाली. त्यातच तिने मला 'एक्सक्यूज मी' अशी हाक मारली. "तुमच्याशी मला काही बोलायचे आहे. आपण जरा बागेत बसून बोलूया "असे म्हणाली. मी फक्त हो म्हणालो व आम्ही दोघे कॉलेजच्या बागेत जाऊन बसलो. माझी ही एका अनोळखी मुलीशी बोलण्याची पहिलीच वेळ होती त्यामुळे मी जरा चाचपडतच होतो.

ज्यावेळी आम्ही बसलो त्यावेळी ती म्हणाली "तुम्हाला काय मिळते माझी चेष्टा करण्यात ? मी तुमचे एवढे काय वाईट केले आहे?" मी फक्त "ऐका तरी...." एवढेच म्हणत राहिलो. पण ती माझे काही ऐकण्याच्या स्थितीत नव्हती. जणू आज सर्व पोटातील सांगून टाकायचं असा निश्चयचं करून आल्यागत सांगू लागली. मग मी मोठ्याने जरा बोलू लागलो. "मी तुमची अजिबात चेष्टा केलेली नाही. मी तुमच्याविषयी कधीही वाईट बोलत नाही. तुम्ही मलाच का दोषी धरीत आहात." एवढे बोलल्यावर ती रडू लागली. मी तिला सावरण्यासाठी प्रयत्न करत होतो. रडू नको एवढेच बोलत होतो. एकवेळ असे वाटले की तिच्या खांद्यावर हात ठेवून तिची समजूत काढावी पण असे मी करू शकत नव्हतो. ती शांत झाली. ती शांत झाल्यावर मी विचारले, "एवढे रडण्यासारखे काय कारण?" त्यावर ती म्हणाली, "मला माफ करा मी तुम्हाला वाटेल ते बोललो." त्यावर मी म्हणालो "मैत्रीत मित्रच दुसऱ्या मित्राला आपल्या भावना, आपल्या अडचणी सांगतो त्याच प्रमाणे तुम्ही मला सांगितले. यात माफी मागण्याचे कारणच काय?" एवढे बोलल्यावर सरळ ती माझ्याकडे पाहू लागली व आपला हात पुढे करीत म्हणाली, "माझ्याशी मैत्री कराल ?" त्यावर मी पण धाडसाने हातात हात दिला व फक्त "हो" म्हटले.

मी जाणलं होत की भीक मागितल्यासारखं कोणाकडून मैत्री मिळत नसते किंवा फ्रेंडशिप बँड बांधून मैत्री होत नसते. मैत्रीत एकमेकाना जाणून घेणे महत्त्वाचे असते. खऱ्या मैत्रीत काटा एकाला लागतो तर कळ दुसऱ्याला येते. माझ्या डोळ्यात डोळे घालून ती म्हणाली, "तुमचे नाव काय ?" मी माझे नाव सांगितल्यावर तिने आपले नाव "प्रियंका" असे सांगितले. मला ती नावाप्रमाणेच प्रिय वाटू लागली होती. जाताना मला तिने सुट्टीच्या दिवशी चहाला घरी येण्यासाठी आग्रह केला . मी "हो" म्हणालो. ती निघून गेल्यावर मी फक्त तिच्या विषयीच विचार करीत होतो. त्या रात्री तर मला झोपच लागेना. सुट्टीच्या दिवशी सकाळी मी लवकर उठलो व तिच्या घरी जाण्यासाठी आवराआवर करू लागलो. आईला जरा माझा संशय आला पण मी ती वेळ टाळून तिच्या घरी जाण्यासाठी तिने दिलेल्या पत्त्यावर गेलो. त्यावेळी ती माझी आपल्या टेरेसवर उभी राहून वाट पहात होती. मला पाहून तिला खूप आनंद झाला व तिला पाहून मलाही खूप आनंद झाला.

प्रियंकाच्या घरात प्रवेश केल्यावर तिच्या घरात

अंथरूणावर कोणी तरी स्त्री झोपली होती. नंतर समजलं की ती प्रियंकाची आई आहे. प्रियंका आपल्या आई आणि भावासह घरी राहत होती. प्रियंकाचे व तिच्या भावाचे संगोपन तिच्या आईनेच केले होते. प्रियंकाला वडिलाबद्दल मी विचारले तेव्हा ती म्हणाली, "त्यांचा एका अपघातात मृत्यु झाला. तेव्हापासूनच आमचे पालनपोषण, आमची जबाबदारी आईनेच पूर्ण केली आहे. आमच्या काळजीनेच आई कायम आजारी असते." हे सांगताना तिच्या डोळ्यात अश्रू आले. नंतर ती किचन रूममध्ये जाऊन चहा घेऊन आली. आमच्या गप्पा चांगल्या तासभर चालल्या. त्या सर्वांना मी सुट्टीच्या दिवशी आमच्या घरी येण्याचे आमंत्रण दिले व तिथून निघून गेलो. परीक्षा पुढच्या महिन्यात असल्याने कॉलेजवर आमचे भेटणे थांबले होते पण मला तिच्या घरच्यांची व तिची काळजी वाटू लागली होती. परीक्षा संपल्यानंतर तिला मी लग्नाची मागणी घालण्याचे ठरवले. कारण माझे तिच्यावर पहिल्या भेटीपासूनच प्रेम होतं. पण नियतीला बहुतेक हे पसंत नसावं कारण परीक्षा संपल्यानंतर प्रियंका, तिची आई व भाऊ शहरातील घर विकून गावातील घरामध्ये राहण्यासाठी गेले. त्यांनी जाताना आपला पत्ता कुणालाच दिला नव्हता. शहरातील घर विकण्याचे कारण म्हणजे प्रियंकाच्या आईची तब्बेत फारच बिघडली होती. तिच्यावर चांगले उपचार करण्यासाठी बराच खर्च येणार होता.

पण माझ्या मनाला खूप वाईट वाटले. मला काय करावे, काहीच सुचेना. तिला शोधण्याचा खूप प्रयत्न केला पण ती काही शेवटी सापडली नाहीत. त्यावेळी मनाला मी प्रश्न केला प्रियंका असा डाव अर्ध्यावर सोडून जायची होतीस तर भेटलीस कशाला ? ती जायच्या अगोदर भेटली असती तर खरचं बरं वाटलं असतं पण त्याचा आता काहीच उपयोग नव्हता. जर ती भेटली असती तर तिला मी जाऊच दिले नसते. तू पुन्हा परत येशील का? प्रियंका तू पुन्हा भेटशील का?

**कु. सचिन साताप्पा पाटील,**
*बी. ए. भाग - २*

## स्वप्नं

सगळ्याच गोष्टी बोलून दाखवायच्या नसतात
सगळ्याच आठवणींना वाटा द्यायच्या नसतात.
सगळेच अश्रू डोळ्यात आणायचे नसतात
सगळ्याच नात्यांना नावे द्यायची नसतात.
सगळीच - सगळीच स्वप्ने पूर्ण होत नसतात
पण म्हणून ती बघायची सोडायची नसतात.
मनातल्या कोपऱ्यात अशी स्वप्नं जपायची असतात.

**संदीप पाटील,** *बी. ए. भाग - ३*

## आठवण एका प्रहराची

जीवनाच्या या अखंड सागरात,
सुख-दु:खाच्या लाटा सतत पसरतात,
अन् त्यातीलच एका लाटेचा
असाही एक शेवट असतो,
जेथून होते सुरूवात पुन्हा
मनातल्या आठवणी उजळ करीत,
लुकलुकतात साऱ्या खुणा.
अनुभवाचे पाणी मागे सारत,
दुसरा किनारा गाठत आल्यावर,
हळुच फिरवावी एक नजर
मग आठवतील ऊन सावलीच्या
कालचक्रात हरविलेले एक-एक प्रहर.
आठवेल तेव्हाची तिथली अखंड वर्दळ,
हसण्याचे ते परीचित स्वर,
उठतील आजही तिचे पडसाद
नि:शब्द एकांताच्या पोटात
सामावलेले गूढ संवाद.
कदाचित बालपणीच्या धुक्यात हरविलेली
आजही आठवतील गाणी
आणि क्षणा-क्षणाला डोळ्यातून पाझरेल,
कुणाच्या तरी विरहाचे पाणी,
कधी हसलेले कधी रूसलेले क्षण आठवतील
अनावर झालेले अश्रू पुसताना,
आणि आठवेल हा जीवनपट,
साथीला कुणीही नसताना
साथीला कुणी नसताना..

**कु. वर्षा पाटील,** *बी. ए. भाग -२*

# शाळा सुटली – पाटी फुटली

दिशा, माझी मैत्रीण, माझी बहीण आणि माझं सर्वस्व पण एकदम exciting हं. आज तिची ओळख म्हणजे तासन्तास पाण्यात पोहणारी ! ती शाळेत जात नाही म्हणून सर्व नद्या, समुद्र पोहते की दिवसात सात – आठ तास पोहते म्हणून शाळेत जात नाही ? हा प्रश्न तसाच आहे.

शाळेत न जाण्याचा निर्णय किंवा परीक्षेला न बसायचा निर्णय तिने कधीपासून घेतला हे निश्चितपणे आठवत नाही. पण हे नक्की आठवतं की तिला लहानपणी शाळेत जायला अजिबात आवडायचं नाही. खूप बोअर व्हायचं. शाळेत जायचं म्हटलं की तिला रडू कोसळायचं. खरं तर आईनं तिला आपल्या लहानपणाच्या शाळेच्या इतक्या गमती-जमती सांगितल्या होत्या. कधी ती आणि तिचे मित्र-मैत्रिणी मिळून बाईंची कशी खोड काढायचे? वर्ग सोडून कशा चिंचा वेचायला जायचे? पण असं काहीच आमच्या शाळेत नसायचं. तिला तर बाईंची पण खूप भीती वाटायची. कधी हसायच्याच नाहीत. तिने आई-बाबांना सांगितलं तर ते म्हणाले, "तुला रोज शाळेत जाणं अगदी जरुरच आहे असं नाही. आवडेल तेव्हा जा." मग ती जेव्हा इच्छा व्हायची फक्त तेव्हाच शाळेत जायची. पण अधून-मधून शाळेत जाण्यानं बाईही तिला खूप रागवायच्या आणि मैत्रिणी पण चिडवायच्या, आळशी म्हणून.

तिने बाबांना एक दिवशी सांगितलं, बाई म्हणाल्या "शाळेत नाही आलीस तर भांडी घासावी लागतील हॉटेलमध्ये !" बाबांनी तेव्हा तिला खूप समजाऊन सांगितलं म्हणाले, "दिशा शाळेत न जाण्यानं तुझं काही नुकसान होणार नाही. उलट सर्व जगाच्या शाळा बंद पडल्या तरी मुलांचं काही नुकसान होणार नाही." यावर ती म्हणाली , "उलट शाळा बंद पडल्या तर मुलांचा फायदाच होईल. बाबा स्कूल शब्दाचा उगमच लेटिन शब्द स्कीला मधून आला आहे. ज्याचा अर्थ आहे, Have fun with purpose पण जर fun च नसेल तर शाळेला काय अर्थ ?"

हळूहळू तिच्या मनात एकूणच शाळा आणि शालेय व्यवस्थेबद्दल एक अनास्था निर्माण होऊ लागली. ती खूप पुस्तक वाचते. त्यातूनच तिच्या लक्षात आले. जेवढ्या मोठ्या व्यक्ती होऊन गेल्या त्यांचा अनेकदा शाळेशी काही संबंधही आला नव्हता. बाबांनीही सांगितलं होतं की, मोठे-मोठे शोध शाळेच्या बाहेरच लागले होते. आर्किमिडीज अंघोळ करीत होता म्हणून त्याला floating चा सिद्धांत कळला. न्यूटन झाडाखाली झोपला नसता तर gravity बद्दलचा शोध लागला नसता. राईट भावंडं मैदानात खेळत नसती तर aeroplane कोणी शोधलं असतं? म्हणजेच पाचवीत प्रवेश करेपर्यंत तिचा शाळेत न जाण्याचा निर्णय पक्का होत गेला. पण एकदा काय झालं की तिने शाळेत चित्रकला या विषयात गुलाबास लालच्या ऐवजी पिवळा रंग भरला आणि परीक्षेत चित्र सर्वात सुंदर असूनही तिला दहापैकी शून्य मार्क मिळाले. माझ्या आईने बाईंना खूप समजाविण्याचा प्रयत्न केला की, "चित्र म्हणजे अभिव्यक्ती असते विचारांची. त्यात फूल पिवळं पण असू शकतं." पण बाई ऐकायलाच तयार नाहीत. एकदा अशीच एक गंमत घडली. बाईंनी 'माझी आई' या विषयावर एक निबंध लिहायला सांगितला. तिने लिहिले, 'माझी आई कामासाठी बाहेर फिरते आणि स्कूटर चालविते. जिन्स घालते.' तर बाईंनी चक्क शून्य अंक दिला. परत आईने बाईंना खूप समजाविण्याचा प्रयत्न केला की, "ती जे पाहते आहे तेच तिने लिहिले आहे. मुळात जिथं विचारांना बंधन आहे तो निबंधच कसला ?"

आई स्वयंपाक छान करते. असंच दरवेळी लिहायला हवं का ? पण तिला मार्क मिळाले नाही हाच ती बराच वेळ जेव्हा विचार करु लागली आणि तो एक turning point ठरला. परीक्षेत मार्क मिळविणे म्हणजे हुशारी नाही. माझे बाबा तर पूर्णपणे अशा परीक्षांच्या विरोधात होते. मग आम्ही चर्चा करु लागलो. परीक्षा कशा असतात ? त्यात काय पाहतात? काय शोधतात ?

माझा भाऊ इतका मस्त आहे अन् सगळे त्याला खुशाल चेंडू म्हणतात. प्रत्येक गोष्टीचा तो खूप आनंद घेतो. life एकदम enjoy करतो. मग त्याचा हा हसरा, खेळता धम्माल स्वभाव पाहतात का या परीक्षा ? ह्या

परीक्षांचा आमच्या जगण्याशी काही संबंध आहे का?

एक गंमत सांगाविशी वाटते, ती खेळात राष्ट्रीय पातळीवर जाणारी आमच्या शाळेची एकमेव विद्यार्थिनी आहे. पण ती जे पाहते आहे तेच तिने लिहीले आहे. मुळात जिथं विचारांना बंधन आहे तो निबंधच कसला ?जेव्हा खेळाची परीक्षा झाली. तेव्हा सर्वात कमी मार्क्स मिळविणारी पण तिच होती. खरंतर परीक्षा कशाला असतात ? सर्वांना सर्व विषय आवडू शकतात का ? सर्व विद्यार्थी सर्व विषयात चांगले असू शकतील का ?

मला एक खूप छान गोष्ट आठवते. एकदा जंगलाच्या सर्व प्राण्यांची परीक्षा होते. मासा पोहण्यात पहिला येतो पण उडण्यात फेल होतो. चिमणी उडण्यात पहिली येते पण पोहण्यात फेल होते. माकड उड्या मारण्यात पहिला येतो. हरिण पळण्यात पहिला येतो पण झाडावर चढण्यात मागे राहतो. पण वटवाघूळाला सगळंच थोडं-थोडं येतं म्हणून तो वर्गात पहिला येतो.

आणि जेव्हा तिला संपूर्णपणे पटलं की, शालेय परीक्षा म्हणजे सर्वकाही नाही तेव्हा तिने परीक्षा देणे बंद केले. आता तिचं रुटिन नुसतं शाळा परीक्षा नव्हे, तर गाणं आहे, स्वीमींग आहे, वाचन आहे. तिचं रोजचं रुटिन आता ती स्वत:च ठरवते. ती सात ते आठ तास पोहते. गाण्याचा रियाज करते. वाचन करते आणि हो, अभ्यासपण करते, आपल्या इच्छेने !

तिला Product Design मध्ये खूप इंटरेस्ट आहे. ती तिच्या चपलांपासून बेल्टपर्यंत सर्व स्वत: डिझाईन करते. शाळेत जात नाही म्हणून तिला यात खूप वेळ देता येतो. आज ती NIFT (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी) मध्ये शिकत आहे. या कॉलेजमध्ये ॲडमिशनसाठी स्पर्धा परीक्षा आहे. ज्याचा बारावीच्या मार्कांशी काही संबंध नाही. तुमची creativity त्यात तपासतात. तेथे तिच्या डिझायनर बनण्याच्या स्वप्नात औपचारिक शिक्षण आड येऊ शकत नाही.

मला खरंच म्हणायचंय शाळेत जायचं नाही. परीक्षेला बसायचं नाही. हा निर्णय तिने आयुष्यात जाणीवपूर्वक घेतला आणि तिला तर खरोखर वाटतं की ती इतक्या सर्व गोष्टींचा अनुभव घेऊ शकते ते तर शाळेत न जाण्यामुळेच !

**सागर पाटील**

*बी. एस्सी. भाग - २*

## सुंदर स्वप्न

कोमल सुंदर एक स्वप्न परी,
जात होती आकाशामधुनी,
थांबवली तिला निळ्या ढगांनी,
डोळे माझे आले भरूनी
डोळ्यांनी मला तिने इशारा केला,
विचार माझ्या मनात आला,
ढगांनी इशारा केला.
दिवस तेथेच निघुनी गेला,
स्वप्नात परत ती माझ्याजवळ आली,
स्पर्शून मजला जणू म्हणाली
आठवलेस जरी गोड गीत माझे
सूर तुला कधी कळणार नाही,
पाहू नको वळून मागे
मी तुला कधी दिसणर नाही.
विचार करू नको फार .
रममाण होऊ नको फार
पुरे झाली ही प्रेमकहाणी
या साऱ्या स्वप्नात आता पहाट बघ झाली.

**राजेंद्र कृष्णात व्हरकट**

*बी. ए. भाग - ३*

## तू

*तू बोलत का नाहीस ?*
*ओठात शब्द असूनही.*
*तू नजर का मिळवीत नाहीस ?*
*नजरेत होकार असूनही .*
*तू ऐकून का घेत नाहीस ?*
*समधुर शब्द असूनही .*
*तू हसत का नाहीस ?*
*जीवन आनंदी असूनही.*
*तू भेटत का नाहीस ?*
*मनात ओढ असूनही.*

**पांडूरंग फराकटे**

*बी. ए. भाग - १*

# पत्रकारिता हे जगावेगळे वेड

पत्रकारिता हे जगावेगळे वेड असं मी म्हटले तर ते माझ्यादृष्टीने ते योग्यच आहे. शासन आणि समाजामध्ये एक महत्त्वाचा दुवा म्हणजे प्रसारमाध्यम. त्यामधीलच एक घटक म्हणजेच 'पत्रकारिता' होय. वृत्तपत्र भारताच्या लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखले जाते. जर पत्रकारिता समाजात नसती तर? असा प्रश्न आपल्याला विचारला तर ? आपल्या देशामध्ये कोठे काय चालले आहे? देशाच्या कोणत्या भागात काणेती घटना घडली ? हे आपणास समजणार नाही. जागतिक घडामोडी, देशातील ताज्या बातम्या, सर्व सामान्य जनतेसाठी शासनाने कोणते निर्णय घेतले? यांची परिपूर्ण माहिती आपणास पत्रकारितेमुळे घर बसल्या वृत्तपत्रातून सहज समजू शकते आणि याहूनच पत्रकारितेचा जन्म झाला. पत्रकारिता ही निर्भिड आदर्श आणि सूर्यप्रकाशासारखी तेजस्वी व स्वच्छ असावी लागते. जे काही घडते ते सत्य मांडावे लागते. खऱ्याला खरे आणि खोटयाला खोटं अशीच माहिती मांडणे गरजेचे आहे. भारतातील वृत्तपत्राचा विचार करीता भारतातील पहिले वृतपत्र म्हणजे 'जेम्स' हे कि यांचे 'बंगाल गॅझेट' तर देशीभाषेतील भारतातील पहिले वृत्तपत्र म्हणजे राजाराम मोहन रॉय यांचे 'संवाद कौमुदी' होय. महाराष्ट्रातील मराठी भाषेतील पहिलं वृत्तपत्र म्हणजे 'ज्ञानसागर' तर पहिले साप्ताहिक म्हणजे आचार्य बाळशास्त्री यांचे 'दर्पण' होय. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीयांच्यात देशप्रेमाची भावना व तरूणामध्ये ब्रिटिशाबद्दल द्वेषाची भावना वृत्तपत्रांनी निर्माण केली. लोकमान्य टिळकानी 'केसरी' यां वृत्तपत्रातून ब्रिटिशाविरुध्द लिखाण करून भारतीयांमध्ये उत्साहाची व प्रेरणेची भावना निर्माण केली. उषा मेहता या महिलेने तर रेडिओ वरून भारतीयांना ब्रिटीश विरूध्द आग पेटवली. पत्रकारितेमुळे समाजातील अनेक घोटाळे, भ्रष्टाचार आणि अवैध धंद्याना खीळ बसली. त्यामुळे पत्रकारितेला आपल्या देशामध्ये अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. ज्या लोकप्रतिनिधीना सर्व सामान्य जनतेचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी देशातील सर्वोच्च संस्थेत म्हणजेच संसदेत आपण निवडणुकीच्या माध्यमातून पाठवतो. पण तेच लोक प्रतिनिधी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी जर पैसे घेत असतील तर त्याला वाचा कोण फोडणार? अर्थातच पत्रकार होय. यांच ताजं उदाहरण द्यावयाचे झाले तर परवाच पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये संसदेत सामान्य जनतेचे प्रश्न विचारण्यासाठी देशातील काही पक्षातील अकरा प्रतिष्ठित खासदारांनी पैसे घेतले व यांची सविस्तर चित्रण 'आज-तक' या वृत्तवाहिनीतील पत्रकारांनी साऱ्या देशापुढे सादर केले. पत्रकाराच्या या निर्भिड पत्रकारितेमुळे फार मोठे व लोकशाहीला काळिमा फासणारे प्रकरण उजेडात आणले. अरूण गवळी सारख्या आमदार गुंडाची पत्रकारानी मुलाखत घेत असताना अनेक गोंधळात टाकणारे प्रश्न विचारले असता त्यांना त्याच्याकडून मारहाण देखील करण्यात आली. पत्रकाराच्या लेखणीमध्ये अशी जादू असते की भल्या-भल्यांना वाकावे लागते.

मी इयत्ता पाचवीमध्ये असतानाच मला पत्रकारतेची फार आवड निर्माण झाली. त्यादृष्टीने मी अनेक वृत्तपत्रे चाळत असे त्यासंबंधी परिपूर्ण माहिती घेण्याचा प्रयत्न ही करीत असे. तेव्हाचं मी निर्धार केला की आपलं पहिलं ध्येय म्हणजे 'पत्रकार' होणे. पत्रकार होण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी म्हणजे भाषा कौशल्य. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, स्पष्ट उच्चार. या सर्व बाबीत मी सज्ञान झालो. आणि कोणत्याही दैनिकामध्ये 'पत्रकार' म्हणून काम करण्याचे ठरविले. योगायोगाने व माझ्या प्रयत्नामुळे मी अकरावीत प्रवेश घेतल्यानंतर मला एका दैनिकामध्ये 'पत्रकार' म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. सुरूवातीला मला बातम्या मिळविण्यासाठी अनेक ठिकाणी जावे लागले. बातम्या लिहिण्यामध्ये माझ्यात उत्साह निर्माण होत होता. कधी जेवण करून तर कधी उपाशी पोटी बातम्या, तसेच एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहावे लागले. पत्रकारितेमुळे मला तसेच माझ्या कुंटुंबाला समाजामध्ये मान, सन्मान व प्रतिष्ठा मिळाली तसेच मोठ्या प्रमाणात प्रसिध्दीदेखील मिळाली. तसेच आर्थिक प्राप्ती सुध्दा होत गेली

किती तरी अनुभव मला पत्रकारितेच्या माध्मातून मला मिळाले. कधी एखाद्या कार्यक्रमाला कार्यक्रम संपल्यानंतर तर कधी कार्यक्रमाच्या सुरूवातीला पोहचलो. एखाद्या ठिकाणी त्या प्रसंगावरून कोणते प्रश्न विचारावे आणि कोणते प्रश्न विचारू नयेत याचे ज्ञान मला पत्रकारितेमुळे मिळाले. पत्रकारितेमुळे माझ्या व्यक्तिमत्व विकास चांगल्या प्रकारे होत आहे. मनातील भित्रेपणा नष्ट झाला. अनेक लहान-मोठ्या व्यक्तींची ओळख झाली. एखाद्या मोठ्या राज्यकर्त्याला किंवा मोठ्या व्यक्तीला प्रतिप्रश्न विचारण्याचे धाडस मला मिळाले. तसेच माझ्या भावी जीवनासाठी एक महत्वाची गोष्ट मिळाली ती म्हणजे आत्मविश्वास. आत्मविश्वासाच्या जोरावर मी माझ्या मनातील विचार व माझे मत स्पष्टपणे मांडू शकलो. तसेच यामुळे भाषा शैली आणि वक्तृत्वामुळे समोरच्या व्यक्तीवर छाप पाडू शकलो. पत्रकारितेतून मिळालेल्या ज्ञानातून मला माझ्या भविष्यकालीन जीवनात आलेल्या संकटाला चारीमुंड्या चित मात करण्याचा आत्मविश्वास मला मिळालेला आहे. लेखाच्या शेवटी एवढाच संदेश देत आहे. या जगात अशक्य असे काही नाही. त्यासाठी आपल्याकडे आत्मविश्वास, जिद्द, कष्ट करण्याची तयारी, सतत प्रयत्न, एकाग्रता आणि मनावर ताबा असला पाहिजे तर आपण अशक्य गोष्ट शक्य करू शकतो. कोणी तरी म्हटले आहे की,

**॥ केल्याने होत आहे रे ॥**
**॥ आधी केलेची पाहिजे ॥**

**विकास चौगले**, *बी. ए. भाग - १*

## वेडा पाऊस

मुसळधार पावसाची लाट येत होती,
ती त्याच्या जाळयात सापडली होती.
परिकथेतील राजकुमार येणार होता,
वरूण राजा तिला जाऊ देत नव्हता.
पाहण्यास त्याला व्याकूळ झाली,
मनात भिती घर करू लागली.
मनातील स्वप्न साकारत होते,
पूर्णत्वाचे चिन्ह तर दिसतच नव्हते.
काय करावे ते तिला समजेना,
समोरील मार्गाशिवाय काहीच दिसेना.
अखेर तिने धीर धरला,
स्वप्नातील राजकुमारने आधार दिला.
पावसावर मात करून ती पुढे निघाली,
त्याची सर आणखीनच वाढली.
परिकथेतील राजकुमार तिला भेटला,
तिचा आनंद गगनाला भिडला.
दोघांना पाहून वरूण नाहीसाच झाला,
पुन्हा तिच्या नादी तो नाही लागला.

**दीपक गोविंद पाटील**, *बी.ए. भाग -२*

**शौकत शिकलगार**, *बी.ए. भाग - १*



# लग्न

लग्न, लग्न म्हणजे काय असतं?
त्याच्या मनातील विचारांचे
तिच्या चेहऱ्यावरचे प्रतिबिंब असतं
तिच्या प्रश्नाआधी
त्याचं उत्तर तयार असतं
लग्न, लग्न म्हणजे काय असतं?
तिने चहा केला तरी
त्याला सरबत हवं असतं
त्याने गजरा आणला की नेमकं
तिला फूल हवं असतं
लग्न, लग्न म्हणजे हवं असतं
लग्न, लग्न म्हणजे काय असतं?
त्याच्या बेफिकीरीला
तिच्या जाणिवांचं कोंदण असतं
तिच्या खर्चांना; त्याच्या खिशाचं आंदण असतं
लग्न, लग्न म्हणजे काय असतं?
त्याच्या चुकांना, तिच्या पदराचं पांघरूण असतं
तिच्या दु:खाला त्याच्या खांद्याचे अंथरूण असतं
लग्न, लग्न म्हणजे काय असतं?
कधी समझौता तर कधी भांडण असतं
तो चिडला तरी
तिने शांत रहायचं असतं
कपातल्या वादळाला
चहाबरोबर संपवायचं असतं
लग्न, लग्न म्हणजे काय असतं ?
कधी दोन मनांचं मिलन असतं तर
कधी दोन जीवांचं भांडण असतं.
एकानं विस्कटलं तरी दुसऱ्याने आवरायचं असतं
संकटाच्या वादळाला दारातच थोपवायचं असतं
लग्न, लग्न म्हणजे काय असतं?
प्रेमाचं ते बंधन असतं
घराच ते घरपण असतं
विधात्याला पडलेलं
ते एक सुंदर स्वप्न असतं।

संग्राम पाटील, *बी. ए. भाग - २*

# फुलं

जीव लावणाऱ्या माणसांवर
जीव ओवाळून टाकतात फुलं.
पाणी घालणारे हात गंधाळून टाकतात फुलं.
फुलं असतात प्रामाणिक झाडांशी,
मातीशी करीत नाहीत विश्वासघात गोड बोलून,
स्मिताआड्न स्वत: प्रसन्न हसतात,
बघणाऱ्यालाही हसवितात जगाला हसविण्याची दीक्षा
त्यांना मिळालीय निसर्गाकडून
अंधारातच फुलतात, पहाटवाऱ्यात झुलतात
इवल्याशा दवातले आकाश कवेत घेतात.
पाखरांच्या आभाळ - गाण्यात रंगून जातात,
बेभान होतात. समेवर पानांना टाळी देतात.
आपल्याच गंधात, आपल्याच छंदात झंकारतात फुलं
पानात फिरणाऱ्या वाऱ्याचे श्वास मंतरतात फुलं
बागेत प्रेमिकांचा शृंगार पाहून पानामागे दडतात फुलं
अशा वेळी आलाच पाऊस तर
त्याच्यावरही चिडतात फुलं
लावण्याच्या गालांवर सौंदर्याचं दान टिपतात फुलं.
तारुण्याच्या तालावर संयमाचं भान जपतात फुलं
स्वप्नांची आशा टिकवितात फुलं
आयुष्य कसं जगावे हे शिकवितात फुलं
फुलं रडतात दंगलीत माणसं मरतात
फुलं घायाळ होतात
माणूसच माणुसकीची हत्या करताना
माणूस अधिक निष्ठूर बनू नये.
यासाठी तर फुलं रोज उमलत असतात.

सतीश भिऊंगडे,
*बी. ए. भाग - ३*

# यशस्वी जीवनाच्या कसोट्या : त्याग, निष्ठा व आत्मविश्वास

जीवनामध्ये प्रत्येक मानवाला बरेच काही करता येते परंतु ते करीत असताना प्रत्येक मानवाने नि:स्पृह, नि:स्वार्थी व निष्कंलकपणे केले पाहिजे त्यासाठी मनामध्ये कोणत्याही प्रकारचा हेतू किंवा कुबुध्दी न बाळगता कोणतेही कार्य नि:स्पृहपणे केले म्हणजे तो माणूस त्याच्या संपूर्ण आयुष्यामध्ये पूर्णपणे यशस्वी होऊ शकतो. जीवनामध्ये सुंदर यश संपादन करण्यासाठी प्रत्येक मानवाने आपली इच्छा, तन, मन, धनाने आणि कुशल बुध्दीने सर्वस्व पणाला लावले पाहिजे. जर जीवनामध्ये खरोखरच यशस्वी व्हायचे असेल तर त्यासाठी स्वत:चा प्रामाणिकपणा व निश्चित ध्येयनिष्ठा असली पाहिजे. अशा प्रकारचे वळण प्रत्येक मनुष्याने आपणहून स्वत:ला लावून घेतले व ते आचरणात आणून त्याचे पालनपोषण केले तर तो माणूस नक्कीच त्याच्या जीवनामध्ये पूर्णपणे यशस्वी होण्याच्या पाऊल वाटेवर पदार्पण करून आपल्या पदरामध्ये सुंदरसे फळ प्राप्त करून घेऊ शकतो.

प्रत्येक मानवाला क्षणार्धात अति धनवान होता येते परंतु त्याला विद्वान होता येत नाही. कारण बुध्दिमान होण्यासाठी विशिष्ट प्रकारची इच्छा शक्ती व त्याग करण्याची गोडी मनामध्ये असावयास लागते. या गोष्टी खेरीज कोणालाही सहजासहजी विद्वता प्राप्त होत नाही. बाजारात आज सर्व वस्तू पैशाने खरेदी करता येतात परंतु विद्वता किंवा ज्ञान खरेदी करता येत नाही. बुध्दिमता व ज्ञान ही प्रत्येकाला आपणाहून मिळत असते. त्यासाठी अखंड ज्ञानसाधना करावी लागते. परंतु आजच्या विज्ञान युगामध्ये सज्ञान असून अज्ञान झालेल्या मानवाकडून पैशालाच सर्वस्व मानून त्याच्या भोवतीच आपली बुध्दीमता केंद्रीत करून पैशासाठी वाममार्गाचा अवलंब सर्रास केला जात आहे.

आज प्रत्येक मानवामध्ये स्वार्थ दडलेला आहे. प्रत्येक मनुष्य केवळ स्वत:च्या फायद्यासाठी कार्यरत असताना दिसून येतो. "मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाणे" हा प्रकार म्हणता येईल. स्वार्थी व संकुचित बुध्दी दिवसेंदिवस घातक ठरणारे चित्र निर्माण करू पाहत आहे आणि या सर्व गोष्टीला जबाबदार कोण असेल तर आजची सुशिक्षित मंडळी. जन्मत:च अनेक व्यक्तिमध्ये विविध कला व सुप्त गुणांच्या निसर्गदत्त संपत्तीचा वारसा निर्माण झालेला असतो. उदा : कोणाला उत्तम लेखणाची सवय असते. अशा व्यक्तिंनी आपापल्या अंगी असलेल्या कलागुणांना ओळखून त्या जागृत करून त्या कार्यान्वीत करून जर त्यांचे समाजापुढे प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला तर ह्या व्यक्ती जीवनामध्ये नावारुपाला आल्यावाचून राहत नाहीत. यासाठी प्रत्येकाने आपल्या अंगी असणारे गुण दाखवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आयुष्यामध्ये प्रत्येक मानवाने ज्ञान साधनेसाठी अनेक विचारवंताशी चर्चा करून त्यांच्याकडून ज्ञान प्राप्त करून घ्यावे. ज्ञान व्यासपीठावर ज्या वेळेस तुम्ही बहुमानाला पात्र ठराल. त्यामुळे त्या सन्मानाने, बहुमानाने सुखावलेल्या व्यक्तिची प्रगती अधिक –अधिक होते.

म्हणून प्रत्येक मानवाने संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी व विश्वाच्या कल्याणासाठी मेणबत्तीप्रमाणे स्वत: जळून इतरांना आपल्या प्रकाशज्योतीने प्रज्वलीत करून अंधाराचे साम्राज्य नष्ट करून त्यांना उजाळा देण्याचे काम केले पाहिजे. त्याचप्रमाणे आपणदेखील मेणबत्ती प्रमाणे जळून इतर जे बांधव अंधाऱ्या काळोखामध्ये खितपत पडलेले आहेत त्यांना मदतीचा हात देणे हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे.

म्हणून एका जगप्रसिध्द विचारवंताने म्हटले आहे "ज्या गोष्टीची अपेक्षा असते तीच वाट्याला येते. जर तुम्ही यशाची उपासना केली तर यशच मिळेल. जर तुम्ही अपयशाला घाबरत असाल तर तुम्हाला अपयश मिळेल. मग तुम्ही यश मिळविण्यासाठी कितीही प्रयत्न केला तरी अपयशच येणार. जर तुमचा स्वत:वर विश्वास नसेल तर तुमच्या वाट्याला चांगल्या गोष्टी येणे कठीणच ! जर तुम्ही विजयाची अपेक्षा करीत असाल तर तुम्हाला विजयच मिळेल. हे प्रत्येक बाबतीत खरे ठरते म्हणून धाडस, विश्वास, त्याग, निष्ठा या गोष्टी असतील तर तुम्ही जीवनात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही."

**बाळासो दत्तात्रय कांबळे,**
*बी. ए. भाग -२*



# कधी न कळलेलं प्रेम

आता मी मृगजळाच्या मागे धावणं सोडून दिलंय, धावतोय ते ध्येयाच्या मागे, प्रेमापुढे मी माझ्या आईवडिलांच्या माझ्या प्रती असलेल्या अपेक्षा विसरलो होतो. त्याची जाणीव आता मला झाली आहे. त्यावेळेस मी प्रेम करीत होतो ते फक्त तुझ्यावर...

तू मला प्रिय होतीस तशी आजही आहेस. फक्त त्यावेळी तू नजरेसमोर होतीस. आज तशी परिस्थिती नाही. आता प्रत्यक्ष भेटणं शक्य नाही. पण तुझ्याशी प्रत्यक्ष भेटण्याचे व बोलण्याचे मार्ग मी स्वत: बंद करून टाकलेत. तरीही तुझी गोड स्मृती माझ्या मनात आजही तशीच आहे. माझ्या मन:पटलावर रेखाटलेले चित्र अजून तरूण आहे !

कधी स्वत:हून दाटतात तुझ्या आठवणीचे दीप. कधी उजळलो, कधी विझलो, ना खुशी ना हसू ! उरली फक्त जीवनात निरव, भयाण शांतता, मन उदास झाले. त्याच वाटा, तेच शिखर, जीवनही तेच, जीवही तोच. चालत होतो, तुझ्या पावलावर पाऊल ठेवून, तरीही दूर गेलीस. प्रेमात माझ्या मीच उरलो आणि मनातील स्वप्नं मात्र विखरून गेलीत...

शालेय जीवनात गेल्यापासून असं वाटायचं की या सर्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी. असं काहीतरी करावं की ज्यामुळे सर्वांनी आपल्याकडे माना वळवाव्यात. हजारोंचे हात माझ्या हातात हात मिळविण्यासाठी उत्सुक व्हावेत. असं काही करण्यासाठी अभ्यासापेक्षा दुसरा पर्याय नव्हताच. पण हे सर्व माझं या शालेय जीवनापर्यंत ठीक होतं. माझ्या शालेय जीवनापर्यंत मी अभ्यास केला आणि सर्व क्षेत्रात नावारुपास येऊन गुणवत्ता प्राप्त केली.

कॉलेज जीवनाच्या सुरूवातीस असं घडेल असं कधी वाटलंच नाही. त्या दिवशी तुला पाहिलं आणि माझ्या शरीरावर रोमांच उभे राहिले. तसं त्यापूर्वी मी तुला बऱ्याचदा पाहिलं होतं. पण तो दिवसच वेगळा होता आणि ती वेळ चमत्कारिक होती.

आकाशातल्या चंद्राप्रमाणे तुझा सुंदर चेहरा, त्यावर पडलेल्या सूर्याच्या मंद पिवळसर प्रकाशामुळे आणखीनच लोभसवाणा दिसत होता. वाऱ्याची झुळूक येताच तुझे केस चेहऱ्यावर भुरभूर उडत होते. तुझे ते स्मित हास्य, तुझा तो गोड स्वभाव हे सारं काही माझ्या मनाला स्पर्श करून गेलं. त्यावेळी माझ्या मनी उठलेले भाव तरंग जसेच्या तसे कागदावर उठविणे शक्य नाहीत. तुझे ते रूप पाहून कदाचित त्या क्षणी निसर्गही लाजला असेल!

आजही तो दिवस आला की तुझ्या आठवणीनं मन सैरभैर होतं. त्याचवेळी निसर्गाला साक्षी ठेवून मी तुला माझी जन्मांतरीची प्रेमिका मानलं होतं. तुला मी अमर्याद निसर्गाची उपमा दिली होती. म्हणून निसर्गालाही तुझा मत्सर वाटला होता. अन् तो माझ्यावर रागवला होता ! आज तोच दिवस आहे, तोच शीतल गारवा, सूर्याच्या प्रकाशात आजही मी माझा प्रकाशकिरण शोधत असतो. फरक एवढाच. आकाशातला सूर्यच माझ्याकडे पाहून उपहासानं हसत आहे.

तेव्हाचा तो दिवस माझ्या स्मृतीपटलावर कायमचा कोरला गेला आहे. आणि तू दिलेल्या वेदनाही ! ज्या दिवशी तुझ्यावर माझे प्रेम जडले त्यावेळी मी स्वत:ला भाग्यवान समजत होतो. पण आज तेच आठवणींचे मोर पीस माझ्या हृदयाला तलवारीप्रमाणे टोचत आहेत !

नंतरचे कित्येक महिने तुझ्यावरचे प्रेम व्यक्त करण्यासाठी केलेली धडपड केविलवाणी ठरली. ही केविलवाणी धडपड पाहून एका जिवलग मैत्रिणीने व काही मित्रांनी तुझ्यापुढे माझे निर्व्याज, नि:स्वार्थ प्रेम व्यक्त करण्याचे प्रयत्नही केले. तुझ्या येण्याच्या मार्गावर माझं उभ राहणं, तू समोर दिसताच तुला काही न बोलताच न कळत निघून जाणं, अभ्यासासाठी रात्र-रात्र जागणारा मी

साऱ्या रात्री स्वप्नांच्या राज्यात घालवू लागलो.

पण माझ्या प्रेमाला प्रतिसाद म्हणून काढलेले ते उद्‌गार मी कधीच विसरु शकणार नाही. ते उद्‌गार म्हणजे, "कोण तू? ओळखत नाही मी तुला?" हे तू बोलून गेलीस. त्या क्षणी मला फार वाईट वाटलं. त्यानंतर मी ज्या नशेत होतो ते मी तुलाही सांगू शकत नाही. पण मला आजही प्रश्न भेडसावतो की माझ्या नजरेला नजर भिडवत होतीस तेव्हा तू मला ओळखत नव्हतीस का? जेव्हा तू माझ्याकडे पाहून स्मित हास्य करायचीस ते हास्य पाहून मी पूर्णत: घायाळ होत होतो. हे तू जाणून होतीस ! तेव्हा तू मला ओळखत नव्हतीस का ?

ते प्रेम पाहून मित्र मला प्रेमवीरच म्हणत ! आज तू माझा देवदास करून टाकलास. तू नकार दिलास तो तुझ्या इच्छेचा प्रश्न होता. इतक्या दिवस म्हणजे दोन वर्षे साथ दिलीस, सोबत राहिलीस ते ही माझं भाग्यच होतं.

आज तो रस्ता निव्वळ ओसाड झाला आहे. कारण त्याच्या अंगावर प्रश्नांची रांगोळी काढणारा मी ही नाही, आणि त्या रांगोळीत रंग भरण्यासाठी तू ही नाहीस ! उरलं ते फक्त वाळवंट. उरल्या सुरल्या पाऊल खुणांनी होरपळून निघतोय. अगं आता जिथं जनावारांचा श्वास गुदमरतोय. मग तूच सांग प्रेमाचे प्रतिक असणारे राजहंस कसे बरे जगतील ?

ज्या जीवनात प्रगती नाही, हिरवीगार हिरवळ नाही, वसंतचा बहरदार मोहोरही नाही, चांदण्या राती सखीच्या हाताला धरून उफाळलल्या सागरात संचारण्याची हिम्मत नाही. अशा जगण्याला अर्थ तो काय?आजच्या दिवसापेक्षा उद्याचा दिवस नक्की चांगला असणार याची आशा सुटत नाही. म्हणून आपण जगतो. उद्याबद्दलची माफक उराशी आशा असते म्हणून मृत्युला कवटाळावं असं वाटत नाही.

जीवनात येणारे प्रत्येक खडतर प्रसंग आपल्याला काहीतरी शिकविण्यासाठीच आलेले असतात. अशा प्रतिकुलतेतून बाहेर पडल्यनंतरच खरी अनूकुलता अनुभविता येते आणि ती मी पाहिली आहे.

**वैभव विलास कांबळे**
*बी. ए. भाग - १*

## जिवाचा जीवलग हवाच !

जन्माला माणूस
एकटा येतो अन्
जाताना एकटा जातो, पण
म्हणून काही मधल्या
काळातही एकटेपणाच्या
शापाला कवटाळून बसावं ?
कधी रडण्यासाठी, कधी
हसण्यासाठी, कधी मनातलं
गुपित खोलण्यासाठी, कधी
विश्वासानं खांद्यावर डोकं
टेकण्यासाठी, योग्य तिथं
लगाम घालण्यासाठी, नि
वेळ येताच चुचकारून पुढं
टाच देण्यासाठी...प्रत्येकाला
प्रत्येकाचा एखादा तरी
जिवाचा जीवलग असावाच!
आपल्याही जिवाला जीव
देणारं कोणी आहे ही
भावनाच भरारी मारताना
तुमच्या पंखांना नवं बळ
देईल, पुढं गेल्या नंतरही
मागची ओढ राहील आणि
प्रेम - जिव्हाळा - काळजी
आपुलकी यांचा ओलावा
तुमच्या ह्रदयात राहील.
म्हणूनच
जीवाचा जीवलग हवाच !

**जयेश बिले**
*बी. ए. भाग -*



# छ. शाहू महाराज

कोल्हापूर नगरीचा उध्दारकर्ता,

बहुजनांचा राजा आणि बहुजनांना आरक्षण देणारा, बहुजनांचा नेता राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म 1874 मध्ये कागल या ठिकाणी घाटगे घराण्यात झाला. त्यांना कोल्हापूर संस्थानामध्ये 1884 रोजी दत्तक घेतले व त्यांनी 1894 मध्ये प्रत्यक्ष संस्थानाचा कारभार हातात घेतला.

त्यांनी आपला कारभार करताना बहुजनांच्या उध्दाराचे कार्य केले त्यामुळे लोकांनी त्यांना राजर्षी पदवीने गौरवले. आधुनिक कोल्हापूरच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीचे मूळ म्हणजे शाहू महाराज होय. शाहू महाराज नसते तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक नकाशावर कोल्हापूर अग्रभागी दिसले नसते. त्यांनी बहुजन समाजासाठी आपले आयुष्य वेचले.

म. फुले यांच्याप्रमाणेच त्यांनी शिक्षणास अग्रक्रम दिला. विशेषत: अज्ञान, अंधश्रध्दा व दारिद्र्य यांच्या कचाट्यातून सुटका करायची असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. किमान बहुजन समाजाला प्राथमिक शिक्षण तरी अवश्य मिळायला हवे. अशी महाराजांची तळमळ होती. म. फुले यांनी याच उद्देशाने हंटर आयोगा समोर 1882 साली हाच आग्रह धरला. म. फुले यांचा हाच विचार शाहूमहाराजांनी प्रत्यक्षात आणला. 1917 साली त्यांनी आपल्या राज्यासाठी मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून 500 ते 1000 लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरु केल्या. त्यावेळी कोल्हापूर नगरीत फक्त 27 प्राथमिक शाळा व 1296 विद्यार्थी होते. अवघ्या 5 ते 6 वर्षात 420 शाळा 22,000 विद्यार्थी झाले. करवीर राज्याचे लाखो रूपये शाहूराजांनी शिक्षणासाठी खर्च केले. राजांनी त्या काळात कोल्हापूरमध्ये अनेक वसतिगृहे काढली. त्यामुळे सर्व जातीचे लोक शिक्षण घेऊ लागले.

तसेच त्यांनी शेती, सहकार आणि उद्योगधंदे या क्षेत्रातही भरीव कार्य केले. आज कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्रात अग्रेसर आहे याचे श्रेय शाहू महाराजांच्या कल्पक दूरदृष्टीला व लोककल्याणकारी राज्य कारभारास जाते. सह्याद्रीत उगम पावणाऱ्या अनेक नद्या करवीर राज्यातून वाहतात. त्यापैकी भोगावती नदीवर एक प्रचंड धरण - राधानगरीचे धरण शाहू महाराजांनी बांधले आणि कोल्हापूर परिसराचा कायापालट करून टाकला. आपले महाराष्ट्र सरकार हरितक्रांतीच्या योजना आज आखत आहे. पण शाहूमहाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात अशा योजना आखून आपल्या राज्यात हरितक्रांती घडवून आणली. महाराजांच्या प्रयत्नामुळेच पुढे हजारो एकर बागायत शेती तयार होऊन कोल्हापूरचा परिसर ऊसाच्या मळ्यांनी फुलून गेला. त्यातून तयार होणाऱ्या उत्तम प्रतीच्या गुळाने सर्व हिंदुस्थानभर नाव कमावले. महाराजांनी कोल्हापूरमध्ये गुळाची बाजारपेठ उभी केली. या बाजारपेठेने कोल्हापूर नगरी हिंदुस्थानच्या व्यापारी नकाशावर ठळकपणे आणली. आज कोल्हापूर जिल्हा गुळाच्याच नव्हे तर साखर उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्रातून आघाडीवर आहे. याचे सारे श्रेय शाहू महाराजांकडे जाते.

अशा या बहुजनांच्या राजाला, लोकांच्या राजाला माझे कोटी कोटी प्रणाम।

अविनाश या. तराळ
बी. ए. भाग - ३

---



## बदलत्या वाटेवर

बदलत्या वाटेवर, मी फुलतो आहे
फक्त तुझीच आठवण, म्हणून मी जगतो आहे.
काळोखाची साथ, निराशेचा हात
दिशाभूल झाली म्हणून, चालतो आहे.
या प्रेमभंग मनाला, फक्त तुझ्याच आठवणीचा
आधार आहे, वेदनेचा भार आहे
तू निघून गेल्यावर, तुझ्या आठवणीची गाणी गात आहे.

हृषीकेश राजेंद्र फुटाणकर
बी. ए. भाग - १

## व्यक्तिमत्व विकास

आजवर व्यक्तिमत्व विकासाची गरज मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे. मानवाच्या वयोमानानुसार त्याची शारीरिक व मानसिक वाढ खुंटते. व्यक्तिमत्वातील गुणदोष दूर करून एक यशस्वी व्यक्तिमत्व विकास म्हणजे 'यशस्वी जीवन' होय . व्यक्ती ज्या परिसरात लहानाची मोठी होते तेथील भोवतालच्या परिस्थितीचा त्याच्यावर जो बरा वाईट पगडा बसतो. यामध्ये समाजातील धर्म, रूढी, परंपरा, विविध व्यक्ती, घटना, शाळा, कॉलेज व प्रसार माध्यमांच्या मार्फत व्यक्तिवर जे संस्कार होतात. आज यशाच्या सर्वोच शिखरावर पोहोचण्याऱ्या व्यक्ति कडे आपण थोडी नजर टाकली तर त्यांना यशाच्या शिखरावर घेऊन जाण्यास सर्वस्वी मानसिक क्षमतांच्या गुणांचा विकास हाच घटक महत्त्वाचा असल्याचे दिसते. व्यक्तिमत्व विकासामध्ये आत्मविश्वासाला नंबर एकचे स्थान आहे. रंकाला राजा करण्याचे सामर्थ्य असणारी निसर्गदत्त देणगी ज्याला लाभते तो आकाशाला गवसणी घालू शकतो. यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करणाऱ्या व्यक्तिचा अढळ आत्मविश्वासच त्यांना यश मिळवून देण्यास कारणीभूत ठरतो. तसेच आपल्या जीवनात ध्येय निश्चिती पण आवश्यक आहे. कुठं काय करायचं? किती वेळात करायचं? कशाचाच पत्ता नाही. अशी सुरुवात असेल तर ती अपयशाची सुरुवात होय. जीवनात ध्येय निश्चित करणे, त्याकडे सकारात्मक दृष्टी ठेवून वाटचाल करणे व मनात आखलेल्या इच्छित गोष्टीवर ठराविक नियोजित काळातच यशस्वी अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असते. व्यक्तिमत्त्व विकासामध्ये स्मरण शक्ती, ग्रहणक्षमता, विद्यार्थ्यांसाठी नियोजनबध्द अभ्यास कसा करावा? योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा, पूरक व्यायाम या सर्व व्यक्तिमत्त्व विकास वाढविण्यासाठी आवश्यक बाबी आहेत.

**मकरंद गुरव**
*बी. एस्सी भाग - १*

## पुस्तक परीक्षण

### "हसत - जगावं "

प्रचंड माहिती आणि विचार देणारं ज्ञानार्जनाच्या प्रांतातील सर्वात महत्त्वाचं माध्यम म्हणजे पुस्तक होय. वाचन हा आवडता छंद म्हणून बरीचशी पुस्तके वाचनात आली. त्यापैकीच एक महत्त्वाचं पुस्तक डॉ. रमा मराठे याचं 'हसत - जगावं 'हे होय. व्यवसायाने वैद्यकीय महाविद्यालयात अधिव्याख्यात्या असणाऱ्या डॉ. रमा मराठे यांचं 'हसत - जगावं' हे पुस्तक मराठी साहित्यविश्वाला लाभलेले सोनेरी पान आहे. डॉ. रमा मराठे याचं मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित झालेले तिसरे पुस्तक होय.

'रंग सुखाचे ' या पुस्तकाप्रमाणेच या ' हसत - जगावं ' पुस्तकाचं देखील वाचकांनी भर - भरुन स्वागत केलेले आहे. या पुस्तकामध्ये आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये जीवनात भरून राहिलेल्या ...stress and strain म्हणजेच ताण व तणाव याबाबतचे सखोल विवेचन या पुस्तकामध्ये करण्यात आले आहे.

...ताण... टेन्शन... 'दूध पीनेंमे टेन्शन है।' असं लहान मुले देखील म्हणू लागली आहेत. ताणतणावाचे मानवी जीवनातील स्थान हे अढळ आहे. या ताण व तणावांशी तोंड देताना मानवाची अवस्था ही कुरुक्षेत्रावरील अर्जुनासारखी होत असते. या ताण-तणावांपासून सुटका नाही. म्हणून त्याच्याशी मैत्री करुन त्यांना समजावून घ्यावे. आपल्या व्यक्तिमत्त्वावर त्याचा होणारा परिणाम याची सखोल जाणीव आपल्याला या पुस्तकामुळे होते.

कित्येक व्यक्ती या तणावग्रस्त असतात त्यांना आपल्या तणावग्रस्तेच्या कारणांचा पता लागत नसतो. या पुस्तकामुळे स्वत:चा स्वत:शी संवाद होतो. आत्मज्ञान मिळते. मी पणाच्या क्षितिजाची ओळख होते. मानवाची श्रध्दा ही किती सुखदायी असते याचे ज्ञान या पुस्तकातून मिळते.

या ताण-तणावापासून मुक्ती कशी मिळवावी? जीवन सुखमय कसे बनवावे? याबाबतचे सखोल मथंन लेखिका डॉ. रमा मराठे यांनी केले आहे. डॉ. रमा मराठे यांची वैचारिक प्रगल्भता ओघवती शब्दकळा मनाचा ठाव घेणारी आहे. त्यांच्या लेखणीमध्ये कोठेही कृत्रिमपणा आढळत नाही. अशा अनेक बाबींचा संगम घडून आलेले हे पुस्तक प्रत्येकाने जरूर वाचावे.

**प्रवीण विष्णू पाटील**
*बी. ए. भाग -१*



# 'वृक्ष संवर्धन' - काळाची गरज

वनांचे, झाडांचे केवळ सांस्कृतिक, पर्यावरणीय ऐतिहासिक महत्त्व आहे असे नाही. मानवाच्या दैनंदिन जीवनात, राष्ट्रांच्या निर्मितीत, जडणघडणीत वनांचा, झाडांचा फार महत्त्वपूर्ण वाटा आहे.

वृक्षांच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यापासून प्राप्त होणारे जळाऊ लाकूड, इमारती लाकूड, फळे, फुले व अर्क यांची किंमत आपणाला ठरवता येईल. पण, पर्यावरणीय फायदे मूल्यमापनामध्ये समाविष्ट होत नाहीत. मध्यम आकाराच्या ५० टन वजन असणाऱ्या वृक्षाची दरवर्षी संवर्धनात कमतरता खालील प्रमाणात होते.

**१) प्राणवायू निर्मिती :-** एका वृक्षापासून साधारण ११ टन प्राणवायूची निर्मिती होते. प्रति किलोस रुपये ४ प्रमाणे किंमत केल्यास प्रतिवर्षी मूल्य ५००० तर ५० वर्षात त्याचे मूल्य २,५०,००० इतके आकारता येते.

**२) वायु प्रदूषण प्रतिबंध व हवा स्वच्छ ठेवणे :-** आपण सद्ध परिस्थितीत वायू प्रदूषणापासून वातावरण स्वच्छ ठेवण्यासाठी कृत्रिम यांत्रिक यंत्रणा बसवतो. त्या आधारे मूल्यमापन केल्यास एका वृक्षाचे प्रतिवर्षी मूल्य १०,००० व ५० वर्षात ५ लाख इतके आकारता येईल.

**३) जमिनीची धूप थांबविणे, मृदासंधारण व जलसंधारण:-** मध्यम आकाराच्या वृक्षाच्या मुळामार्फत साधारणपणे १०० चौ. मी. क्षेत्रातील जमिनीची धूप थांबते. सुपिकता राखली जाते. या सर्व गोष्टी मनुष्यबळ वापरून केल्यास व मूल्यांकन केल्यास एका वृक्षाचे प्रतिवर्षी मूल्य रूपये ५००० तर ५० वर्षात २,५०,००० इतके होईल.

**४) आर्द्रता नियंत्रण व पाण्याचे चलनवलन :-** पानांच्या माध्यमातून वृक्षांमार्फत सतत पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याने वातावरणात आर्द्रता नियंत्रण होते व पावसाच्या चक्रामध्ये मुख्य भूमिका पार पडते. यंत्राद्वारे हे करायचे झाल्यास फक्त अनावर्ती खर्चाचा हिशेब जमाखर्च घेतला तर दरवर्षी प्रत्येक वृक्षास ६००० व एकूण ३,००,००० हे ५० वर्षाकरीता मूल्यांकन होते.

**५) पशुपक्षी व कीटकांना तसेच जीवजंतुना आश्रय-** साधारण पूर्ण वाढीच्या एका वृक्षावर ६ जोडी खार, असंख्य .कीटक, शेवाह, ऑर्कीडस इत्यादींचे वास्तव्य असते. त्यांच्या देखभालीचा खर्च रू. ५००० पर्यंत होतो. ५० वर्षासाठी २,५०,००० इतके मूल्य होते.

**६) प्रथिने रुपांतर :-** एका वृक्षापासून तयार होत असलेला खुराक दोन पिलांच्या दैनंदिन खाण्यासाठी पुरतो. एका वर्षानंतर दोन पिलांचे २५ किलो वजन गृहीत धरले आणि माशांचा दर प्रति किलो ४० प्रमाणे घेतल्यास त्याची किंमत १००० इतकी होते. म्हणजे ५०,००० इतकी ५० वर्षात होईल.

अशा रितीने मध्यम आकाराच्या एका वृक्षापासून प्रतिवर्षी रूपये ३२,००० व ५० वर्षात रू. १६,००,००० यावरून वृक्षांचे पर्यावरण संवर्धनातील आर्थिक महत्त्व लक्षात येऊ शकते.

आज भारताचे वनक्षेत्र जेमतेम १३% आहे. एकीकडे लोकसंख्येचा भस्मासूर तर दुसरीकडे वन तोड, वृक्षतोड होत आहे.

२६ डिसेंबर २००४ रोजी इंडोनेशियासह आशियातील काही देशांना भूकंपामुळे निर्माण झालेल्या सुनामी प्रकोपामुळे प्रचंड प्रमाणात जीवित हानी व वित्त हानी झाली. निसर्गापुढे मानवाचे प्रगत तंत्रज्ञान हतबल झाले.

ज्या किनारपट्टीवर खारफूटी जंगलाची तोड झाली नाही तेथे सुनामीमुळे निर्माण झालेले नुकसान अत्यल्प झाले कारण ही खारफूटी जंगले किनाऱ्याचे तटरक्षक दल म्हणून पर्यावरणामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

म्हणूनच विचार वैश्विक व कृती स्थानिक या उक्ती प्रमाणे सुजाण पर्यावरण प्रेमी नागरिकांनी आपल्या कार्यक्षेत्राच्या परिसरात, शैक्षणिक संस्था, रूग्णालये, रस्त्याच्या दुतर्फा पडिक जमिनीत अधिकाधिक झाडे लावण्याची पराकाष्ठा प्रत्येकाने केली पाहिजे व ती जगविलीच पाहिजेत.

**संदीप न्हाटोळ,**
*बी. एस्सी. भाग - २*



## ॥ प्रेम ॥

ती त्याना आवडते ? ती आकर्षक असते, सुंदर दिसते. तिचं चालणं, बोलणं, नटणं, राग, हास्य, तिची प्रत्येक चाल अन् हालचाल त्याला आवडत असते. सुरुवातीच्या काळात नकाराच्या प्रचंड भीतीपोटी तो आपलं प्रेम व्यक्त करायला घाबरत असतो. डोळ्याची भाषा तिला कळते. अन् मग तीच पुढाकार घेते. तिच्यातही त्याच्याविषयी प्रेम अंकुरलेलं असतं. तासाला दांडी मारून लायब्ररी, कॅंटीन किंवा कॉलेजला दांडी मारून निवांत एकांत शोधला जातो. अशा एकांतात बोललं तरी काय जातं ? काय विषय असतो बोलायचा ?

विषय वेगवेगळे असतात. सिच्युएशन्स वेगवेगळ्या असतात. पण सांराश एकच असतो.
घरच्यांचा विरोध !
समाजाचा विरोध !
सामाजिक दडपण,
जग काय म्हणेल !
घरातुन बाहेर काढलं तर काय करायचं काय?
काय खायचं ? कुठं राहायचं ?
कसं जगायचं ?

या सगळ्या प्रश्नाच्या झळा दोघांनाही खूप उशीरा जाणवायला लागतात. भोवताली असणाऱ्या मायावी जगाचा विसर पडू लागतो.

खरंच...एकदा प्रेम करून पहावं, आपल्या प्रेयसीशी गुलुगुलु गप्पा माराव्यात आणि पुन्हा एकांतात भेटण्यासाठी घरी, कॉलेजमध्ये काय थापा माराव्यात. याच संशोधनही करावं. या सगळ्या गोष्टी इतक्या रोमॅंटिक असतात की त्या प्रेमात पडलेल्यानाच कळतात.

पण यापासून वास्तव जीवन वेगळे असते व त्याचे विदारक चटके बसायला सुरुवात होते. विरहातच खरी मजा असते अन् विरहातच गोडी असते. हे लिहायला किंवा वाचायला खूप मस्त वाटतं पण... प्रेमप्रकरण घरी समजल्यानंतर मुलीच्या घरच्या लोकात प्रचंड मोठी लाट उसळते. तिला अपमानस्पद वागणूक मिळते. शाळा, कॉलेज बंद होते. तिच्या लग्नाचाही बेत सुरु होते. संपर्क तुटतो आणि ती खिडकीच्या आतून खिन्नपणे पहात असते, आपला प्रियकर दिसतो का?

त्याचीही अवस्था याहून वेगळी नसते. पण तो आपलं दु:ख मित्राजवळ व्यक्त करू शकतो. तिच्याशी पळून जाऊन लग्न करायचा प्लॅन करतो. मित्रमंडळी सदैव सेवेस तप्तर असतातच. कोणी पैसे जमवत असतं, कोणी जागा निवडत असतं. कुणी आपल्या प्रेयसीमार्फत तिच्याकडे निरोप पाठवून तिचा अंदाज घेत असतं. मात्र मानसिक शांततेचा भंग होण्याचे प्रसंग टाळले पाहिजेत. दोघे एकाच जातीतील असतील, तर समस्या एवढी तीव्र नसते. आंतरजातीय प्रेमप्रकरणात खूपच दक्षता घ्यावी लागते.

यामध्ये काही सफल होतात तर काहीच्या पदरात फक्त निराशाच पडते.

**संदीप प्रकाश शेट्टी,**
बी. एस्सी-१



**वैभव आरडे,**
बी. एस्सी भाग - १



# "चारित्र्य"

"चारित्र्य" हा सौंदर्यापेक्षा स्त्रिचा मौल्यावन दागिना आहे त्याचप्रमाणे चारित्र्य हा एक असा दागिना आहे की ज्याला गुलाबाच्या फुलाप्रमाणे जपावे लागते. कारण स्त्रिला फुलाप्रमाणे नाजूक समजले आहे. पण आजकालच्या कलियुगात चारित्र्याचा लोप होत आहे. आजच्या युगात चारित्र्य हाच मनुष्याचा खरा दागिना समजला जातो.

हल्लीच्या तरूणीने जीवनातील चांगल्या वाईट गोष्टी विषयी पारख करणे जरूरीचे आहे. शिक्षण व इतर गोष्टीचे ज्ञान घेऊन जगाची पारख करून घेणे आवश्यक आहे. जगाच्या कोणत्याही स्तरावर स्त्रिला ३३% आरक्षण देण्यात आले आहे. ज्याप्रमाणे मराठी टी.व्ही. वरील एक सिनेमा जो कॉलेज लाइफ स्टाईलबद्दल दाखवला. 'सातच्या आत घरात' हा सिनेमा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना ज्ञान देणारा आहे. हल्लीची कॉलेज तरूणी आपल्या जन्मदात्या पित्यास सांगते की, ' ही हल्लीची तरूण पिढी आहे ही स्टाईल आहे. फॅशन आहे' पण ज्या वेळी मैत्रिणीवर बलात्कार होतो त्यावेळी सर्वजण तिच्या चारित्र्यावर संशय घेतात. स्त्रीवर अत्याचार होताना हल्लीचे फॅशनेबल वागणे काही अंशी जबाबदार असते हे जाणून घेणे स्त्रियाना आवश्यक आहे. स्त्रीचे चारित्र्य जर स्वच्छ असेल तर हल्लीच्या जगात तिला ताठ मानेने वावरता येते. तिला मान सन्मान मिळत असतो.

आजकालच्या पिढीची वेशभूषा पाहता स्त्रिचे कपडे वेळो-वेळी छोटे होत चालले आहेत. शरीर झाकण्यासाठी कपडे असतात. फॅशन करावी म्हणून नव्हे . झाडाना हिरव्या पानाने, भूमीला मातीने, आकाशाला ढगाळ वातावरणाने ज्या प्रमाणे झाकून त्याचे सौंदर्य दाखवले आहे. त्याच प्रमाणे स्त्री एक मंदिरातील कोरीव मूर्तीप्रमाणे सोज्वल, शांत निर्मल असावी.

स्त्री घराण्याची इज्जत असते. घराचा पाया स्त्री जीवनातून होतो. स्त्री चारित्र्य असा हिरा आहे की ज्यास एखादा कलंक लागल्यास तो आयुष्यभर साथ सोडत नाही. सिनेमा, नाट्यगृहात ज्या प्रमाणे स्त्रिया कपडे वापरतात तसेच सर्व तरूनींनी वापरणे आवश्यक आहे का? रोज मारण्याचे प्रकार, स्त्रियावरील अत्याचार या सर्व गोष्टी आपण दररोजच्या जीवनात, वृत्तपत्रात , टी.व्ही. वर ऐकत, वाचत असतो तरीही त्या असे का वागतात ?

कधी पर्यंत हे चालणार ? पुरुष स्त्रिला वाईट नजरेने केव्हा पर्यंत पाहणार ? तिच्यावरील अन्याय कधी नष्ट होणार ? हे सर्व प्रश्न करण्यापूर्वी लोक हे का समजून घेत नाही की आपले कुठे तरी चुकत आहे ? आपल्या घरातच जर पाणी मुरत असेल तरच लोक आपल्या घरच्या स्त्री कडे वाईट नजरेने पाहणार. हल्ली कॉलेज तरुणींनी चांगल्या प्रकारची कपडे घातली तर तरुणाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. जर शॉर्ट कपडे वापरून फॅशन करायला लागला तर तरुणाची नजर आपोआपच स्त्री कडे वळते व अशा कारणाने स्त्रिया अशा नजराना बळी पडतात. म्हणजे अग्निजवळ लोण्याचा गोळा नेला की तो विरघळणार. सौंदर्य हा दिखाव्याचा दागिना नसतो तर ते असे प्रतिबींब असते जे परमेश्वराची देणगी आहे.

झाडाला फुले लागतात. परंतु ती संध्याकाळ होताच कोमेजून जातात. त्याच प्रमाणे आपल्याला जीवनात सुख-दुःखाची वाटचाल चालू राहते. म्हणून आयुष्य चैनीत न घालवता आपण जे जन्माबरोबर जे कार्य हाती घेऊन आलो आहोत ते पूर्ण करा.

जगात अनेक गोष्टी असतात. ज्या ऐन वेळी भुरळ घालून घेणाऱ्या असतात. योग्य वेळी आपण जर सावरलो तर आपल्या आयुष्याचे सोने होते. अनेक विचारवंतानी स्त्रियाना खूप सुंदर उपमा दिल्या आहेत. जग आणि जगातील अनेक मौल्यवान वस्तू असतात. पण स्त्रिचा मौल्यवान दागिना सुशील व प्रेमळ, स्वभाव मानला जातो.

जेव्हा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन स्त्रिच बदलेल त्यावेळी खूप उशिर होतो. त्यामुळे स्त्रीने वेळेतच सावरले तर, तिच्या घरच्यांचा व स्त्रीजीवनाचे सार्थक होते.

मनुष्याकडील धन - संपत्ती, वैभव बंगला हे सर्व जरी गेले तरी मनुष्य आपल्याकडे ते सर्व परत उभा करू शकतो. पण जर त्याचे चारित्र्य गेले तर तो कधीही काही उभा करू शकत नाही.

**कु. रेश्मा रामचंद्र पाटील**
*बी. ए. भाग -३*



## काल्पनिक देवांची आवश्यकता आहे का ?

हजारो वर्षे देवांची संख्या सूर्य, पर्जन्य आणि अग्नी इतकीच मर्यादित राहिली असावी. वर्षामागून वर्षे उलटून गेली, हळूहळू ग्रह-ताऱ्यांची स्थिती कळायला लागली, मुंगीच्या गतीने माणूस प्रगती पथावर पावलं टाकू लागला आणि त्याचबरोबर देवांची संख्या तीनवरून तेहतीस कोटींवर पोहोचली. अद्‌भुत आणि चमत्कारीक कथांचं प्रश्न फुटल. जितके देव तितक्या कथा. देवांना स्वर्गाचं साम्राज्य बहाल केले गले, कुठल्या ग्रंथात, ग्रंथकार किंवा कोणी मनुष्य स्वर्गात जाऊन तिथल्या घटनांचा साक्षीदार झाल्याचं आढळत नाही. पण स्वर्गातल्या देवांच्या आणि त्यांच्या राज्यांच्या हजारो कथा निर्माण झाल्या प्रत्येक देवाच्या सवेचे वेगवेगळे मार्ग निर्माण झाले उपासनेचे नवनवे प्रकार आले. निवडक सात देवांना आठवड्याचे वार वाटून देण्यात आले. वेगवेगळ्या देवांच्या स्तुतीसाठी वेगवेगळी आरती आली, प्रसाद आला, तीर्थ आलं, जाती-जातीत देवांची विभागणी झाली, देवांना आकार देण्यात आले. रूप देण्यात आलं, रंग भरविले मंदिरे बांधली, समई जळू लागली आणि देवांची मर्जी सांभाळण्यासाठी कर्मकांड आणि व्रत-वैकल्य सुरु झाली. येथून विषय सुरु होतो तो म्हणजे अंधश्रध्देचा.

आपलं जीवन सुखावह आहे. आपल्या हातुन काही चुका झाल्या, शक्तीला न आवडणारं काही घडलं तर तिचा क्रोध होईल. पूर, वादळ, दुष्काळ, रोगराई, संसर्गजन्य साथी आणि जीवन उध्वस्त करणाऱ्या अनेक घटनामागे या शक्तीचा कोप हेच कारण गृहीत धरून आप ण या शक्तीच्या सानिध्यात असावं, या शक्तीचा वास आपल्या जवळपास असावा तिचं गुणगान गात आहोत तिच्यापुढं नतमस्तक आहोत हे तिला कळू शकेल आणि तिची कृपा लाभेल पण शक्ती दिसत नव्हती, अंतर समजत नव्हंत पण अस्तित्व जाणवतं होतं म्हणून मग माणासाने ही शक्ती, हे दैवत अनेक रुपात, प्रकारात, आकारात पृथ्वीवरच निर्माण केले. देवांनी मग शरीर धारण केलं. अनेक हाताचे, तोंडाचे आणि विचित्र शरीर धारण करून देव असतो. हे देव म्हणजेच न गवसलेल्या शक्तीचे प्रतिक असतो. ही एक काल्पनिक निर्मिती आणि त्यासंबंधीच्या कथा म्हणजे सहज प्रवृत्तीतून ज्यावेळी माणासाला कशाचाच बोध होत नव्हता तेव्हा त्याला देवाचाच आधार वाटत होता घडणाऱ्या गोष्टी घडतच होत्या पण तेव्हापासूनच माणसाचा एक समज पक्का झाला की, आपल्या सुखकारक गोष्टीमागे देवाचा आशीर्वाद आहे. आणि दु:खकारक गोष्टी आपली पापे, चुकांबद्दल देवाने दिलेली शिक्षा आहे या अशा भावना देवाबद्दल बाळगण्यात वाईट काय आहे ? काहीच वाईट नाही, चूकही नाही, उलट या देवाच्या अस्तित्त्वाच्या कल्पनेने आणि त्याच्या न्यायाने वाड्यावरील विश्वासाने माणूस सन्मार्गालाच लागला असता वाईट मार्गापासून दूर रहिला असता. पण असं घडलं नाही. माणसांच्या एका अंगाला देव असला तरी दुसऱ्या आणि सुविधांच्या शोधांची आकांक्षा होती. संपत्तीची लालसा होती, जे जे गुण-दुर्गुण माणसात आज आहेत ते जसेच्या तसे पुरातन काळातही असले पाहिजेत.

माणूस रानटी अवस्थेतून हळू हळू बाहेर पडत होता. टप्प्याटप्प्याने सुधारत होता. प्रयोग करीत होता. प्रगतीकडे झेपावत होता. खाण्याच्या सवयी बदलत होता. आचार विचार, चलन, दळण-वळण, शस्त्र-वस्त्र स्वीकारत अधिक प्रगती करीत होता. कालबाह्य झालेलं सगळं सोडून बुध्दीच्या प्रगल्भतेवर तो पुढे पुढे झेपावत होता. देवाची साक्ष आणि साथ घेऊन अंतर दिलं नाही ते फक्त देवाला.

माणसं नवस बोलतात आणि कोंबडी बोकडांपासून कोवळ्या बालकांपर्यंत कुणाचीही देवासमोर हत्या करतात हे निमुटपणे पहाणाऱ्या देवाजवळ आपली सलगी कशासाठी ? जे जे खाद्यपदार्थ आपल्याला आवडतात नेमके तेच पदार्थ किंवा वस्तू देवासमोर ठेवून प्रसाद म्हणून खातात. दुकानातील आणलेले नारळ, पेढे, फळे, देवासमोर ठेवल्यावर काहीही प्रक्रिया न होता त्याचं प्रसादात रुपांतर कसं होते ? ग्रहशांतीचा परिणाम वाफ, वायू, कचरा, दगड यापासून बनलेल्या निबुध्द ग्रहांवर कसा होतो ? आपल्या आजोबा - पणजोबांच्या प्रतिमा आपल्याला माहीत नसताना हजारो वर्षापूर्वीच्या कथातून आलेल्या देवांच्या तसबिरी कुठल्या आधारावर तयार

झाल्या? देवदर्शनाला जात असताना माणसे अपघात होऊन मरतात. देवदर्शन घेऊन परतीच्या रस्त्यावर मरतात, देवळात पडझड होऊन मरतात, देवासमोर चेंगराचेंगरीत मरतात देवाच्या दारात खून, बलात्कार होतात. देवाच्या समोर दारूचे अड्डे, देवाच्या अंगावरचे दागिने चोरीला जातात. धातूचे दिवे बाजारात चोरून विकले जातात. या सर्व वेळी देव तटस्थ का असतो? मला वाटतं तो तटस्थ नसतो. तो मुळातच नसतो, असतो फक्त कल्पनेत.

देवाचं अस्तित्व नाकारणाऱ्याला दोन विधानं नेहमी ऐकायला मिळतात. एक म्हणजे अनुभव याचा लागतो आणि दुसरं म्हणजे म्हणजे झटका की ती पूर्वकर्माची फळ, आता यातला फोलपणा तपासून पाहण्यासारखा आहे. माणसाचं आयुष्यच झटक्यांनी भरलेलं असतं. सद्वर्तनी, निष्कपटी, निर्व्यसनी, निष्पाप, निर्लोभी आणि आयुष्य ईश्वरसेवेला वाहून घेतलं. आपल्याला पूर्वीचे कर्म, पाप माहित नसताना त्याचं फळ भोगायला लावणारा देव काय हुकूमशहा आहे ? शिक्षा भोगायची तर गुन्हा काय आहे ते समजण्याचा आपला हक्क आहे.

अबोल माणसाच्या मनात काय आहे हे समजणं कठीण असतं. मानवाने निर्माण केलेला देव बोलत नाही, खाणाखुणा करून काही सांगत नाही. त्यामुळे आपल्याकडून त्याची काय अपेक्षा आहे हे कळत नाही. आपण केवळ अंदाज करीत असतो. काय केलं असता तो रूष्ट होणार नाही याचे आराखडे बांधीत असतो, त्याचं मन सांभाळण्यासाठी, मर्जी संपादनासाठी सतत आपण पापी गुन्हेगार असल्याची कबुली देत राहतो आणि स्तुतीपर स्तोत्रांनी त्याच्यापुढे लोटांगण घालीत असतो. देवाबद्दलच्या प्रेमापेक्षा त्याच्याबद्दल आंतरिक भीतीचा भाग फार मोठा असतो. यातूनच उगम झाला तो घातक व अंधश्रध्देचा आणि निरर्थक कर्मकांड व्रत-वैकल्यांचा.

जे जे चांगले ते म्हणजे देव आणि जे जे वाईट ते म्हणजे दानव असं मानलं तर देवत्त्व हा गुण होतो आणि देवत्वाला पोचले शेकडो लोक आपल्याला संरक्षण पुरवायला कारणीभूत आहेत.

मानव हा ईश्वराचा अंश आहे हे समजा थोडा वेळ मान्य केलं तर जो कोणी ईश्वराचा अंश संकटात आहे. आजारी आहे, अडचणीत आहे त्याची सेवा करणं म्हणजेच सत्कर्म. मानवाच्या अशा सेवेची संधी मिळाल्यावर मंदिरातल्या देवदर्शनाची आवश्यकता राहते कुठे ? तेव्हा लक्षात घेतले पाहिजे की आपण ज्या ईश्वराचा अंश आहोत असे मानतात त्यांना ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा सरळ सोपा मार्ग म्हणजे मानवसेवा. ईश्वरप्राप्तीसाठी एवढा सोपा मार्ग असताना कशाला हवा अट्टाहास त्या दर्शनाचा ? उपासाचा आणि खडतर कर्मकांड आणि व्रतांचा ? केवळ एक देव या नावाखाली देशात रोज करोडे रूपये खर्च केले जातात.आता सगळ्यांनी कल्पनेतला देव टाकून श्रम,मानवता यालाच देव मानले पाहिजे.

**कु. अर्चना बाळकृष्ण पोवार**
बी. ए. भाग-३

## कुणाला काय कळले...

तुझ्यावर प्रेम करता करता
आयुष्य असंच निघून गेलं
आयुष्यात खूप काही करायचं होतं
पण करायचं राहून गेलं

पुन्हा तुला गावात पाहिले
मंगळसुत्र गळ्यात पाहिले
माझेच मला बुडताना
मी पाण्यात पाहिले

तुझ्यासाठी गुंफत होतो प्रेमाचा धागा
पण वास्तव कळाल्यावर मी झालो जागा

तेव्हा मला कळले
जीवन हे एक गणित आहे
विवाह ही एक गणती आहे
प्रेम त्याची वजाबाकी आहे
आयुष्य हा त्याचा भागाकार आहे
अखेर मृत्यु हेच त्याचे उत्तर आहे.

**विनय वासुदवे वाजे**
बी. एस्सी भाग-३



# आजची स्त्री

जेथे स्त्रिला योग्य मान दिला जातो तेथेच देवतांचा वास असतो, असे भारतीय संस्कृती अभिमानाने सांगते. पूर्वी स्त्रिला वेलीची उपमा दिली जात असे. वेल उभी राहते ती वृक्षाच्या आधाराने. त्याप्रमाणे स्त्री ही पुरुषाच्या आधाराविना उभी राहूच शकत नाही. अशी एक कल्पना होती. बालपणी पित्याच्या, तरूणवयात पतीच्या, वार्धक्यात पुत्राचा आधार स्त्रिला घ्यावा लागतो हीच समजूत होती. कारण स्त्री ही अबला आहे हे तिच्या मनात ठासून भरविले होते. स्त्री चे कार्यक्षेत्र म्हणजे स्वयंपाकघर, फार झाले तर माजघर असे मानले जात होते. अशा या स्वार्थी पुरूष प्रधान समाज रचनेत स्त्री एक माणूस आहे या गोष्टीचाच मुळी विसर पडला होता. स्त्री ही प्रतिष्ठेची बाब ठरली होती. स्त्रीला शोभेची वस्तूच समजले जात होते. स्वतः:च्या मुलांवरही त्या बिचाऱ्या अभागिनीचा अधिकार नसे.

या सर्व पुरूषी दादागिरीला नव्या युगातील स्त्रीने जबरदस्त धक्का दिला आहे. आपल्या भोवती उभारल्या गेलेल्या अनेकविध बंधनांचा पिंजरा तिने पार तोडून टाकला आहे. वर्षानुवर्षे तिला बंद केलेल्या वाटा तिने स्वतः साठी खुल्या केल्या आहेत. आणि स्वतः:च्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे की स्त्री अबला नाही ती एक कर्तबगार तेजस्वी महिला आहे. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक सारे निर्णय ती पुरुषाइतकेच किंबहुना अधिक निर्भयतेने, धाडसाने घेऊ शकते.

स्त्रीचे हे कर्तृत्व आज अनेकानी मान्य केले आहे. महात्माजींना स्त्रिच्या अलौकिक सामर्थ्याचा साक्षात्कार घडला होता. ते म्हणत, एक माता ही शंभर शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ आहे. तुम्ही प्रथम स्त्रिला शिक्षणाची दारे खुली करा मग कुठलीही सुशिक्षीत माता आपल्या मुलांना अशिक्षीत ठेवणार नाही.

आता काळ केवढा बदलला आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. शिक्षक, डॉक्टर, इंजिनीअर यासारख्या व्यवसायातही स्त्रियांनी अलौकिक यश मिळविले आहे. तर भारतात पंतप्रधानपदी विराजमान झालेल्या इंदिराजी किंवा ब्रिटनच्या मार्गारेट थॅचर यांनी आपल्या अलौकिक कर्तृत्वाने स्त्रीच्या अंगी असलेल्या अलौकिक गुणसमुच्चयाचे दर्शन सर्वांना घडविले आहे.

आजच्या स्त्रीने तर आपल्या कर्तत्वाने सिध्द केले आहे की कोणत्याही क्षेत्रात ती मागे नाही. आता स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून अंतरिक्षात देखील भ्रमण करून आली आहे. ती ज्ञानार्जन करून नवसंशोधन साधते. अंटार्क्टिकासारख्या अज्ञान खंडाचा शोध घेऊ शकते कलेच्या प्रांगणात सहजगत्या भराऱ्या मारते आणि कोट्यावधी जनतेची शासनकर्तीही होऊ शकते. कोणतीही सामान्य स्त्री आता आपले स्वतः:चे निर्णय स्वतः घेऊ शकते स्वतः:चे कार्यक्षेत्र स्वतः निवडू शकते. स्वतः:च्या जन्माचा जोडीदार ती स्वतः पसंत करू शकते.

कारण ती पण एक समर्थ माणूस आहे !

**कु. शीतल हळदकर**
*बी. ए. भाग - १*

---

# सीमा

सीमेवरती एखादी गोळी
छातीत जशी घुसावी
हाडांचा सांगाडा मोडून
पलिकडे ही जावावी

जीव जावा सीमेवरती
नको खंत ही मरणाची
लाचारवाण्या मरणापेक्षा
प्राण घ्यावा देशासाठी

मरणाची भिती कोणाला?
जीव हा मुठभर माती एवढा
संगिणीची शपथ आम्हाला
सदैव देशाच्या येईन कामाला.

**कु. शिल्पा. नकाते**
*बी. एस्सी. भाग - १*

**नाती असती मनामनांची, नाती असती क्षणक्षणांची
उमलणाऱ्या त्या अंकुरांची, सामावून घेणाऱ्या त्या मातीशी.**

आयुष्याच्या वाटेवर चालणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचा अनेक घटनांशी काहीना काहीतरी संबंध असतोच. हा हिंदीतला संबंध इंग्रजीमधला 'रिलेशन' आणि मराठीतला दोन अक्षरी पण घटनेनुसार अर्थ म्हणजे 'नाती'.

खूप रंग आहेत या शब्दाचे एकाच बासरीतून निघणाऱ्या सुरांचे अनेक प्रकार असतात ना अगदी तसेच ! रखरखत्या सृष्टिला आपल्या तृप्त जलधारांनी न्हाऊ घालणाऱ्या घटनांचं नातं, नुकत्याच जन्माला आलेल्या बाळाचे आणि त्या आईशी नातं, आणि भाबड्या भक्तांचं आपल्या देवाशी असलेलं नातं, यात जे सौंदर्य असते ते अगदी इंद्र दरबारालाही फिकं पाडेल अस असतं. मराठीत अनेक शब्द आहेत पण जात हा असा शब्द आहे की त्याचा दुसरा अर्थ समजाविण्यासाठी त्याचाच वापर करावा लागतो. नातं भाव-भावनांचं असतं शब्दाशब्दाचं असतं, प्राणी पक्षांचं असतं, सजीव - निर्जिवांचं असतं.

नाण्यांना जशा दोन विरुध्द टोकाच्या बाजू असतात तशाच नात्याला देखील असतात. नातं आईचं आपल्या सख्या मुलाशी असतं आणि त्या आईचं आपल्या सावत्र मुलाशीही असतं पण किती तफावत असते या दोन नात्यांत. एकाच प्रभू रामाचं हनुमानाशी असलेले नातं आणि त्याच प्रभू रामाच रावणाशी असलेले नातं, एक नातं नेहमी तारतं तर दुसर मारतं. प्रसंगानुरूप त्याचं रूप बदलतं. गोंडस निरागस बाळ जेव्हा या जगात जन्म घेते तेव्हा पासून त्याच्या आयुष्याची जडण-घडण होत असते. जे वातावरण, जे प्रसंग ते बाळ पाहत असत त्याचाच ते स्वीकार करित असते. ज्या प्रकारच्या नात्याची देवाण-घेवाण होत असते. तीच त्याच्या जीवनाला आकार देत असतात. मवाली वस्तीत वाढणारी मुलं आणि सुसंस्कृत घरात वाढणारी मुलं आपापली नाती जोपासतात. एक नातं मुलाला गुंड तर दुसरं एक चांगला माणूस बनवतात.

जीवनात थेंबाएवढं सुख आणि सागरा एवढं दु:ख असतं. हरतो तो मरतो आणि जिंकतो तो जगत असतो. जिंकणाऱ्यांच्या पाठीमागे चांगल्या नात्यांची खंबीर साथ असते. मात्र हारणाऱ्यांच्या मागे नक्कीच दुबळ्या नात्यांची घाण असते. सर्वच गोष्टी नशीबावर सोपवून चालत नसतात. शक्य तितक्या गोष्टी आपणच बनवायच्या असतात. "केल्याने होत आहेरे। आधी केलेची पाहिजे."

करणाऱ्यांच्या साठी काहीच अशक्य नाही. पण करता येत असुनही न करणे या सारखे वाईट ही काही नाही. प्रत्येकाने चांगली नाती जोडायला हवीत. वाईटांशी नाती चांगली बनवणे हे पुण्य नव्हे आणि चांगल्याशी नाती न बनवणे हे पुण्य नव्हे. शालिनता, उदारता, आचार - विचार, निरीच्छता, प्रसिध्दी पराङमुखता, हव्यास, संयम, व संतुलन या सर्वांनी सांमाविष्ट अशी नाती आपण बनवली पहिजेत जशी नाती जुळतात तशी तुटतातही पण चांगल्या नात्यांना आपण विसरून चालणार नाही.

विठाई माऊलीची वत्सलता, चंद्रम्याची स्निग्धता, सागराची गंभीरता आणि उदारता व सरस्वतीची बुध्दीमत्ता लाभलेल्या जिजामातांनी आपल्या सर्व गुणांनी शिवरायांचे मन ओत प्रोत भरले होतं. त्यातुनच ते घडले पण मोठे झाल्यावर ते आपल्या माऊलीच्या नात्याला कधीही विसरले नाहीत. त्यांनी अखेर पर्यंत या नात्याचं कर्तव्य निभावल होतं. आई आपल्या सासरी जाणाऱ्या मुलीला सांगते -

*वाडवडीला सेवित जावे / सवतीशी प्रेम धरावे*
*पति कोपी नम्र असावे / सेवकांवरी सदय व्हावे*
*निजधर्मा दक्ष रहावे / भाग्य येत मत न व्हावे...*
*अशी तु नाती जपत जा,*

सर्वांनी असं करण्यास काय हरकत आहे.

*गगणी शिखरे चढत जा,*
*विजयाचा झेंडा लावत जा,*
*तोल सावरणाऱ्या त्या मातीशी*
*आपलं नातं तू जपत जा.*

**युवराज मोरे**, *बी. ए. भाग -३*



⇦ **युवराज डावरे**
*बी. ए. भाग -२*

## निरोपसंध्या

मी रात्रीतल्या शांततेच्या अंधाऱ्या जगात सामील
घरात टेबल सोडून सगळीकडे अंधार
मी मनातल्या मनात - हरवल्यासारखा,
आठवणींचे एकेक पान उलगडत,
शोध घेत बसलेला,
दुरवर उडून गेलेल्या क्षणांचा शोध घेत बसलेला.
माझा अन् तुझा.

सकाळचं जेवण - गडबड धावपळ,
पेन,वह्या, न पुस्तकं
कॉलेजचा लांबच-लांब रस्ता.
ग्रंथालयाचा पेपर
परिपाठाच्या वेळेला दिलेलं लक्ष
पाठीमागच्या बेंचवर केलेला दंगा
प्रॅक्टीकल.
संध्याकाळी परत येतानाचा हवेचा शांत झोका

रांगोळी प्रदर्शन अन् टिप.
साडी डे फ्रेंडशीप डे...
व्हलेंनटाईन नि गॅदरिंगची गाणी,
परीक्षेचा फॉर्म - अभ्यासाची धावपळ

त्या रात्री त्या मध्यरात्री...
ते शब्द, ते क्षण
ती स्वप्नं
सारं काही खूपच उदात्त अन् हसरं...
तुझ्यासारखं
न् एकाकी निरोप समारंभ
ती भावनिक संध्याकाळ
कॉलेजच्या पायऱ्यांपाशी
कॉलेजच्या पायऱ्यांपाशी
जणू काहीतरी हरवल्याचा भास,

कुठंच नाही कुणीकडेच शांतपणा नाही
मी खरंच सांगतो,
सारंच काही शब्दात मांडता यायचं नाही
माझे श्वास धुंद आहेत
अन्
माझं मनही धुंद आहे....

**अवधुत सुतार**
*बी.एस्सी भाग -३*

## सोस

मरणाची सोय हवी जगण्याचा सोस हवा
डोळ्यांतील अश्रुंना पाण्याचा ओघ हवा
चिंब-चिंब भिजण्याचे श्रावणात भाग्य हवे
दुसऱ्याच्या दु:खाशी थोडसे सख्य हवे
चुकलेल्या वाटांची, चुकल्यावर खंत नको
नसलेल्या दु:खाचा हृदयाला संग नको
आहे जोवर सगळे, जगण्याचे बंध हवे
सांज जवळ येताना, जगणे नि:संग हवे
गाण्याला बसताना मैफलित दाद हवी
स्वप्नांच्या वाटेवर, सजणीची साद हवी
तुटण्याचा, कुटण्याचा देहाला छंद हवा
सोन्याच्या हातांना घामाचा गंध हवा
अश्रुंना जपताना ओठी आनंद हवा
सरणावर जळताना आत्मा स्वच्छंद हवा
मरणाची सोय हवी, जगण्याचा सोस हवा

**कु. जयश्री पाटील**
*बी. एस्सी. भाग -१*

## जीवनाच्या वाटेवर ...

जीवनाच्या वाटेवर
काहीतरी सांगावसं वाटतं
जन्माला आल्यावर
थोडं जगावसं वाटतं,
स्वप्न पाहिल्यावर
ते पूर्ण करावसं वाटतं
दु:ख झाल्यावर
थोडसं सुख अनुभवावसं वाटतं
निरभ्र आकाशात
फिरणाऱ्या पक्षाला पाहिल्यावर
त्याच्याप्रमाणे
उंच भरारी माराविशी वाटते
संकटात सापडल्यावर कुणाचा तरी
आधार मिळावा असं वाटतं
खरंच... जीवनाच्या वाटेवर
खूप काही शिकायला मिळतं.

**अमोल मोरे**, *बी. ए. भाग -१*

## मर्द आम्ही मराठे खरे...

मर्द आम्ही मराठे खरे, दुश्मनला भरे कापरे
देश रक्षावया धर्म तारावया, कोण झुंजण्यास मागे सरे
वादळापरी आम्ही पुढे चालतो
जय शिवाजी गर्जुनी रणात झुंजतो
मराठा कधी न संकटातून हटे
मारुनी दहा एक मराठा तो
सीमा ओलांडूनी धावती संगिणी पाय आता न मागे सरे
मर्द आम्ही मराठे खरे..
व्हा पुढे आम्हा धनाजी, बाजी सांगती
वीर हो उठा कडाडताच नौबती
विजय घोष दुमदुमे पुन्हा दिंगतरी
पूर्वजा परी आम्ही अजिंक्य सागरी
घेऊ शत्रूवरी झेप वाघापरी मृत्यु आम्हापुढे घाबरे
मर्द आम्ही मराठे खरे...
भारता आम्ही तुलाच देव मानतो
हाच महाराष्ट्र एक धर्म जाणतो
राखतो मराठा आमुची परंपरा
रक्त शिंपून पवित्र ठेवितो झरा
त्याच मातीवरती प्राण गेला तरी आमुची वीर गाथा उरे
मर्द आम्ही मराठे खरे, दुश्मनाला भरे कापरे
देश रक्षावया धर्म तारावया, कोण झुंजण्यास मागे सरे ?

**पाटील दत्तात्रय**
*बी. ए. भाग -३*

## नजरा

*रंग तुझा गोरा-गोरा..*
*डोळे तुझे घारघारे ;*
*केसांत तुझ्या सदैव गजरा,*
*साऱ्यांच्या वळतात तुझ्याकडे नजरा .*

**रोहन फुटाणकर**
*बी. ए. भाग - १*

## ।। जनतेचं राज्य हाय म्हणत्यात ।।

जनतेचं राज्य हाय म्हणत्यात
जनतेचं राज्य हाय म्हणत्यात दादा म्हणत्यात ।

साऱ्या जनतेची एकजूट करुनी,
इंग्रजांना दिले हाकलूनी,
स्वराज्य मिळवलं साऱ्या लोकांनी,
बगळयांनी घेतली वेळ साधूनी,
दिल्ली दरबाराला बसली धरुनी,
सत्तेची खुर्ची घट्ट धरुनी,
आपल्या हिताचा कायदा करुनी,
पिळवणुकीचं जाळं पसरुनी,
जनतेचं सेवक म्हणत्यात,
जनतेची तिरडी बांधत्यात ।

निवडणुकीचं नाटक करती ।
मतासाठी किती पैसा उधळती ।
मक्तेदारांना पैसा देत्याती ।
पैसा असतो सारा ह्यांच्या हाती ।
वाटेल ते करून निवडून येती ।
भांडवलशाही टिकवाया बघती ।
लोकशाहीचे गोडवे गात्याती ।
हुकूमशाही संगे जोडली नाती ।
अहिंसावादी म्हणात्याती दादा ।
गोळ्या मजुरांवर झाडल्याती ।

देशभक्त म्हणवूनी घेती ।
देशाची भलतीच काळजी करत्याती ।
महागाईचे चेटूक करून ठेवत्याती ।
कामगांराची मजूरी कापत्याती ।
भ्रष्टाचारावर भलती भक्ती ।
देशाच्या काळजीनं बारीक झाल्याती ।
बिनमापाचे सदरे शिवत्याती ।
धोतर न्हाईनात पोटावरती ।
त्यागाच्या गप्पा मारत्याती दादा ।
भरत्यात, तिजोऱ्या खचून भरत्याती ।।

**मारुती मुधोळकर**, *बी. एस्सी. भाग- १*

# क्षण प्रेमाचा

श्रावणातला वारा अंगाला स्पर्शून जावा आणि अलगद जाग यावी तशी मैत्री जीवनात येते. कदाचित मैत्रीचं नातं ते पानावरच्या दवबिंदूसारखं सुंदर पण काही क्षणापुरतं. त्यातूनच निर्माण होतात प्रेमाची गोड नाती. तीही कधी कधी नशीब हिरावून नेतं आणि उरतात फक्त आठवणी. मन दाटून येतं आणि डोळ्यात अश्रू थांबत नाहीत.

या जगात वावरलोय मी, खूप नसलं तरी थोडंसं जग पाहिलय मी ! खूप फसवं असतं ते. अशा या मृगजळात प्रेम करणारी माणसं फारच कमी सापडतात आणि मिळालेली माणसं नशीबाच्या कृज्ञतेने हिरावून घेतली जातात. सारं काही मनातल्या मनात दाबून, हसत फिरण्याची सवय असते माणसाला, जखमांच्या खपल्यांची चिलखत बनवून हृदयावर पांघरणंही जमू लागलय मला बऱ्यापैकी. आयुष्यातल्या प्रत्येक क्षणाची आठवण मोर पिसासारखी जपून ठेवलीय मी. परंतु वाळवंटातल्या वादळात पाय रोवून उभं राहण्यासाठी आवश्यक असतो आपल्या माणसांच्या प्रेमाचा ओलावा "पहाडालाही शेवटी आधारासाठी जमीनच लागते नां" !

काळाच्या ओघानं आणि या समाजानं तुला माझ्या पासून दूर केलं पण आठवणीचे गाठोडे आयुष्यभर पुरेल एवढे प्रेम दिलंस तू मला.

आठवणीचं फुल फुलतं तेव्हा ओठांच्या पाकळ्या अलगद नकळत थरारून विलग होतात. विलग पाकळ्यांना सावरताना हृदयरोपाचा देठ नयनामृतांच्या रसाने ओलाचिंब होतो. चैत्रामध्ये देठाला पालवी फुटावी अशा तुझ्या आठवणी दाटून येतात. कितीही सावरले आवरले तरीही नेत्र दाटून येतात. श्रावणातल्या ऊन-सावल्यांच्या खेळाप्रमाणे पाठलाग चालू असतो. कदाचित तुझ्या नयनातल्या अश्रुंचा एक थेंब मला होता आल असतं तर...

चागल्या आठवणी आयुष्यात फारच कमी असतात आणि त्याच आठवणीचा कोष म्हणजेच तारूण्य. आयुष्यातला प्रेमळ क्षण आणि आठवण म्हणजेच तुझं प्रेम, की ज्या प्रेमाने माझ्यासाठी कधी समाजाची पर्वा केली नाही आणि कधी आपल्या माणसांचीही पर्वा केली नाही आणि तेच तुझं प्रेम म्हणजे माझं भाग्य.

तरुण वयात ज्यावेळी कळीचं फुल उमलण्याचा काळ असतो पण त्याचवेळी भाकरीचा चंद्र डोकावत असतो म्हणून 'जीवन एक साग आहे, जितके शांत तितकेच भयावह' याला ना ऐलतीर ना पैलतीर पण समुद्रात सुध्दा डुबकी घ्यावीच लागते ना ! चुकलेला वाटसरुसुध्दा कधीतरी वाटेवर येतोच ना! आपणही या आयुष्याच्या वाटेवर भेटण्याची प्रतीक्षा करूच. भेटल्यावर फक्त कसा आहेस तू ? विचारावसं एवढीच या प्रेम वेड्याची इच्छा.

शेवटी एवढेच म्हणेन,

"फुलाची प्रत्येक कळी सुंगध देवो तुला,
सुर्याचे प्रत्येक किरण प्रकाश देवो तुला.
मी तर काही देण्याच्या पात्रतेचा नाही,
पण देणारा प्रत्येक सुख देवु दे तुला."

रमेश फराकटे
बी. ए. भाग- ३



संदीप फराकटे
बी. ए. भाग- १

## " गोपाळाची पोरं "

"गोपाळाची पोरं चार"
भुकेने व्याकुळ बेकार
दररोज उठती सकाळी
"रामा धर्माच्या पारी"
जाती सर्वांच्या दारी
आणिक म्हणती
"ये माय, भाकर वाढ"
भाकर घेवून फिरती
आणिक घरे चार
अशी ही "गोपालाची पोरं चार"
शिक्षणाचा गंध न त्यांना
अशिक्षित ती बेकार
जीवन जगण्याचा ध्यास त्यांना
म्हणून संघर्षाने जगती
ताठ मानेने जरी नसेना
पण जगण्याचा ध्यास महान
अशी ही "गोपाळाची पोरं चार"

**सिद्धार्थ कांबळे**
*बी. ए. भाग- १*

## मैत्रीण

मैत्री सुंदर आपली,
कायमची मनात दाटली.
मैत्री म्हणजे अतुट नातं,
ते आयुष्यभर जपलं जातं.
मैत्री म्हणजे आणखी काहीच नसतं,
विश्वासाचं दुसरं गावच असतं.
विश्वास जो ठेवलास माझ्यावर,
तडा जाणार नाही त्याला आयुष्यभर.
गौरवतोय मी माझ्या नशिबाला,
तुझ्यासारखी मैत्रीण असावी प्रत्येकाला.
चुकल्यावर समजुन घेणारी,
यशाचं श्रेय वाटून घेणारी.
विश्वासाचं दुसरं नाव म्हणजेच मैत्री,
इथे स्वार्थीपणाला नाही वाव.

**दीपक लोहार**, *बी. ए. भाग - १*

## तुझं - माझं

तुझं माझं जन्माचं नातं
३१ जुलैला जुळलेलं,
माझ्या विश्वात तुझं नाव
सोनेरी अक्षरात लिहिलेलं.

तुझं माझं एकत्र खाणं
सप्टेंबर महिन्यात झालेलं,
माझ्या विश्वात तुझं स्थान
कायमचं दृश्यात कोरलेलं.

तुझं माझं सप्तजन्माचे नातं
२००७ मध्ये ठरलेलं,
माझ्या विश्वात तुझं येणं
नवजीवन लाभलेलं.

**आशिष पोवार**
*बी. एस्सी भाग - ३*

## कर्तव्य

जीवनात सगळ्यांना हेवा वाटावा
असं वय होतं शिकण्याचं
तेव्हा होतं आई-वडीलाचं कर्तव्य
डुई वरील ओझं हलकं करण्याचं
नाही केली हौस-मौज
नाही केली फॅशन
आड आलं सासुबाईचं आजारपण
मानस नव्हता सुवर्ण-हिऱ्यात नटण्याचा
नाती - गोती घरातील प्रत्येकासाठी
झिजत होती चंदनासारखी
संस्कार होते आई-वडीलांचे
दुसऱ्याच्या आनंदात-आनंद मानण्याचे
ती होती समईतील ज्योत जणू
स्वत: संपून सर्वांना प्रकाश देणारी
वाऱ्याच्या झुळकीने निसर्गात विलिन होणारी

**अमर मोरे**
*बी. ए. भाग -३*

## दैवदास

ओळखलास का प्रिये, दारात आला कुणी
कपडे होते फाटलेले, डोळ्यामध्ये पाणी
क्षणभर बसला, अश्रु पुसला, बोलला वरती रडुनी
अर्ध्यावरती एकट्याला,गेलीस का सोडूनी
हृदयी वसंत फुलताना, डोक्यावर घेऊनी नाचली
बोहल्यावर चढली प्रिया, लगीन चिठ्ठी वाचली
प्रीत खचली आशा विझली, होत्याचे नव्हते झाले
फुटबॉल समजून प्रेमामध्ये दूर लोटून दिले.
आठवणीला घेऊन संगे, मी रडतो आहे
विरले स्वप्न सांधतो आहे, दारू पिऊन पडतो आहे.
खिशात हात घालत, बाटली काढून उठला
दिल्या घरी सुखी रहा, घुटका घेत म्हणाला
मोडून पडला डाव, तरी पुसल्या नाहीत पारोच्या खुणा,
पाठीवरती हात ठेवून, नुसते देवदास म्हणा

अमोल पांडुरंग जरग
*बी. ए. भाग - १*

## गरीबाचे मृत्युपत्र

जेव्हा मी मरून जाईन
तेव्हा तुम्ही रडू नका,
आयुष्यभर रडत होतो,
शेवटी रडणे ऐकवू नका.
जेव्हा मी मरून जाईन,
तेव्हा माझा मृतदेह खांद्यावरून नेऊ नका,
आयुष्याचे ओझे मीच उचलले आहे,
शेवटी उपकाराचे ओझे ठेवू नका,
जेव्हा मी मरून जाईन,
तेव्हा मला जाळू नका,
आयुष्यभर जळत होतो,
शेवटी चटके देवू नका.
जेव्हा मी मरून जाईन,
तेव्हा मला नमस्कार करू नका.
आयुष्यभर कोणी झुकले नाही,
शेवटी वाकण्याचे कष्ट घेऊ नका.

सुयोग दिलीप कोतमिरे
*बी. ए. भाग - १*

## प्रेम म्हणजे काय ?
## What is love ? Who knows ?

कुसुमाग्रजांनी सुध्दा प्रेम या संकल्पनेचा आदर केलेला आहे पण त्यांनी केलेल्या प्रेमाची सकंल्पना कितीतरी वेगळी आहे. आजचा युवकवर्ग प्रेमाच्या नावारवाली नको नको ती कृत्ये करू पहात आहे. माझ्या मित्रांना प्रेमविषयीचे माझे विचार मला सांगावेसे वाटत आहेत.

मित्रानों हे वय प्रेम करण्याचे नसून भरपूर अभ्यास करण्याचे आहे. याच अभ्यासाच्या जोरावर आपणाला आपले आयुष्य घडवायचे आहे. या वयात आपल्याला फक्त आकर्षण वाटत असते. याचा आपण चुकीचा अर्थ काढून त्याला प्रेम हे नाव देतो पण प्रेम नसते ते फक्त Attraction (आकर्षण) असते. या वयामध्ये करता येत नाही. प्रेम ही करता येण्यासाररवी गोष्ट नाही ते फक्त होत असते.

विनायक
*बी. एस्सी. भाग - २*

## तुला पाहिले अन् ...

तुला पाहिले अन्
वेडावले मन माझे,
शब्दात कसे मांडू
बहरलेले रूप तुझे.
कोणते ते फुल असे
सौंदर्य ज्याचे निके,
शुभ्र शीतल चांदण्यासह
चंद्र तारे फिके.
असे हे रूप तुझे
गुंतले मन माझे,
शब्दात कसे मांडू
बहरलेले सौंदर्य तुझे.

विकास जाधव
*बी. ए. भाग - ३*

## हे काय घडतंय ?

आरं ऐका बाबांनो, कोण काय करतोय
आपल्या देशात इतिहास घडतोय..।।धृ।।
गरीब बिचारा दिसभर राबतोय,
अर्ध्या पोटावर संसार चालतोय
रिकामा दादा खंडणीत रमतोय
जनतेची लाच पुढारी खातोय
पुतळ्यांची मोठी विटंबना होतेय
आपल्या..।।१।।

शिक्षण पध्दतीत बदल घडतोय,
विषयमागे ठेऊन मुलगा पास होतोय
पदवीचा कागद बेकार फिरतोय
दारुच्या नशेत तरूण लोळतोय
जो तो आपल्या नशीबावर रडतोय
आपल्या....।।२।।

कर्जाची म्हैस शेतकरी घेतोय
सबसिडीवर अधिकारी चरतोय
डेअरीचा चेअरमन घोटाळा करतोय
दुधाची मलई सारखी लाटतोय
आपल्या..।।३।।

कर्जाचं प्रकरण बँकेत जातंय
कागदाचं घोडं नुसतंच नाचतंय
गरीबाचं मात्र जामिनात अडतंय
आपल्या..।।४।।

एकतर्फी प्रेमातून रस्त्यावर घात होतोय
तरूणींचा बळी हकनाक जातोय
सासरच्या छळानं हुंडाबळी जातोय
दुबळा समाज हे सारं पाहतोय
स्त्रीमुक्ती नारा इथेच नडतोय
आपल्या..।।५।।

राहूल भगवान पाटील
*बी. एस्सी भाग - २*

## अतिवृष्टीचे तांडव

येरे येरे पावसा तुला देतो पैसा
असे लोक म्हणत होते,
पाऊस नाही म्हणून काळजीत होते

एकदाचा पाऊस आला
धरणांना कोंब फुटला
सगळीकडे महापूर आला
महाराष्ट्रभर हाहा:कार माजला
संसार सारा धुवून गेला

पावसानं सारं झोडपून काढलं
राजकारण्यांनी बोलून दाखवलं
एकमेकांत टिकेचे सत्र सुरु झाले
महापुरात सारं जनजीवन विस्कळीत झालं
करोडो रुपयांचं नुकसान झालं
त्यामध्ये सुध्दा भ्रष्टाचार झाला

महापुरानं सारं वाहून नेलं
मृत्युचे तांडव निर्माण झाले
महापुरात सारा विनाश झाला
रोगराईचा प्रसार झाला

गॅस साखरेचा दर भडकला
सुनामीची अफवा पसरली
चेंगराचेंगरीची घटना घडली
महापुरानं थैमाण घातलं
बस,विमान, रेल्वे तोट्यात आले
या सगळयाच ओझं सरकारवर आलं
पुन्हा पावसाचं नाव न काढावं
असं पावसानं वरदान दिलं.

विक्रम जाधव
*बी.ए. भाग - १*

## धैर्य

नशिबाने साथ सोडली म्हणून हरायचे नसते,
भविष्यात विचार करून जगायचे असते.
शुल्लक संकटांना घाबरायचे नसते,
मागील आठवणीने रडायचे नसते.
कर्तृत्वाने माणूस घडतो हे महत्त्वाचे असते.
एवढ्यात लगेच थांबायचे नसते.
धैर्याने त्याच मार्गावरून जायचे असते.

दत्तात्रय बाजीराव चौगले
*बी. ए. भाग - २*

## तुझ्यासाठी ...

वसुंधरेसारखी सुंदर हो,
चंद्र होऊनी तुझ्याभोवती फिरत राहीन.
फुलासारखी नाजुक हो,
काट्याप्रमाणे तुझी रक्षा करेन.
लतेसारखी कोमल हो,
वृक्ष बनुन तुला आधार देईन.
नदी सारखी अवखळ हो,
सागरासारखे तुला सामावून घेईन.
तू फक्त माझीच हो,
मी फक्त तुझाच असेन.

सुनिल पाटील
*बी. ए. भाग - १*

## आठवण

गेली जशी अनेक वर्षे निघून,
तसे हे ही वर्ष निघून जाईल.
जीवनातील शिकण्याचा एक धडा संपून जाईल.
अनेक आठवणीत ही एक आठवण बनून जाईल.

सचिन संभाजी पाटील
*बी. एस्सी. - भाग १*

## क्रांती

इंग्रजांनी दिडशे वर्षे राज्य केले,
देशावर, यत्‌देशीयांचे राज्य राहिले
राजे हुकूमशाह म्हणतात म्हणून,
क्रांतीकार गप्प बसलेत का ?
गांधीजी अहिंसा म्हणतात म्हणून,
टिळक स्वातंत्र्यासाठी गप्प बसलेत का ?
शांततेने स्वातंत्र्य,
विचार करून सुध्दा चलेजाव चळवळ उभारलीच ना ?
कुत्री भुंकतात म्हणून, चोर चोर करायचे थांबलेत का ?
कारण ...
त्यांच्याजवळ होता आत्मविश्वास, प्रेम, श्रध्दा, आदर्श
म्हणूनच ते करू शकले
कुणाचा आवाज बंद
असहकार स्वीकारून प्रेमासाठी देशाची क्रांती

मंगेश धुरी, *बी. एस्सी - भाग २*

## असं जगायचं असतं

जीवन हे जगायचं असतं
फुलासारख फुलायचं असतं
मनातल्या मनात कुजबुजायचं नसतं
राजा, जगाला ओरडून सांगायचं असतं
जीवन हे जगायचं असतं

दुसऱ्यालाही जगू द्यायचं असतं,
दुःखाचे स्वागत करायचं असतं,
दुसऱ्याचा हेवा करायचा नसतो,
त्यालाही प्रोत्साहन द्यायचं असतं,
जीवन आनंदानं जगायचं असतं.

जीवन आनंदानं फुलवायचं असतं,
हिरव्या वनराईप्रमाणे नेहमी हिरवं रहायचं असतं,
जीवनात कष्ट करायचं असतं,
त्यातुनच असचं जगायचं असतं,
दुसऱ्याला पण थोड जगू द्यायचं असतं.

कृष्णात राजाराम यादव
*बी. एस्सी. - भाग २*

## मृत्यु

फुल विषारी हवे कशाला
काटा त्याहूनी बरा।
होकार खोटा नको मजला
नकार त्याहूनी बरा।
खोटी प्रतिष्ठा हवी कशाला
गरिबी त्याहूनी बरी।
नाटकी स्तुती नको मजला
निंदा त्याहूनी बरी।
इमान विकून शान कशाला
ताठ मान ती बरी।
अधमाचे विष्ठान्न
शिळी भाकरी त्याहुनी बरी।
खोटे दांभीक कशाला
दिलदार मित्र त्याहुनी बरा।
लाचारीचे गलिच्छ जिने नको मजला
देशासाठी त्याहुनी मृत्यू बरा
देशासाठी त्याहुनी मृत्यू बरा।

**रणजीत माने**, *बी. ए. भाग - ३*

## होतयं तरी काय ?

कट्ट्यावर बसून सिगारेट,
स्टार खाऊ लागला.
रात्री बारमध्ये जाऊन
दारू पिऊ लागला.
हे सेवन केल्यावर
स्वत:ला 'मर्द'
समजू लागला.
यांच्यावर जो काणी
'ॲक्शन' घेतो.
तो सरळ.
'यम सदनी' पोहचतो
असं सर्व काही घडतयं,
कॉलेजचं स्वरुपचं बदलतयं.
कॉलजला गेल्यावर
यांना होतयं तरी काय ?
यामुळे पुढची पिढी
घडेल काय ?

**कु. मीनाक्षी सरदेसाई**, *बी. ए. भाग - १*

## तमाशा



गावाबाहेर माळाला
येई तमाशाचा फड
साऱ्या गावालाच मग
लागे लावणीचे वेड

तालमीची सारी पोरं
जात तमाशा खेळाला
आणि येई मरगळ
गावी मर्दानी तालाला

अशी होती एक वेळ
तमाशाला चव भारी
केबलच्या कचाट्यात
आता गेला गावकरी

**सदाशिव पाटील**, *बी.ए. भाग - १*

## गर्दीच्या जगाला

कधी स्वत:साठी, कधी दुसऱ्यांसाठी
माझ्याही डोळ्यातून अश्रूंचे पाट वाहिलेत.
माझीही काही स्वप्नं होती
मला काही आशा होती,
माझी मलाच कळेल अशी
माझीही एक भाषा होती !
पण भेटलंच नाही कधी कुणी
भरलेल्या डोळ्यांना हात लावणारं,
जपलेल्या स्वप्नात आशेची वात लावणारं
तरीही मी जगत आलो
या गर्दीच्या जगाला
माझी भाषा कधी कळेल का ?
ते बघत आलो !

**शिवाजी रामचंद्र रेपे**, *बी. एस्सी. भाग -३*

## स्पंदन

वाट पाहतो चातकासारखी
मोरपीस तू होऊन ये
तुझ्या ओलाव्याने
सुखावून मला जाऊ दे
वाट पहातो तुझी
झुळुक वाऱ्याची होऊन ये
तुझ्या झुळुक स्पर्शाने
बेधुंद मला होवू दे
खरच डोळे थकले आता
पुनवेचा चंद्र बनून ये
तुझ्या नसानसात
मनसोक्त मला भिजू दे
तुझ्या आठवणीने धडधडते
हृदय माझे
या हृदयाचे
स्पंदन तू होऊन ये.

**उदयराज व. पाटील,** *बी. ए. भाग – २*



**संदीप कुडतरकर,** *बी. एस्सी. भाग – ३*

## आई

आई म्हणजेच सत्य
सत्वाचे अस्तित्व
जगण्याचे तत्व
आई माझी
आई म्हणजे प्रेम
वात्सल्याचे धर्म
धर्माचे वर्म
आई माझी.
आई म्हणजे शब्द
शब्दाचीच ठेव
देवाहुनी देव
आई माझी.
आई ही प्रेरणा
आत्म्याचे आदर्श
विचारांचे परामर्श
आई माझी.
आई म्हणजे प्रेमाचा झरा
आधार हिरवा
घ्यावा विसावा
तिच्या पायी.

**राहूल नाईक,** *बी. ए. भाग –१*

## विनोद

*एक नेत्ररुग्ण दवाखान्यात जातो आणि डॉक्टरांना विचारतो*

रूग्ण :– डॉक्टर मला प्रत्येक वस्तू डबल दिसते.

डॉक्टर :– ठिक आहे, पण हे सांगायला तुम्ही चौघेजण यायची काय गरज होती ?

●---●

*बऱ्याचवेळ उभ्या असलेल्या बसमधील एका प्रवाशाने वैतागून कंडक्टरला विचारले.*

प्रवासी :– कंडक्टर साहेब, हा आपला खटारा कधी चालू होणार?

**तेव्हा कंडक्टर त्याला हसत म्हणाला**

कंडक्टर :– पुर्ण कचरा भरल्यानंतर

**अमोल साठे,** *बी. ए. भाग – ३*

## प्रेम हे असच असतं

प्रेम हे असच असतं
दोन नवजीवांचे मिलन असतं,
खळखळत्या झऱ्याप्रमाणे,
नेहमी ते फुलत राहतं

प्रेम हे असचं असतं.
सारे जीवन उज्ज्वल बनवितं,
तर कधी मनावर दुःख फुलवीत असतं

प्रेम हे निखळ प्रेमच असतं
प्रत्येकाला ते स्वच्छंद बनवितं
तर कधी जीवनाचा साक्षात्कार घडवितात असतं.
प्रेम हे असच असतं.

**महेश फराकटे,** *बी. ए. भाग - १*

## मॉडर्न म्हणी

१. *अति शहाणी तिची पर्स रिकामी*
२. *आडला विद्यार्थी गाईडचे पाय धरी*
३. *नापासांना ऑक्टोंबरचा आधार*
४. *साहेबांची रजा, शिपायांची मजा*
५. *एकमेकाला कॉपी देऊ,*
*अवघे होऊ उत्तीर्ण*
६. *अभिनय थोडा मेकअप फार*
७. *भेसळीचे खाणार त्यांना सरकार देणार*

**दिग्विजयसिंह वि. पाटील,** *बी. ए. भाग - १*

## चुटका

महेश :- तुझी बायको तुझ्या ड्रायव्हर बरोबर पळून गेली हे ऐकून मला फार दुःख झाले.
सुरेश :- हो दुःख मला पण झालं इतका चांगला ड्रायव्हर शोधू कुठे ?

**अमोल साठे,** *बी. ए. भाग - ३*

## प्रतीक्षा

(मानवी मन भूतकाळाच्या साखळदंडानी करकचून बांधुन ठेवता येत नाही. त्याला भविष्याच्या गरूडपंखाची साथ लाभली आहे, एखादं स्वप्न पाहणं, ते खुलविणं आणि दुर्दैवाने जर ते स्वप्नं भंग पावलं तर भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळुन, रक्ताळलेल्या पावलांनी, दुसऱ्या स्वप्नामागे धावणे हा मानवी मनाचा गुणधर्म आहे. पण अशा स्थितीतही एखाद्या मानव असा असतो की ज्याला तेच एक स्वप्न म्हणजे सर्वस्व असते. अशाच एका प्रेमवीराची ही कविता)

कविता असली माझी जरी,
शब्द आहेत सारे तुझेच
सूर असला माझा जरी,
गीत मात्र तुझेच आहे.
हृदय असले माझे जरी,
स्पंदन सारे तुझेच आहे.
श्वास असला माझा जरी,
गंध मात्र तुझाच आहे.
सखे, ओंजळ असली माझी जरी,
आठवणी साऱ्या तुझ्याच आहेत.
गेलीस निघुन कायमची तरी,
प्रतीक्षा फक्त तुझीच आहे...

**सचिन पाटील**
*बी. एस्सी. भाग - ३*

## फुलपाखरांचा गाव

कुणी किती जगावं
याला आयुष्य म्हणतात.
जगावं की मरावं
म्हणणाऱ्याला मनुष्य म्हणतात..

काही क्षण कंटाळायचे
काही टाळायचे असतात..
काही क्षण सांभाळायचे
काही भाळायचे असतात..

माणुसकीचा झरा
अश्रू वाहतोय सारखा..
कारण माणुसकीचा झरा
माणुसकीला पारखा..

मस्तवाल वाऱ्याने
वट वृक्षाला झुकवले..
पण गवताच्या पात्याने
त्याचे घाव चुकवले..

माता आणि माती
वेलांटीचा फरक आहे..
दोघींनाही विसरलो तर
सारं आयुष्य नरक आहे..

साक्ष देताना ईश्वराला
धरतात वेठीला
खात्री असते येणार नाही
तो कधी साक्षीला..

चिमणीनं काड्या जमवून
जेव्हा संसार थाटला..
काजळलेला तो कोपरा
वात्सल्याने नटला..

हिरवळीवर वेडं धुकं
अलगद पसरलं..
गडबडीत परतताना
मोती तिथं विसरलं..

काही शब्द टाळावेत
काही साफ गाळावेत..
माणूस म्हणून कधी कधी
काही शब्द पाळावेत..

एकदा सावली
उन्हाळा कावली..
उजेडाशी भांडून
काळोखात धावली..

फुलांनाही कधी कधी
काट्यासारखं व्हावं..
तेव्हाच टिकून राहतील
ही फुलपाखरांची गावं..

**कु. स्मिता अर्जुन पाटील**
बी. ए. भाग – २

## चारोळी

लाथाडून मला जाताना
मागे तू वळू नकोस
माझ्या आर्त हाकेला
साद तू घालू नकोस
जाताना तुला एकच सांगतो
ते मात्र लक्षात ठेव
या वेड्या प्रियकरासाठी
दोन अश्रू राखून ठेव.

**विकास पाटील,** बी. एस्सी. भाग – १

# दूधसाखर ते दूधसागर - **एक अनोखा प्रवास**

जीवनामध्ये काही क्षण असे येतात की ते मनाच्या दीपस्तंभावर जसेच्या तसे रेखाटले जातात. काही दिवस असे येऊन जातात की ते भूतकाळातही डोकावून पहायला लावतात. असाच एक दिवस म्हणजे ४ जानेवारी २००६. निमित्त होतं वनस्पती शास्त्राची अभ्यास सहल.

पहिल्या दिवशी बोंडला येथे मुक्काम करून सकाळी आम्ही अनमोड फाट्यावरून "कॅसलरॉक" येथे गेलो. तेथून डॉ. गायकवाड सर व प्रा. एस्. एस्. पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हीं दूधसागरं येथे जायचे ठरविले. रेल्वेशिवाय कोणताही रस्ता नसलेले हे ठिकाण. जाताना केलेला रेल्वेमधील प्रवास अतिशय आनंदी होता. वाऱ्याशी एकरूप होत, निसर्गाने मुक्त हस्ताने केलेली उधळण पाहत, वाटेत येणाऱ्या बोगद्याचा आनंद लुटत आम्ही १४ कि.मी. अंतर काही मिनिटातच पूण केले. तेथून एक किलोमीटर आम्ही नवनवीन वनस्पती शोधत 'दूधसागरं या ठिकाणी पोहचलो.

'दूधसागर धबधबा' म्हणजे निसर्गाचा एक अनमोल ठेवा. पांढरं शुभ्र दुधासारखं दिसाणारं, खदखदून हसणारं पाणी, उंच उंच दगड आणि सभोवताली झाडे, वेली यांची पांघरलेली हिरवीगार शाल ही या ठिकाणची वैशिष्ट्ये. धबधब्यातील थंडगार पाण्याला स्पर्श करताच प्रवासाचा शीण कुठल्या कुठे निघुन गेला. थोडा वेळ तेथेच फराळ केल्यानंतर त्या अप्रतीम सौंदर्याने खुणावणऱ्या धबधब्यावर अखेरची नजर टाकत आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. सरांच्या मार्गदर्शनाने जंगलातील नवनवीन वनस्पती शोधम आम्ही चालू लागलो. चितळ, भेकर, अस्वल, रानडुकर हे प्राणी तरे हिरडा, जंगलाचे खास वैशिष्ट्य.

वनस्पती शोधण्यामध्ये व ज्या जमा करण्यासामध्ये आम्ही एवढे रमून गेलो की डोक्यावरचा सुर्यही परतीच्या प्रवासाला लागला आहे याचं सुद्धा भान राहिले नाही. काहीसं निम्या अंतरावर आल्यानंतर आम्हाला रेल्वे चुकल्याची समजले. त्यातच वाटेत अनेक बोगद्यांचे आव्हान.

आमचे सहकारी असलेले माझे मित्र सागर, संतोष आम्ही सारेचजण अगदी खिन्न झालो. पण पुन्हा सरांनी आम्हाला प्रोत्साहन दिले. पुढचे पाऊल पुढे टाकत आम्ही त्या रेल्वे मार्गावरून झपझप चालू लागलो. पुढे तीन-चार बोगदे शिल्लक असतानाच सुर्याची जागा त्या चकोर चंद्राने घेतली होती. त्या चांदण्यामध्ये रातकिड्यांची किरकिर, प्राण्यांचे भिन्न आवाज, पानांचा सळसळणारा आवाज ऐकून 'जंगल' म्हणजे काय याची प्रचिती आली. मनातच राम राम म्हणत, एकमेकांना धीर देत त्या काळ्याकुट्ट अंधारातून कसाबसा तिसरा बोगदा पार केला.

दुसरा बोगदा तर खूपच लांबीचा होता. पाय ठेवायला रस्ता नाही, होते फक्त रेल्वे ट्रॅकवरचे खडक. अशातून चालताना पाठीमागे काही अंतर असताना विषारी मण्यार पायात दिसले होते. सागर व मी त्यावर हल्लाबोल केला. असेच एखादे मण्यार किंवा इतर कोणीही या दुसऱ्या बोगद्यात आले असते तर राम आठवूनही राम येऊ शकत नव्हता. आमचे किंवा दुसऱ्याचे बोट जरी आमच्या डोळ्यात घातले असते तर ते जाणवले नसते असा काळाकुट्ट अंधार आम्ही अनुभवत होतो. सरांच्या बुटांनी आ-वासला होता. अशा अवस्थेत चालत असताना दुसरा बोगदा पार झाला.

आता फक्त एक बोगदा सर व आम्ही मधेच गाणी म्हणत मधेच शिटी वाजवत जंगलातल्या प्राण्यांना आम्ही आहोत हे जाणवत होतो. अंधार दाटला होता. साथ होती ती फक्त चंद्रकोटीची. थकलेल्या पावलांना अंधारातून प्रकाशाकडे जाण्याची ओढ लागली होती. अखेर आम्हालां कॅसलरॉकं रेल्वेस्थानकावरील आमच्या स्वागतासाठी सज्ज असलेने दिवे दिसू लागले आणि सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास टाकला व या रोमांचकारी प्रवासाची चर्चा करत, कॉफीचे गरम गरम घुटके घेत आम्ही बोंडला मुक्कामी रवाना झालो.

प्रदीप पाटील
बी. एस्सी. भाग - ३ (बॉटनी)

## मला असं वाटतं !

**संकलन - रणजीत पाटील,** बी.एस्सी. भाग - ३

# डॉ. चंद्रशेखर व्यंकट रामन

डॉ. सी.व्ही. रामन यांना १९३० सालचा नोबेल पुरस्कार त्यांच्या पदार्थविज्ञानातील मौलिक संशोधनामुळे दिला गेला. निरनिराळ्या पदार्थातून प्रकाशकिरण नेले तर त्याच्या लांबीत फरक पडतो. प्रकाशाचा रंग बदलतो. लांबीत पडणारा फरक बिनचुक येण्यासाठी त्यांनी गणिती सिद्धांत तयार केला. हे मौलिक संशोधन रामन इफेक्ट (रामन परिणाम) म्हणून जगात मान्यता पावलं.

डॉ. सी.व्ही रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी चेन्नई राज्यातील तिरुचिरवल्ली गावामध्ये झाला. त्यांचे वडील श्री. चंद्रशेखर अय्यर शिक्षक होते. शिक्षणाच्या आवडीबरोबर त्यांना संगीताचीही आवड होती. रामन यांच्या आई पार्वती अतिशय चिकाटीच्या आणि कष्टाळू वृत्तीच्या होत्या.

रामन यांना अभ्यासाची खूप आवड होती. बाराव्या वर्षी ते मॅट्रिकी पास झाले आणि पंधराव्या वर्षात त्यांनी प्रथम वर्गात बी.ए. पूर्ण केलं. अभयाबरोबर रामन यांना निसर्गाचे खूप वेड होतं. समुद्रकिनारा ही त्यांची आवडती जागा होती. निसर्गात आढळणाऱ्या विविध रंगाच्या बाबतीत त्यांना कुतुहल होतं. एम्.ए. ला असताना त्यांनी ध्वनी संबंधीचा प्रयोग केला. त्यांनी ध्वनिशास्त्रावरील केलेल्या संशोधनाबद्दल एक शोधनिबंध लिहिला आणि लंडनच्या फिलॉसॉफिकल मॅगेशिनकडे पाठविला. त्याला 'नेचर' या इंग्लिश मासिकात प्रसिध्दी देण्यात आली. १९०७ मध्ये रामन यांनी विज्ञानात सर्वाधिक गुण मिळवून एम्.ए. पूर्ण केलं.

मनासारखं काम मिळेना तेव्हा रामनां यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला आणि वयाच्या एकोणिसाव्या वर्षी भारत सरकारच्या अर्थ खात्याचे डेप्युटी डायरेक्टर जनरल म्हणून कामाला सुरुवात केली. त्यांनी नोकरी मनापासून केली, तरी विज्ञानाकडे त्यांच्या आत्म्याचा ओढा होता. कलकत्यातील भारतीय विज्ञान संवर्धन या संस्थेत ते वारंवार जायचे व तिथे वेगवेगळे प्रयोग करीत आणि संशोधन प्रसिध्द करीत. बऱ्याच वर्षानंतर कलकत्यातील नुकत्याच निघालेल्या सायन्स कॉलेजमध्ये त्यांनी विज्ञानाचा प्राध्यापक म्हणून काम करायला सुरुवात केली. मनासारखं काम मिळाल्यामुळे त्यांचे विज्ञानातील संशोधन जोरात सुरु झाले. त्यांची कामावरील निष्ठा आणि कार्यक्षमता बघून त्यांना सन्माननीय डॉक्टर ही पदवी दिली गेली.

१९२१ साली ब्रिटीश साम्राज्यातील विद्यापीठ प्रतिनिधींच्या परिषदेला रामन इंग्लंडल गेले. १९२४ साली कॅनडात भरलेल्या परिषदेला ते गेले. दोन्ही ठिकाणी रामन यांनी त्यांच्या संशोधन कार्यावर अनेक व्याख्यानं दिली.

या दौऱ्यात त्यांना परदेशातील अद्ययावत प्रयोगशाळा बघायला मिळाल्या. तसेच टोरांटोला नोबेल पुरस्कार विजेते मिलिकन या शास्त्रज्ञांच्या संस्थेत काही दिवस काम करायला मिळालं. कॅनडात अनेक शास्त्रज्ञांची आणि त्यांची भेट झाली. लंडनच्या रॉयल सोसायटीने त्यांना फेलोशिप दिली. नंतर त्यांनी प्रकाशनासंबंधीचे संशोधन करायला सुरुवात केली. वेगवेगळे पदार्थ आणि त्यातून बाहेर पडणारा प्रकाश यावर त्यांनी संशोधन केले तेव्हा असं लक्षात आलं की निरनिराळया पदार्थांमधून प्रकाशकिरण नेला तर त्याच्या लांबीत फरक पडतो. पांढरा प्रकाश ज्या सात रंगांनी बनतो, ते रंग वेगळे होतात. त्यांच्या लांबीत पडणारा फरक बिनचुक सांगत येण्यासाठी त्यांनी गणिती सिध्दांत तयार केला. त्याला रामन परिणाम म्हणतात

'रामन परिणाम' च्या संशोधनामुळे स्फटिकाच्या आंतररचनेचं संशोधन करणं सोपं झालं. जा जगन्मान्य संशोधनामुळे त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आणि १९३० साली नोबेल पुरस्कार या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

एक संशोधन पूर्ण झालं की दुसऱ्या संशोधनाकडे वळायचं हा रामन यांचा स्थायी स्वभाव असल्याने त्यानी हिऱ्यांवर संशोधन करण्याचे ठरविले. नोबेल पुरस्काराच्या रकमेतून त्यांनी हिरे खरेदी केले. हिरे आणि रत्नांच्या स्फटिकाकृतीचे स्वरूप आणि त्यांचे गुणधर्म यावर संशोधन केलं. तसेच विद्युत वाहून नेण्याची शक्ती कशामुळे निर्माण होते. याचं कारण शोधून काढलं.

बंगळूर येथे १९४३ साली रामन रिसर्च इस्टिट्युटची स्थापना केली. आणि संशोधन चालू ठेवलं.

१९४८ साली फ्रान्समधील बोर्जाहुन आग्रहांच आमंत्रण आलं होतं. तिथल्या राष्ट्रीय विज्ञान संशोधन केंद्राने रामन परिणामाचा विसावा वाढदिवस साजरा केला. आणि रामन यांना डी.एस्.सी. पदवी प्रदान केली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर भारत सरकारने त्यांना पदार्थविज्ञान शास्त्राचे पंहिले राष्ट्रीय प्राध्यापक नेमले. १९५४ साली 'भारतरत्न' हा पुरस्कार आणि १९५० साली राष्ट्राराष्ट्रात शांतता राखण्याच्या प्रयत्नासाठी रशियन सरकारने रामन यांना 'लेविन' पारितोषकाने सन्मानित केलं. डॉ. सी. रामन आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचं काम करीत राहिले. अशा ह्या विज्ञानतपस्वीने २१ नोव्हेंबर रोजी या जगाचा निरोप घेतला.

विज्ञानाच्या क्षेत्रात डॉ. सी. व्ही. रामन यांच्या भरीव कामगिरीबद्दल कृतज्ञता म्हणून ज्या दिवशी त्यांना नोबेल पारितोषिक जाहीर झाले. तो दिवस म्हणजे २८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून आपण साजरा करतो.

**सचिन पाटील, बी. एस्सी. भाग -३**

# प्रेमाचे रसायनशास्त्र

*उद्देश : विज्ञानाच्या दृष्टिकोनातून प्रेमाचे परीक्षण करणे.*

*व्याख्यान : प्रेम हे जळत्या सिगारेटसारखे असून त्याची सुरुवात झुरक्यापासून होते आणि शेवट राखेत होतो.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| L | एल | = | लेक | - | दु:खाचा तलाव |
| O | ओ | = | ओशन | - | अश्रुंचा समुद्र |
| V | व्ही | = | व्हॅली | - | मृत्यूची दरी |
| E | ई | = | एण्ड | - | जीवनाचा शेवट |

*साहित्य : कॉलेजचे आवार, हॉटेल, सिनेमा हॉल, बगीचा, देवालय आणि सध्या लोकनाट्य.*

*कृती : आकर्षणाचे किरण एका ठिकाणाच्या डोळ्यांपासून (मुलगा) दुसऱ्या ठिकाणच्या डोळ्यांपर्यंत (मुलगी) पोहोचतात. तेव्हा दृष्टिपटलावर चमकदार प्रतिमा तयार होते. चेतातंतू द्रव्यापर्यंत संवेदना पोहोचवितात. तेव्हा आल्हाददायक स्मितहास्य झळकते. अशा प्रकारे भिन्न लिंगामध्ये देवाण घेवाण होते. या घडून येणाऱ्या अभिक्रियेला प्रेमाची "परावर्ती अभिक्रिया" दृढ असे म्हणतात.*

*अडथळा आणणारे घटक - आई, वडील, समाज, इतर इत्यादी.*

*वर्गीकरण : प्रेमाचे दोन प्रकार असतात. (सच्चे) खरे प्रेम खोटे प्रेम.*

*खरे प्रेम : हे प्रेम नैसर्गिक असते हे भाग्यवान माणसांच्या बाबतीतच घडून येते. त्याला निसर्गाची देणगी स्वीकारावी लागते. उदा: लैला-मजनू, हीर-रांझा, सोनी-महिवाल इ.*

*अप्रामाणिक प्रेम : यात अनेक खोटया गोष्टी असतात. याचा शेवट हा दु:खात होतो. खोटे प्रेम फार थोड्या काळापर्यंत टिकते. हे सार्वजनिक ठिकाणापासून निर्माण होते.*

*गुणधर्म :भौतिक गुणधर्म : रंगहीन, आल्हादायक, एकदा अडकले की बाहेर पडता येत नाही, आरोग्यवर्धक इत्यादी.*

*रासायनिक गुणधर्म - सच्चे प्रेम माणसाला मुर्ख बनविते. प्रेम हे अत्यंत ज्वालाग्राही आहे.*

*समीकरण - प्रेम + मनुष्य = कवी, प्रेमभंग + मनुष्य = देवदास*

*उपयोग - प्रेमात पडलेला मनुष्य हा तहानभूक विसरतो. त्यामुळे अन्नाची मोठ्या प्रमाणावर बचत होते आणि उपवासाची संख्या वाढते.*

*सूचना : हा लेख असा कोणताही दावा करीत नाही की, यातील शब्द नि शब्द खरा आहे. हा प्रेमाला रसायनशास्त्र प्रयोगशाळेत तपासण्याचा प्रयोग होता.*

*अनुमान : प्रेमावर कर बसविल्यास राष्ट्रीय उत्पन्नात बरीच मोठी भर पडेल व देशाची सांपत्तिक स्थिती कदाचित सुधारेल !!*

*अनिल पाटील, बी.एस्सी. भाग - २*

# Celebration of the World Year of Physics

International union for pure and applied physics adopted a resolution for declaring the year 00 as the world year of Physics to celebrate the 100th anniversary of a series of great advances of albert Einstein. We in our College also celebrated the "World Year of Physics" in the following way.

1. Dr. Kulkarni S. N. was invited to participate in the Master Resource Training Programe held at Nehru Science Center, Mumbai. This program was organized by National Centre for Science And Technology Commu nication, New Delhi.
2. International Conference on :hysics Education (ICPE2005) was held at Vidyan Bhavan, New Delhi from 21st to 26th August 2005. Prof. M.V. Takale and Dr. Kulkarni S. N. participated in this international event.
3. One day seminar cum workshop on "Physics Laboratory Training" was organized in the College on 8th Oct. 2005. About 200 students partici pated in this workshop. Dr. Rajesh Khaparde from Homi Bhabha Center for Science Education , Mumbai was the chief resource person for this programme. First of all the digital board of "Objec tives of the Physic s Laboratory Training" was displayed in the Physics laboratory at the auspicious hands of Shri. K.D. Patil the director of Doodhsakhar Shikshan Prasarak Mandal, Bidri. Dr. Rajesh Khaparde delivered the lecture on "What we can learn through Physics practical". In the second session he demonstrated several experiment in the optics, electricity, magnetism etc. explaining the principle behind the experiment. Indian Association of Physics Techers (IAPT) granted 5000/- Rs. For this program.
4. The first convention of IAPT sub regional council 5D was held at Vivekanand College, Kolhapur on 10-11th Dec. 2005. The souvenir was published on this occasion. Prof. Takale M.V. and Dr. Kulkarni S.N. edited this souvenir. they also attended the convention .
5. Prof. Takale, the executive council member of the IAPT delivered the lecture on "Problems in physics and methods of Physics teaching" in the program held at Dr. Ghali College, Gadhinglaj on 22nd September 2005.
6. The Abdus Salam international centre, Italy has donated 136 books ot our College.

# क्रीडा



मा. प्र. प्राचार्य. श्री. सी. वाय. जाधव, प्रा. एन. डी. पाटील व श्री. डी. जी. दिघे यांच्या समवेत इंटर झोनल जिम्नॅस्टिक स्पर्धेतील विजेता संघ



इंटर झोनल बास्केट बॉल स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी प्रा. एन. डी. पाटील व इतर



बास्केटबॉल सामन्यातील एक चुरशीचा क्षण

# विविध उपक्रम



एक दिवसीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
कार्यशाळेच्या उदघाट्न प्रसंगी
श्री. प्रशांत मोहिते
प्रशिक्षणार्थी डी. वाय. एस. पी.



"सावित्रीबाई फुले" जयंती निमित्त
महिलांना मार्गदर्शन करताना
प्रमुखा पाहुण्या
प्रा. सौ. मेधा पानसरे



मा. प्राचार्य यांच्या समवेत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
जिल्हास्तरीय युवा महोत्सवात
यशस्वी झालेले आमचे कलाकार

# विविध

# विभाग

# अहवाल

## सांस्कृतिक विभाग

सन २००५-२००६ मधील सांस्कृतिक विभागाकडील विविध कार्यक्रम खालीलप्रमाणे -

१) बी.ए. व बी.एस्सी. भाग तीन कडून - शुक्र. दि. २६/०८/२००५ रोजी बी.ए. व बी.एस्सी भाग एक चा स्वागत समारंभ.

२) दि. ५ सप्टेंबर २००५ रोजी शिक्षक दिन साजरा. याचवेळी बी.एस्सी. विभागाकडे रांगोळी, निबंध व व्हॉलीबॉल स्पर्धा घेतल्या.

३) दि.१५ ऑगस्ट २००५ रोजी स्वातंत्र्य दिन साजरा केला.

४) शनि.दि. २४/०९/२००५ रोजी मिनी गॅदरिंग घेतले.

५) सोमवार दि. १०/१०/२००५ विद्यार्थिनीसाठी रास दांडिया व साडी डे घेतला.

६) **दि. २९ ऑक्टो.२००५ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर जिल्हास्तरीय युवक महोत्सव - संयोजन.** यामध्ये महाविद्यालयास पथनाट्य प्रथम, मुकनाट्य द्वितीय, वक्तृत्व मराठी व इंग्रजी मध्ये तृतीय असे क्रमांक मिळाले.

७) दि. १७ व १८ नोव्हे. २००५ दरम्यान शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेल्या मध्यवर्ती युवक महोत्सवात महाविद्यालयास पथनाट्य व मुकनाट्य या कला प्रकारात तृतीय क्रमांक मिळाले.

८) बिद्री ( कागल) येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात गुरुवार दि. ०८/१२/२००५ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम .सादर केला.

९) दि. २० ते २५ नोव्हेंबर २००५ दरम्यान दापोली येथे झालेल्या इंद्रधनुष्य युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचा संघव्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. एस. डी. पाटील यांची निवड झाली.

याशिवाय

१) उज्जैन (मध्य प्रदेश) येथे दि. ११ डिसेंबर ते १४ डिसेंबर २००५ दरम्यान झालेल्या पश्चिम विभागीय युवा महोत्सवासाठी कु. युवराज सदाशिव डावरे या विद्यार्थ्याची निवड झाली.

२) तसेच वार्षिक स्नेहसंमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण.

याकामी प्रा.डी.डी. कोमेजवार, प्रा. ए.बी. माने, प्रा.आर.एस्. पाटील, प्रा.कु.एस्.पी.भोसले, मा.प्राचार्य, मा.संस्थाप्रमुख, इतर सर्व सहकारी प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ.एस्.डी. पाटील.
निमंत्रक
सांस्कृतिक विभाग.

## प्रवेश समिती

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कला शाखा बी.ए. भाग -१,२,३ या वर्गासाठी प्रवेश देण्यात आले. त्यासाठी वर्गवार प्राध्यापक नेमले गेले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.

| | |
|---|---|
| १) बी.ए. भाग - १ | प्रा.जानवे ए.डी.<br>प्रा.डॉ. ए. जे. वारके |
| २) बी.ए. भाग - २ | प्रा. एस. आर. पाटील<br>प्रा.एन.एम. पाटील |
| ३) बी.ए. भाग - ३ | प्रा.डी.एन. पाटील<br>प्रा.डॉ.ए.आर.माने |

**प्रा.जानवे ए.डी.**
निमंत्रक
प्रवेश समिती

## फिड बॅक समिती

सन २००५–२००६ या शैक्षणिक वर्षात आपल्या दूधसाखर महाविद्यालयात फिड बॅक समिती स्थापन केली आहे. या समितीतर्फे कला व शास्त्र विभागातील बी.ए. व बी.एस्सी –१,२,३ या वर्गातील विद्यार्थ्यांना प्राध्यापकांबद्दलची माहिती भरून घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना विषयांनुसार फिड बॅकचे दोन फॉर्म देवून ते त्यांच्याकडून भरून घेण्यात आले.

अशाच प्रकारचे फॉर्म पालकांकडून व मॅनेजमेंटकडून भरून घेण्यात आले. या कामी मा. प्राचार्य व समिती सदस्य प्रा. गंगावणे व प्रा. करपे यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. जानवे ए.डी.**
निमंत्रक
फिड बॅक समिती

## पालक मेळावा व माजी विद्यार्थी संघ

सन २००५–२००६ मधील पालक मेळावा व माजी विद्यार्थी संघाचे कामकाज पुढील प्रमाणे –

१) रविवार दि. ०९/१०/२००५ रोजी बोरवडे ता. कागल येथे पालक मेळावा घेतला.

२) शुक्रवार दि. १४/१०/२००५ रोजी बिद्री ता. कागल येथे पालक मेळावा घेतला.

तसेच माजी विद्यार्थी संघटनेची नोंद धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्याकडे करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

डॉ.एस्.डी. पाटील.
निमंत्रक
पालक मेळावा व माजी विद्यार्थी संघ

## नशाबंदी युवामंच

सन २००५–२००६ मधील नशाबंदी युवामंचने घेतलेले विविध कार्यक्रम खालीलप्रमाणे –

१) 'व्यसनमुक्त महाविद्यालय' या उपक्रमासाठी सतत प्रयत्न करून विद्यार्थी – विद्यार्थिनी व सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी व्यसनमुक्त राहतील यासाठी प्रयत्न.

२) परिसरातील व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न. त्याचाच भाग म्हणून –

सोनाळी ता. कागल येथे नागराज तरुण मंडळामार्फत 'व्यसनमुक्ती काळाजी गरज' या विषयावर शनिवार दि. १०/०९/२००५ रोजी व्याख्यान दिले.

डॉ.एस्.डी. पाटील.
निमंत्रक
नशाबंदी विभाग.

## वेळापत्रक समिती

२००५–२००६ या शैक्षणिक वर्षामध्ये वेळापत्रक समितीचे कामकाज खालीलप्रमाणे

१) दि. १६/०६/२००५ रोजी बी.ए. भाग–१ या वर्गाचे तात्पुरते वेळापत्रक नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आले.

२) दि. १८/०६/२००५ रोजी बी.ए.भाग–२ या वर्गाचे तात्पुरते वेळापत्रक नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आले.

३) दि. ०१/०७/२००५ रोजी बी.ए.भाग–१,२,३ या वर्गाचे अंतिम वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी व विषय शिक्षकांच्या माहितीसाठी नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आले.

वेळापत्रक समितीस मा. प्राचार्यसो व प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

प्रा.ए.बी. माने
निमंत्रक
वेळा पत्रक समिती.

## ग्रंथालय अहवाल

ग्रंथालय ही ज्ञानाची व संस्काराची पाणपोई आहे. विद्यार्थ्यांच्या बुध्दीवर, मनावर व जीवनावर योग्य संस्कार करण्यासाठी व भावी जीवनासाठी ज्ञानाची शिदोरी जमविण्यासाठी आज ग्रंथालयाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. चांगल्या ग्रंथाचे वाचन करणे आज गरजेचे आहे. अनेक प्रसार वाहिन्यातून बालमनावर विपरीत परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत चांगल्या व जीवनास उपयुक्त अशा ग्रंथांचे वाचन करून मन निर्मळ केले पाहिजे. मानवाचा महामेरु घडविण्याचे सामर्थ्य ग्रंथात आहे. सर्वांगीण विकास नीतीमूल्य जोपासण्याची क्षमता व भावी जीवनाकडे पाहण्याची दूरदृष्टी ही चांगल्या ग्रंथाच्या वाचनाने होते. मनाची जडण घडण होउन मानव संस्कारमय होण्यासाठी मनन चिंतन करणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रंथालयाचा आधार घेणे हेच ध्येय असावे.

राष्ट्रीय स्तरावर विचाराधीन असलेल्या बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार ग्रंथालयात संदर्भ ग्रंथावर जास्त भर देण्याचे मा. प्राचार्य व ग्रंथालय कमिटीने ठरवले. २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात रू.१ लाख ५ हजारचे संदर्भ ग्रंथ खरेदी केले आहेत. तसेच रूपये ३५००ची चांगली व निवडक मासिके चालू आहेत. त्याचा फायदा स्पर्धा परीक्षेसाठी निश्चित होणार आहे.

जींदाल ट्रस्ट, बेळगावने सायन्स विभाकाकडे २३१ पुस्तकांची मोलाची भर टाकलेली आहे. त्याचा फायदा सायन्सचे सर्व विद्यार्थी घेतात. आज ग्रंथालयाचा विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक स्टाफ व प्रशासकीय कर्मचारी असे सुमारे ९५० वाचक ग्रंथालयाचा फायदा घेतात.

ग्रंथालयाचे काम सुखकर, व्यवस्थित चालविण्यासाठी संस्थेचे चेअरमन साहेब व व्हा. चेअरमन साहेब, मा. प्राचार्य तसेच ग्रंथालय कमिटी सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यांचे मार्गदर्शन हेच ग्रंथालय विकासाचे रूप आहे.

श्री.ए.टी.वागरे
ग्रंथपाल.

## व्होकेशनल गाईडन्स विभाग

सन २००५-२००६ या वर्षी व्होकेशनल गाईडन्स विभागाच्यावतीने इंग्लिश स्पिकींग कोर्स, एम.एस.-सी.आय.टी., ग्रामीण पत्रकारिता हे शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीने प्रौढ व निरंतर विभागाचे कोर्स सुरू करावयाचे ठरविले. या विभागाची परवानगी आल्यावर कोर्स सुरु करावयाची नोटीस मुलांच्यापर्यंत पोहचविली. पण प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून मुलींच्याकरीता 'होम सायन्स' हा तीन महिन्याचा लघुकोर्स सुरू करायचे ठरविले. या कोर्सला प्रतिसाद मिळाला व एकूण १३ विद्यार्थिनींनी हो कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला. याकामी प्रा. साळोखे, प्रा.खानापुरे व प्रा. गंगावणे यांचे सहकार्य लाभले.

प्रा. ए.जे.वारके
निमंत्रक
व्होकेशनल गाईडन्स विभाग

## भाषा मंडळ

या मंडळाच्यावतीने सन २००५-२००६ या वर्षी हिंदी दिनाच्या निमित्ताने हिंदी विभाग व महाराष्ट्र बँक, शाखा बिद्री यांच्यावतीने दि. २७ सप्टेंबर २००५ रोजी हिंदी निबंध स्पर्धेचे आयोजन केले. यामध्ये १५ विद्यार्थी सहभागी झाले. प्रभारी प्राचार्य श्री.सी.वाय.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बक्षिस वितरण झाले. बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बिद्रीच्यावतीने विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी सदर बँकेचे शाखाधिकारी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे महाविद्यालयात दि. १४/०८/२००५ रोजी 'महाराष्ट्रभर शब्दफुले' हा काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये श्री.निर्मल देशपांडे यांनी स्वरचित कविता सादर केल्या. याकामी समिती सदस्य डॉ. एस.बी.देसाई व प्रा. डी.एन.पाटील यांचे सहकार्य लाभले.

श्री.ए. जे. वारके
निमंत्रक
भाषा मंडळ

## वादविवाद व वक्तृत्व समिती

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात वादविवाद व वक्तृत्व समितीचे कामकाज समाधानकारक आहे असे मला वाटते. वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेविषयी महाविद्यालयाकडे आलेली परिपत्रके विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणली तसेच सदर स्पर्धेविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयातील खालील स्पर्धकांनी विविध ठिकाणी झालेल्या स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदविला.

| | |
|---|---|
| १) कु. जयश्री दत्तात्रय पाटील | कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी. |
| २) श्री. प्रकाश रमाकांत महाडेश्वर | सदाशीवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड. |
| ३) श्री.प्रकाश रमाकांत महाडेश्वर | दिंगबर जैन बोर्डीग, कोल्हापूर. |
| ४) श्री.विकास बाबूराव चौगले | दिंगबर जैन बोर्डीग, कोल्हापूर. |
| ५) श्री.प्रकाश रमाकांत महाडेश्वर | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड सायन्स, सोलापूर. |

महाविद्यालयाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय युवामहोत्सवामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतला. त्यातील खालील स्पर्धकांनी तृतीय क्रमांक पटकावला.

१) श्री. प्रकाश रमाकांत महाडेश्वर (मराठी)
२) श्री.प्रकाश रमाकांत महाडेश्वर (हिंदी)
३) श्री. वैभव बंडोपंत आरडे (इंग्रजी) वादविवाद
४) श्री. विकास बाबूराव चौगले

शिवाजी विद्यापिठाच्या युवामहोत्सवात वक्तृत्व व वादविवाद समिती निमंत्रक म्हणून या कमिटीचे सदस्य डॉ. माने अे. आर. यांनी काम पाहिले. सदर समितीमध्ये सदस्य म्हणून डॉ. गायकवाड एस्. जी. यांचे सहकार्य लाभेल तर महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. माने अे.आर., प्रा.डी.एन. पाटील, प्रा. सौ. कांबळे जे.बी. व माझ्या इतर सहकारी प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

डॉ.देसाई एस्. बी.
निमंत्रक
वादविवाद व वक्तृत्व समिती

## हिंदी विभाग

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात हिंदी विभागामार्फ 'हिंदी दिन' आयोजीत केला. हिंदी दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये हिंदी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये १५ स्पर्धक सहभागी झाले. त्यातील विजेते खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रदीप नाना | प्रथम |
| २) | महाडेश्वर प्रकाश रमाकांत | द्वितीय |
| ३) | कु.वारके धनश्री हिंदूराव | तृतीय |
| ४) | कु. कोरवी सुधाकर आनंदा | तृतीय |
| ५) | यादव जयदीप अशोक | उत्तजेनार्थ |
| ६) | पाटील पंकजशील दिनकर | उत्तेजनार्थ |

बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बिद्री, भाषा मंडळ, व हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ सप्टेंबर २००५ रोजी हिंदी दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य सी.वाय. जाधव होते. यावेळी बँकेचे मॅनेजर, डॉ. माने अे. आर., प्रा.दिघे डी.जी. व डॉ. देसाई एस्.बी. यांची व्याख्याने झाली.

श्री. प्रकाश महाडेश्वर व श्री.विकास चौगले या विद्यार्थ्यांची हिंदी भाषेतून भाषण झाले. मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बिद्री यांच्या हस्ते निबंध स्पर्धेतील विजेत्यांना बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बिद्रीच्यावतीने रोख रक्कमेची बक्षिसे देण्यात आली. बक्षिसांची रोख रक्कम बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बिद्री यांच्यावतीने देण्यात आली.

देसाई एस्. बी.
प्रमुख,
हिंदी विभाग.

## परिसर विकास समिती.

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात मी परिसर विकास समितीचा निमंत्रक म्हणून काम पाहिले आहे.

सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या समोर सुर्यफुलाची लागवड करण्यात आली होती. त्याच्या उत्पन्नातून मिळालेले रूपये २७५ मधून या वर्षी काही झाडे खरेदी करून लावणेत आली. तसेच विना खर्चाची झेंडूची फुल झाडे लावुन परिसर सुशोभित ठेवण्याचे काम केले आहे. महाविद्यालयाच्या डाव्या बाजून व समोरील काही भागात महाविद्यालयाच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या श्रमदानातून सिमेंट पोलमध्ये काटेरी तारेचे कुंपन केले आहे. तसेच वनस्पती शास्त्राच्या नियोजित गार्डनचेही चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या श्रमदानातून चारही बाजूने कंपाउंड केले आहे. तसेच महाविद्यालयापासून कॅनॉल पुलापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून लावणेत आला होता.

वर्षभर परिसराची स्वच्छता, झाडे लावणे व जगविण्याचा, परिसर सुशोभित करण्याचा प्रयत्न समितीने समिती सदस्य चुतर्थ श्रेणी कर्मचारी, संस्था यांच्या सहकार्याने सुरू आहे. या सर्व कामासाठी मा. प्राचार्य यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

प्रा. डी.जी. दिघे
निमंत्रक
परिसर विकास समिती.

## माहिती संकलन समिती

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात माहिती संकलन समितीचे कामकाज खालील प्रमाणे.

१) कला व शास्त्र अधिव्याख्यातांचे वैयक्तिक माहितीचे संकलन करण्यात आले व सी.डी. भरून विद्यापीठात पाठविण्यात आले.

माहिती संकलन समितीस मा.प्राचार्यसो व प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

प्रा.ए.बी. माने
निमंत्रक माहिती संकलन

## स्पर्धा परीक्षा समिती

महाविद्यालयामधील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाकडे या शैक्षणिक वर्षामध्ये ३२ विद्यार्थी आहेत. या माध्यमातून एम.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षांचे स्वरूप व तयारी या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले जाते. यावेळी आठवड्यातून चार दिवस व्याख्याने, एक दिवस सेमिनार व एक दिवस पुस्तकांची देवघेव चालते.

या शैक्षणिक वर्षामध्ये समितीच्या माध्यमातून दोन स्पर्धा चाचणी परीक्षा घेतल्या . तसेच विद्यार्थी समता मंडळ, नागपूर यांच्यावतीने घेण्यात येणारी 'सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा - २००५' चे आयोजन महाविद्यालयामध्येच करण्यात आले. यावेळी यामध्ये ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थी समता मंडळाकडून घेण्यात आलेल्या सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेत महाविद्यालयाचा बी.एस्सी-३ मधील विद्यार्थी मुकूंद विष्णू महाजन हा महाराष्ट्रातून दुसरा आला.

महाविद्यालयाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावरील प्रश्नमंजूषा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना पाठवले जाते.

तसेच या समितीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर जिल्हास्तरीय युवकमहोत्सवामधील प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयामध्ये केले होते.

दि. २०/१०/२००५ रोजी महाविद्यालयात एक दिवसाची 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा' आयोजित केली . यावेळी प्रशिक्षणार्थी डी.वाय.एस.पी. प्रशांत मोहिते, नवनिर्वाचित पी.एस.आय. श्री तळेकर, श्री. डोंगळे, कु.स्मिता पाटील यांच्याबरोबर कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे संचालक आस्लम शिकलगार यांची व्याख्याने झाली.

आपल्या महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागाकडील माजी विद्यार्थी श्री. युवराज पोवार या विद्यार्थ्याने स्पर्धा परीक्षांची तयारी व अडचणी यावर मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाकडे काम करत असताना प्रा. एल.एस.करपे, प्रा.सी.वाय. जाधव, डॉ. ए. आर. माने, डॉ. एस.डी. पाटील, प्रा.के.आर. सनदी,

प्रा. पी. एस. पाटील यांनी सहकार्य केले. तसेच प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर यांनीही वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले.

एन. एम. पाटील
निमंत्रक, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

## हजेरी समिती

शैक्षणिक वर्ष २००५-२००६ मध्ये महाविद्यालयामध्ये हजेरी समितीच्यावतीने सर्व प्राद्यापकांना हजेरीपत्रके उपलब्ध करून दिली व नियमित हजेरी घेतली गेली. यावेळी गैरहजर विद्यार्थ्यांचे अहवाल संबंधीत शिक्षकांकडून मागवून घेउन त्यासंदर्भात अहवाल मा. प्राचार्यांना सादर केला. उपस्थिती वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले. तसेच माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याच्या माध्यमातून बोरवडे व बिद्री या गावामध्ये गैरहजर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी प्रयत्न केले. यावेळी महाविद्यालयातील कला शाखेकडील सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. तसेच मा. प्राचार्यांचे मार्गदर्शक लाभले.

श्री. एन. एम. पाटील
निमंत्रक, हजेरी विभाग (कला)

## विशेष कक्ष समिती अहवाल

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात विशेष कक्ष समिती अंतर्गत महाविद्यालयातील मागासवर्गीय विध्यार्थ्यांच्या फॉर्म संदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन, आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी कॉलेज मार्फत मदत करणेस सहकार्य, जातीच्या दाखल्या संदर्भात विध्यार्थ्यांना मार्गदर्शन, महाविद्यालयातील अभ्यासक्रम निवडीबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. त्यासाठी त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. या समितीच्या कार्यपूर्तीसाठी प्रा. डॉ. ए. आर. माने, प्रा. ए.बी. माने, प्रा. ए.डी. जानवे, प्रा. डी.जी. दिघे, प्रा. एच.डी. धायगुडे व प्रा. एस.ए. गंगावणे यांचे सहकार्य लाभले. तसेच प्राचार्य डॉ. आर.एल. राजगोळकर यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रा. करपे लक्ष्मण एस.
निमंत्रक, विशेष कक्ष समिती

## संगणक विभाग

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षामध्ये संगणक विभागामार्फत केलेली कामे -

१. एकूण ५ संगणक संचाना नंबर देण्यात आले
२. सर्व संगणक संचाची आवश्यक ती दुरूस्ती करून घेण्यात आली.
३. महाविद्यालय ऑफिस व संगणक लॅबमधील २ संगणक एकत्र जोडले.
४. संगणक लॅबमध्ये भौतिकशास्त्र, गणित व संख्याशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिकांचे नियोजन केले.
५. महाविद्यालयात प्राचार्य कक्षासाठी एक नविन संगणकावर इंटरनेटची सोय उपलब्ध करून दिली.

या कामी मा. प्राचार्य आणि प्रा. एस.एच. पाटील यांची वेळोवेळी मदत व सहकार्य मिळाले.

प्रा. एस. ए. गंगावणे
निमंत्रक, संगणक विभाग

## विशेष कक्ष समिती अहवाल

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात विशेष कक्ष समिती अंतर्गत महाविद्यालयातील मागासवर्गीय विध्यार्थ्यांच्या फॉर्म संदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन, आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी कॉलेज मार्फत मदत करणेस सहकार्य, जातीच्या दाखल्या संदर्भात विध्यार्थ्यांना मार्गदर्शन, महाविद्यालयातील अभ्यासक्रम निवडीबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. त्यासाठी त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. या समितीच्या कार्यपूर्तीसाठी प्रा. डॉ. ए. आर. माने, प्रा. ए.बी. माने, प्रा. ए.डी. जानवे, प्रा. डी.जी. दिघे, प्रा. एच.डी. धायगुडे व प्रा. एस.ए. गंगावणे यांचे सहकार्य लाभले. तसेच प्राचार्य डॉ. आर.एल. राजगोळकर यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रा. करपे लक्ष्मण एस.
निमंत्रक
विशेष कक्ष समिती

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल (सन २००५-२००६)

'लोकसेवेतून शिक्षण आणि शिक्षणातून लोकसेवा'या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्येयानुसार दूधसाखर महाविद्यालयातील स्वयंसेवक नियमित कार्यक्रम व विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये कार्यरत होतो. राष्ट्रीय सेवा योजनेचे घोषवाक्य 'माझ्यासाठी नव्हे आपणांसाठी' हे आहे. सप्टेंबर १९६९ मध्ये म. गांधींच्या जन्म शताब्दी वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेचा जन्म झाला.

प्रा. शिंदे डी. के. व प्रा.वाय.एस. पाटील हे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी असून प्रा. एन्.डी. पाटील, प्रा. ए.बी. माने, प्रा. एस.एन. झेंडे हे राष्ट्रीय सेवा योजना सदस्य म्हणून काम पाहतात. तर राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्री. कुलदीप खोत कार्यरत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम व सहभाग खालील प्रमाणे-

१) रक्तदान शिबीर -

१३ सप्टेंबर २००५ रोजी दूधसाखर महाविद्यालय व दूधसाखर क्रिडा व सांस्कृतिक मंडळ कारखाना कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने ५९ स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी प्राध्यापक, कामगार व यंवक यांनी "उत्फूर्तपणे" रक्तदान केले. 'रक्त संकलन छ. प्रमिलाराजे हॉस्पिटल'कोल्हापूर यांच्या पथकाकडून करण्यात आले.

२) नियमित श्रमदान -

कॉलेज परिसर व बिद्री गावामध्ये स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता तण - निर्मुलन रस्त्याच्या दुतर्फा डयुरांडा मेहंदी लावणे वनीकरण साठी खड्डे, बिद्री गावातील दूधगंगा नदीकाठावरील हनुमान मंदिरासमोरिल भराव खणून तो बाजूला टाकणे वगैरे कामे केली. या कामी सरपंच सौ. अरूणा भरत पाटील, श्री. पिराजी पाटील, क्लार्क ग्रा.पं. सदस्य व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

३) 'राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक शिबीरात सहभाग'

'युवकांनी खेड्याकडे चला' या संकल्पनेवर आधारीत राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबीर मु. पो. हिवरे बाजार जि. अहमदनगर येथे दि. २४ ते ३० सप्टेंबर २००५ या कालावधीत संपन्न झाला. त्यामध्ये दूधासाखर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कु. पंदारे राजकुमार आनंद, बी.एस्सी भाग - २ व कु. मडीलगे दिग्वजय आप्पासाहेब बी.एस्सी. भाग -२ हे दोघे सहभागी झाले.

४) जिल्हास्तरीय नेतृत्वविकास व आपत्कालीन व्यवस्थापन शिबीर सहकार भूषण एस्. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड येथे २४ ते २८ ऑक्टो. २००५ या कालाववधीतील शिबीरात श्री. चौगले अविनाश नंदकुमार व श्री. डाफळे दयानंद महादेव हे बी. ए. भाग - २ मधील स्वयंसेवक सहभागी झाले.

५) प्री.आर.डी. कॅम्प सहभाग

१८ ते २७ ऑक्टो. २००५ या कालावधीत शासकीय महाविद्यालय, दमण (गुजरात) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्री.आर. डी. कॅम्पमध्ये श्री. यादव संजय दत्तात्रय बी. ए. भाग - ३ हा स्वयंसेवक सहभागी झाला.

६) विद्यापीठ स्तरीय शिबीरात सहभाग.

६ त १० फेब्रुवारी २००६ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व आटपाडी कॉलेज, आटपाडी जि. सांगली यांचे संयुक्त शिबीरामध्ये श्री. फराकटे मानसिंग आनंदा व पाटील सचिन बाबुराव हे बी.ए. भाग-२ मधील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले.

७) युवा स्वच्छतादूत प्रशिक्षण कार्यशाळा

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, युनिसेफ, महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा

व स्वच्छता विभाग व दूधसाखर महाविद्यालय बिद्री यांचे संयुक्त विद्यमाने युवा स्वच्छतादूत प्रशिक्षण कार्यशाळा दि. २८ व २९ जाने. २००६ या कालावधीत घेण्यात आली. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा सहभाग.

८) दक्षिण विभागीय आंतरराज्य राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीरात सहभाग.

'सुवर्ण-कर्नाटक, स्वच्छ-कर्नाटक करिता युवक' या प्री-युनिव्हर्सिटी एज्युकेशन डिपार्टमेंट, बंगलोर, आर. एल्. एस्. प्री.-युनिव्हर्सिटी कॉलेज, धारवाड व जिल्हा पंचायत धारवाड यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण विभागीय आंतरराज्य राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर दि. १५ ते २४ जाने. २००६ या कालावधीत ॲग्रिकल्चर ट्रेनिंग सेंटर, धारवाड येथे संपन्न झाले. त्यामध्ये श्री. यादव जयदिप अशोक, बी.ए. भाग-२ हा स्वयंसेवक सहभागी झाला तसेंच प्रा. शिंदे डी. के. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी शिवाजी विद्यापीठ संघ व्यवसीपक म्हणून जबाबदारी उत्तमपणे पार पाडली.

८) विशेष श्रमसंस्कार शिबिर -

दूधसाखर महाविद्यालय बिद्रीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. २ ते ११ डिसेंबर २००५ या कालावधीत मु. पो. बिद्री गावामध्ये घेण्यात आले शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, गारवेल निर्मूलन, रस्त्याच्या दुतर्फा वनीकरणासाठी खड्डे खुदाई, ग्रंथालय व दलित महासंघाच्या परिसरात बागबगीचा व स्वच्छता इ, श्रमदान कार्यक्रम तसेच म. फुले, राजर्षी शाहू व डॉ. आंबडेकर यांचे पुरोगामी विचार, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे, किफायतशीर दूधव्यवसाय, वासरांचे संगोपन, जलव्यवस्थापन, एचआयव्ही/एडस्: लैंगिक शिक्षण उस, उस विकास इ. विषयावर मान्यवरांचे मार्गदर्शन व प्रबोधन ग्रामस्थासाठी आयोजन केले. तसेच जनावरांचे सर्वरोग चिकीत्सा शिबिर, स्त्रिया व मुले आरोग्य तपासणी शिबिर, रक्त-गट चाचणी शिबिर, महिला हळदी-कुंकू कार्यक्रम तसेच पथनाट्य, मूकनाट्य लोकनृत्य, सुगम गायन इ. सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सर्व कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत बिद्री, पंचायत समिती, कागल, गोकूळ दूधसंघ, बिद्री गावातील सेवाभावी सहकारी संस्था, महिला बचत गट व युवक मंडळे आणि विशेषता: सौ. अरूणा भरत पाटील, सरपंच व मा. नंदकुमार पाटील, पंचायत समिती सदस्य व ग्रा. पं. सदस्य यांचे सहकार्य मिळाले.

महाविद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या विविध कार्यकमात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा सहभाग असतो.

प्रा. शिंदे डी. के.
निमंत्रक,
राष्ट्रीय सेवा योजना.

## "Workshop on the Role of Chemistry in - Environmental Studies"

दूधसाखर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने शनिवार दि. ०४/०२/२००६ रोजी एक दिवसाची कार्यशाळा "पर्यावरण अभ्यासक्रमात रसायनशास्त्राचा महत्वपूर्ण वाटा" या विषयावर आयोजित केली होती. सदर कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे परीक्षा नियंत्रक डॉ. एन.व्ही. ठक्कर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान, कारखान्याचे विद्यमान तज्ञ संचालक मा.श्री. नामदेवरावजी भोईटे यांनी भूषविले होते. सदर कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील ४० प्राध्यापक उपस्थित होते. तसेच रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन मा. डॉ. एस्.व्ही. पोरे हे उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये प्रा.डॉ. एन.व्ही. ठक्कर, प्रा.डॉ. एल.जे. भोसले व प्रा.डॉ. बी.व्ही. कुलकर्णी यांची पर्यावरण अभ्यासक्रमातील विविध विषयावर माहिती पूर्ण व्याख्याने झाली. सदर कार्यशाळेचे उत्कृष्ठ संयोजन प्राचार्य डॉ. आर.एल. राजगोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. एस.एन. झेंडे, प्रा. एस.के. सावंत, प्रा. एस.जी. खानापूरे, प्रा. के. आर. सनदी व इंग्रजी विभागाचे प्रा. डी. एन. पाटील यांनी केले.

प्रा. एस.एन. झेंडे

## Report on

"One Day Workshop on Physics Laboratory Training"

The year 2005 has been celebrated as "The year of Physics" all over the world. A as a part of this we have arranged one day seminar cum workshop on "Physics Laboratary Training". This program was inaugurated by Hon. Shri. K.D. Patil, Director, S.D.S.P.M., Hon. Shri. Rajendra Patil and Hon. Shri. Desai R.D. Director of our institute were also present on this occasion.

Dr. Rajesh Khaparde from Dr. Homi Bhabha Centre for Science Education deliv ered talk on "Objective of the Physics Laboratory Training". In the second session he demonstrated several experiments of physics. About 250 students participated in this workshop.

The board displaying " Objectives of Phsics Laboratory Training" was displayed in the Physics Laboratory on this occasion.

## माझे सहकारी

### प्रा. करपे एल. एस.

अर्थशास्त्र विभाग

मी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात दि. २४/११/२००५ ते २७/११/२००५ या कालावधीत बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या आर्टस्,सायन्स व कॉमर्स महाविद्यालयात भरविलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनास उपस्थित राहिलो.

दि. २१/१/२००६ ते २३/१/२००६ या कालावधीत महाविद्यालयाच्या वेंगुर्ला ते गोवा या मार्गावरील पदभ्रमंतीमध्ये सहभाग घेतला.

दि. ६/२/२००६ ते ७/२/२००६ या दिवशी शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर अर्थशास्त्र विभाग अंतर्गत आयोजित 'शेती माल विक्री व्यवस्थेतील रचना' या विषयावरील चर्चा सत्रास उपस्थित राहिलो.

### प्रा. साळोखे एस. ए.

इंग्रजी विभाग

२००५-२००६ या शैक्षणिक वर्षामध्ये मी खालील सेमीनार व वर्कशॉपमध्ये सहभाग घेतला.

१) दि. ९ व १० डिसेंबर, कराड येथे शिवाजी युनिव्हर्सिटी इंग्रजी टिचर्स असोशिएशन व एस.जी.एम.कराड यांच्या संयुक्त विद्यमाने 'अनुवाद' या विषयावर दोन दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला तसेच यावेळी असोशिएशनची कार्यकारणी स्थापन करण्यात आली. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्याचा प्रतिनिधी म्हणून माझी कार्यकारणीवर नियुक्ती झाली.

२) दि. १३ ते १६ जाने. २००६ या दरम्यान लखनौ येथे अखिल भारतीय इंग्रजी शिक्षकांची परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये मी सहभाग घेतला. या परिषदेमध्ये मी 'अर्नेस्ट हेमींग्वे' यांच्या लघु-कथेचा टीकात्मक अभ्यास या विषयावरील पेपर वाचन केले.

## माझे सहकारी

### प्रा. डॉ. एस. डी. पाटील
मराठी विभाग

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या कामकाजाबरोबर समाज प्रबोधनासाठी मी विविध ठिकाणी व्याख्याने दिलीत. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| अ.नं. | विषय | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | व्यसनमुक्ती काळाची गरज | १०/०९/२००५ | सोनाळी ता.कागल नागराज तरुण मंडळ |
| २. | परखड समाजसुधारक संत तुकाराम | ८/१२/२००५ | आणाजे ता.राधानगरी, राधानगरी महा. राधानगरीचे रा.सेवा योजना शिबिर |
| ३. | लोकसंख्या शिक्षण व एड्स प्रबोधन | २०/१२/२००५ | व्हन्नूर ता. कागल माध्यमिक शिक्षकांची सहविचार सभा. |
| ४. | मराठी व्याकरण | ०९/१२/२००५ | दूधसाखर महा. बिद्री स्पर्धा परीक्षा विभाग |
| ५. | सार्वजनिक जीवनात स्वच्छतेचे महत्त्व | २९/०१/२००६ | दूधसाखर महा.बिद्री दोन दिवसीय युवा स्वच्छतादूत कार्यशाळा. |

६. विशेष -माझ्या पीएच. डी. प्रबंधास शिवाजी विद्यापीठाचे डॉ. व्ही. आर. करंदीकर पारितोषिक प्राप्त झाले.

### याबरोबरच

१. विवेकानंद महा. कोल्हापूर येथील दि. ०६/०९/२००५ रोजी झालेल्या अभ्यासक्रम चर्चासत्रास उपस्थित.

२. अर्जुनवाडा ता. राधानगरी येथे गौरी -गणपती नदीच्या पाण्यात विसर्जित न करण्सासाठी पुढाकार -प्रत्यक्ष सहभाग - १२/०९/२००५

३. जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा - परीक्षक - मडिलगे बु. ता. भुदरगड दि. ०६/१०/२००५.

४. दि.२० ते २५ नोव्हेंबर २००५ दरम्यान विद्यापीठीय इंद्रधनुष्य युवा महोत्सव दापोली ता. रत्नागिरी येथे पार पडला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा सांस्कृतिक संघ-प्रमुख जबाबदारी पार पाडली.

५. बुधवार व गुरूवार दि. ४ ते ५ जानेवारी २००६ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रास उपस्थिती.

६. बारामती जि. पुणे येथे दि. १० ते ११ जानेवारी २००६ मध्ये पार पडलेल्या राष्ट्रीय परिषदेस उपस्थिती.

## माझे सहकारी

### प्रा.ए. बी. माने
राज्यशास्त्र विभाग

१) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने बी. ए. भाग -३ नवीन अभयासक्रमासाठी गुरूवार दि. १४/०७/२००५, शुक्रवार दि. १५/०७/२००५ व दि. शनिवार दि. १६/०७/२००५ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये राज्यशास्त्र विषयाचा अधिव्याख्याता म्हणून सहभाग.

२) शिवाजी विद्यापीठ राजशास्त्र परिषद व नाईट व कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने 'संशोधन पध्दती' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार दि. ०३/०९/२००५ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेस मी राज्यशास्त्र विषयाला अधिव्याख्याता म्हणून सहभाग.

३) शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवामहोत्सव ळ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे दि. १७/११/२००५ दि. १८/११/२००५ रोजी संपन्न झाला. सदर महोत्वासाठी आपल्या महाविद्यालयाच्या पथनाटय व मुकनाट्याची निवड झाली होती. सांस्कृतिक विभाग सदस्य म्हणून सहभाग.

४) श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर येथे राजशास्त्र विभागाच्या वतीने रविवार दि. १८/१२/२००५ रोजी राज्यशास्त्र (बी.ए.भाग-३) विषयाच्या 'तुलनात्मक शास्त्र आणि राजकारण' या पेपरवर एक दिवसीय कार्यशाळेस श्री. राजशास्त्र विषयाचा अधिव्याख्याता म्हणून सहभाग.

### श्री. एन. डी. पाटील
शारीरिक शिक्षण संचालक

आमचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. एन.डी. पाटील यांची प. द. आंतर विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धा, अश्वमेध स्पर्धा विद्यापीठ बास्केटबॉल (महिला) संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली. सदरच्या स्पर्धा अनुक्रमे 'भोपाळ' (म.प्रदेश) व 'परभणी' येथे झाल्या.

### प्रा. डॉ. ए. आर.माने
इतिहास विभाग

आंतरराष्ट्रीय इतिहास परिषद, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे 'निरीक्षक' म्हणून सहभाग.

माध्यमिक शिक्षकांचे केद्र संमेलन कसबा वाळवे येथे 'समावेशक शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन.

वसंतराव नाईक अध्यापक विद्यालय, कोल्हापूर येथे 'अंधश्रध्दा निर्मूलन काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन.

बोरवडे माध्यमिक विद्यालय, बोरवडे येथे 'अंधश्रध्दा व बुवाबाजी' या विषयावर लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान.

'राजारामपुरी विकासमंच,' कोल्हापूर आयोजित, राजारामपुरी येथे 'छ. राजाराम यांचे जीवन कार्य' या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन.

डॉ. ए. आर. माने
इतिहास विभाग प्रमुख

# प्राध्यापक वृंद

सन २००५-२००६

मा. प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर

## कला विभाग

### इंग्रजी

| | |
|---|---|
| श्री. सी. वाय. जाधव | एम.ए.डीटीई |
| श्री. डी. एन. पाटील | एम.ए. |
| श्री. एस. ए. साळोखे | एम.ए.एम.एड. |

### मराठी

| | |
|---|---|
| डॉ. ए. जे. वारके | एम.ए.बी.एड.(सेट)पीएच.डी. |
| डॉ. एस. डी. पाटील | एम.ए.बी.एड.पीएच.डी. |

### हिंदी

| | |
|---|---|
| डॉ. एस. बी. देसाई | एम.ए.पीएच.डी. |
| श्री. डी. जी. दिघे | एम. ए. |

### इतिहास

| | |
|---|---|
| श्री. ए. आर. माने | एम.ए.बी.एड.(सेट)पीएच.डी. |
| श्री. एस. आर. पाटील | एम. ए. |

### समाजशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. डी. के. शिंदे, | एम.ए.एम.फिल. |
| श्री. ए. डी. जानवे | एम. ए. बी. एड. |

### राज्यशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. ए. बी. माने | एम. ए. |
| श्री. पी. एस. पाटील | एम.ए. |

### भूगोल

| | |
|---|---|
| श्री. एन.एम. पाटील | एम.ए. (सेट) |

### अर्थशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. एल.एस. करपे | एम.ए.बी.एड्.एम.फील |

### शारीरिक शिक्षण संचालक

| | |
|---|---|
| श्री. एन. डी. पाटील | एम.पी. एड् |

## शास्त्र विभाग

### भौतिकशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. एच. डी. धायगुडे | एम.एस्सी. |
| श्री. एस. एन. कुलकर्णी | एम.एस्सी.पीएच.डी. |
| श्री. एम. व्ही. टाकळे | एम.एस्सी. |
| श्री. एस. ए. गंगावणे | एम.एस्सी. |
| श्री. एस. ए. व्हनाळकर | एम.एस्सी. |
| श्री. आर. आर. देसाई | एम.एस्सी. |

### रसायनशास्त्र

| | |
|---|---|
| श्री.एस. एन. झेंडे | एम.एस्सी. |
| श्री. एस. के. सावंत | एम.एस्सी. |
| श्री. एस. जी. खानापुरे | एम.एस्सी. |
| श्री. के. आर. सनदी | एम.एस्सी. (सेट) |
| श्री. एम.पी. गुरव | एम.एस्सी. |
| श्री. व्हि. के. पाटील | एम. एस्सी. |
| श्री. एस. डी. घेराडे | एम. एस्सी. |
| श्री. ए. एम. मांढरे | एम. एस्सी. |
| श्री. एस. के. ढवळे | एम. एस्सी. |

### वनस्पतीशास्त्र

| | |
|---|---|
| डॉ. एस. जी. गायकवाड | एम.एस्सी. |
| श्री. एस. एस. पाटील | एम.एस्सी.एम.फिल |
| श्री. पी. बी. पाटील | एम.एस्सी. |
| कु. एस. डी. खेगडे | एम.एस्सी. |
| डॉ. एस. एस. खोत | एम.एस्सी.पीएच.डी. |
| कु. व्ही. एस. कांबळे | एम.एस्सी. |
| श्री. एस. पी. पाटील | एम. एस्सी. |
| श्री. बी. ए. सोनार | एम. एस्सी. |
| कु. एम. एस. देसाई | एम. एस्सी. |

**प्राणीशास्त्र**

| | |
|---|---|
| श्री. आर. एस. पाटील | एम.एस्सी. |
| कु. जे. बी. कांबळे | एम.एस्सी. |
| कु. एस. पी. भोसले | एम.एस्सी. |
| श्री. एस. ए. व्हनाळकर | एम.एस्सी. |

**गणित**

| | |
|---|---|
| श्री. डी.डी. कोमेजवार | एम.एस्सी. एम. फील. |

**संख्याशास्त्र**

| | |
|---|---|
| श्री. वाय. एस. पाटील | एम.एस्सी. |
| एस. एच. पाटील | एम.एस्सी. |

**ग्रंथपाल**

| | |
|---|---|
| श्री. ए. टी. वागरे | एम.ए.बी.लिब.सायन्स |

## कार्यालयीन कर्मचारी

**अधिक्षक**

| | |
|---|---|
| श्री. पी. व्ही. पाटील | एम. कॉम. |

**मुख्यलिपीक**

| | |
|---|---|
| श्री. एम. के. भोईटे | बी. कॉम. |

**वरीष्ठ लिपीक**

| | |
|---|---|
| श्री. आर. एच. कंकाळ | बी. कॉम. |

**कनिष्ठ लिपीक**

| | |
|---|---|
| श्री. आर. एम. देसाई | बी. ए. |
| श्री. व्ही. डी. तळेकर | एच.एस.सी. |

**प्रयोगशाळा सहाय्यक**

| | |
|---|---|
| श्री. एस. के. पाटील | बी. ए. |

**ग्रंथालय परिचर**

| | |
|---|---|
| श्री. एन. एस. वारके | एम.ए.बी.एड. |
| श्री. एस. टी. जोशी | |
| श्री. जे.डी. कांबळे | |

**प्रयोगशाळा परिचर**

श्री. बी. एस. सुतार
श्री. ए. एम. घुगरे–पाटील
श्री. आर. पी. आळवेकर
श्री. एन. व्ही. पाटील
श्री. ए. बी. हावलदार

**शिपाई**

श्री. एस. एन. कांबळे
श्री. पी. आर. डाकरे
श्री. एस. आर. गुरव



# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर



मा.कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे , मा.संस्थाध्यक्ष आमदार श्री.के.पी. पाटील
व प्राचार्य यांचे समवेत प्राध्यापक वृंद



मा. प्राचार्य यांचे समवेत
प्रशासकिय कर्मचारी वृंद

मा. प्राचार्य यांचे समवेत
संपादक मंडळ
प्रा. सी. वाय. जाधव
प्रा. डॉ. ए. जे. वारके
प्रा. डी. जी. दिघे
प्रा. एस. ए. गंगावणे



# श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर.

तार : दुधसाखर,बिद्री
फॅक्स : २५४९७२

फोन : बिद्री एक्स्चेंज (०२३२४) २५४९२२ ते २६
कोल्हापूर ऑफीस : (०२३१) २२६६१५७८ / २२६६२९१९


## आमच्या कारखान्याची ठळक वैशिट्ये -

१. कारखान्याच्या पहिला ट्रायल सिझन १९६२ - १९६३ साली १२५० मे. टन या प्राथमिक दैनंदिन ऊस गाळप क्षमतेने झाला. सध्याची विस्तारीत गाळप क्षमता ३५०० मे. टन आहे.

२. कारखान्याचे कार्यक्षेत्र राधानगरी, भुदरगड, कागल आणि करवीर या चार तालुक्यातील २१८ गावामध्ये विस्तारीत झालेले असून सुमारे ३५ कि. मी. परिसरामध्ये कारखान्याचे कार्यक्षेत्र आहे.

३. सन १९९४ व १९९५ च्या गळीत हंगामात मा.वसंतदादा साखर संशोधन संस्था, पुणे यांनी तांत्रीककार्यक्षमता प्रस्थापित केलेबद्दल महाराष्ट्र राज्यातील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे. तसेच याच गळीत हंगामात महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई यांनी उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमता प्रस्थापित केले बद्दल महाराष्ट्र राज्यातील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे.

४. मे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी बु., जि. पुणे यांनी आमच्या कारखान्याने महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक रेडयूसड ओव्हर ऑल रिकव्हरी मिळविल्याबद्दल सन १९९६ - १९९७ सालचे हंगामासाठी उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमता द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन तर सन १९९८ सालचे हंगामासाठी तांत्रिक कार्यक्षमतेचे महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे.

५. कारखाना कार्यस्थळावर स्वत:ची अर्कशाळा उभारण्याचा कारखान्याचा संकल्प आहे.

६. देशातील तीव्र वीज टंचाईवर मात करणेसाठी अंदाजे ३५ कोटी रूपयांचा वीज निर्मीतीचा प्रकल्प उभारणेचे कारखान्याचे विचाराधीन आहे.

७. कारखान्याच्या माध्यमातून कृतीयुक्त सहभागाने दूधगंगा नदीवरील दूधगंगा प्रकल्प व वेदगंगा नदीवरील पाटगांव प्रकल्प पुर्णत्वाचे मार्गावर.

८. शासनाच्या सामाजिक कल्याण योजना आणि वेळोवेळी शासनामार्फत राबवणेत येणारे लोकाभिमुख कार्यक्रमामध्ये कारखाना प्रत्यक्ष कृतीयुक्त सहभाग घेत असून कार्यक्षेत्रातील लोकांचे सर्वांगीण विकासासाठी कटीबध्द आहे.

९. कारखाना कार्यस्थळावर बालवाडी पासुन कला आणि विज्ञान शाखांच्या पदवीपर्यंतचे शिक्षणाची सोय व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेसाठी कारखाना व्यवस्थापकीय मंडळ प्रयत्नशील.

१०. केंद्र सरकारचे योजनेमधून कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादनात वाढ व्हावी म्हणून ऊस विकासाच्या विविध योजना कार्यान्वीत, तसेच अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे ऊस पिकवण्याच्या दृष्टीने शिबिरे, मेळावे, चर्चासत्रे, प्रात्यक्षिके घेवून तसेच बी - बियाणे, खते, किटकनाशके, औषधे

११. अनुदानावर देवून कारखाना सभासदांना प्रोत्साहित करत आहे.
सहकाराचे माध्यमातून कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, उस उत्पादक आणि सामान्य जनता यांचे सर्वांगिण विकासासाठी कारखाना कटीबध्द.



मा. आमदार के. पी. पाटील
चेअरमन

मा. आर. डी. देसाई
कार्यकारी संचालक

मा. सुनिलराज सु. सुर्यवंशी
व्हा. चेअरमन

**सर्व सन्माननीय संचालक मंडळ, सभासद बंधु, भगिनी, खातेअधिकारी व सेवक**